# अंतरींचे बोल

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ७३४.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
संग्रहालय/वाचनालय शाखा.
अनुक्रम नं. ८२७ | विभाग निबंध | क्रमांक
पुस्तकाचें नांव अंतरींचे बोल
लेखक. वियोगी हरि.
सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0006689

किंमत २॥ रुपये

# अंतर के बोल



—वियोगी हरि

# अंतरींचे बोल

लेखक

**वियोगी हरि**

संपादक

**श्रीपाद जोशी**

REFBK-0006689

किंमत २॥ रु.

प्रकाशक व व्यवस्थापक :

रा. ज. देशमुख

देशमुख आणि कंपनी

१९१ शनवार पुणें २.

संचालक :

भ. व्यं. देशमुख

बी. ए. एल्‌एल्. बी.

१ पुढील आवृत्तींचे सर्व हक्क श्रीपाद जोशी यांच्याकडे आहेत.

२ मुखपृष्ठावरील चित्र दीनानाथ दलाल यांचें आहे.

मुद्रक :

व्यंकटेश राघवेंद्र शिंगरे,

हिंदुराष्ट्र मुद्रणालय, १४०८ कसबा, पुणें २.

## देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

| | | रु. |
|---|---|---|
| १ | फुलें आणि दगड (आ. दु.) | ३ |
| २ | घरट्याबाहेर ( ,, ) | ३ |
| ३ | पहिली लाट ( ,, ) | ३ |
| ४ | स्त्री आणि पुरुष ( ,, ) | २ |
| ५ | सूर्यकमळें ( ,, ) | २॥ |
| ६ | कालचीं स्वप्नें | ३ |
| ७ | आजचीं स्वप्नें | ३ |
| ८ | कलिका | २। |
| ९ | मृगजळांतील कळ्या | २॥ |
| १० | मंजिऱ्या | २। |
| ११ | सायंकाल ( आ. दु. ) | २॥ |
| १२ | अविनाश | १॥। |
| १३ | मंदाकिनी | १॥। |
| १४ | कल्पलता | ३ |
| १५ | सुवर्णकण | २। |
| १६ | आगरकर(व्यक्ति आणि विचार) | ३॥ |
| १७ | सहा भाषणें | २ |
| १८ | फुलें आणि कांटे | २। |
| १९ | मराठीचा नाट्यसंसार | ३ |
| २० | हिरवा चांफा ( आ. तिसरी ) | ५ |
| २१ | दोन ध्रुव ( ,, ) | ५ |
| २२ | पहिलें प्रेम ( आ. दुसरी ) | ३ |
| २३ | क्रौंचवध ( ,, ) | ५ |
| २४ | पांढरे ढग ( ,, ) | ४। |
| २५ | जळलेला मोहर | ३ |
| २६ | उल्का ( आ. ति. ) | ४॥ |

### साने गुरुजी

| | | रु. |
|---|---|---|
| १ | पुनर्जन्म ( आ. दुसरी ) | ३ |
| २ | आस्तिक ( ,, ) | ३ |
| ३ | संध्या | ५ |
| ४ | ना खंत ना खेद ( कृष्णा हठीसिंग ) | ५ |
| ५ | सोन्या मारुति ! (दु. आवृत्ति) | २ |
| ६ | निळा पक्षी ( आवृत्ति दुसरी ) | २॥ |
| ७ | गोड निबंध ( भाग पहिला ) | ३ |
| ८ | गोड निबंध ( भाग दुसरा ) | ३ |
| ९ | गोड निबंध ( भाग तिसरा ) | ३ |

### ग. त्र्यं. माडखोलकर

| | | |
|---|---|---|
| १ | अवशेष | २ |
| २ | व्यक्तिरेखा | २। |
| ३ | माझी नभोवाणी | २ |
| ४ | नवे संसार | ४ |
| ५ | चंदनवाडी | ६॥ |
| ६ | नागकन्या | २ |
| ७ | दोन तपें | ५ |

### ना. घों. ताम्हनकर

| | | |
|---|---|---|
| १ | तात्या भा. १ ला (आ. दुसरी) | ४ |
| २ | तात्या भा. २ रा | ३ |
| ३ | निवाडे भा. १ ला | २॥ |
| ४ | निवाडे भा. २ रा | ४ |
| ५ | चकमकी | १॥ |
| ६ | बच्चा नवरा | १॥ |
| ७ | अनेक आशीर्वाद | ३॥ |
| ८ | दाजी भा. १ ला ( आ. ति. ) | ३॥ |
| ९ | बहीणभाऊ | -॥।- |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

| वा. म. जोशी | रु. |
|---|---|
| १ स्मृति–लहरी | २ |
| २ विचार–लहरी | २। |
| ३ विचार–विहार | ४। |

**चिं. वि. जोशी**

| | |
|---|---|
| १ आणखी चिमणराव (आ. २ री) | ४ |
| २ वायफळाचा मळा ( ,, ) | ५ |
| ३ नवें भारूड | २ |
| ४ स्टेशनमास्तर | २ |
| ५ नटश्रेष्ठ | -॥।- |

**दत्तू बांदेकर**

| | |
|---|---|
| १ सख्या हरि ( आ. दुसरी ) | २ |
| २ नवी आघाडी | १॥ |
| ३ तूं आणि मी | २। |
| ४ नजरबंदी | २। |

**प्र. के. अत्रे**

| | |
|---|---|
| १ साखरपुडा ( आ. दु. ) | |
| २ ललित वाङ्मय | ३॥ |
| ३ दूर्वा आणि फुलें | २। |

**ना. म. पटवर्धन**

| | |
|---|---|
| १ हितपत्रें | ३ |
| २ वा. म. जोशी (चरित्र) | ४। |

**द. र. कवठेकर**

| | |
|---|---|
| १ अपुरा डाव | ३ |
| २ रेशमाच्या गांठी | ३ |
| ३ आभाळाची सांवली | ८ |

**अनंत काणेकर**

| | |
|---|---|
| १ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे ( आ. दुसरी ) | ३ |

| | रु. |
|---|---|
| २ पिकलीं पानें ( आ. दुसरी ) | १॥ |
| ३ उघड्या खिडक्या | १॥ |

**काकासाहेब कालेलकर**

| | |
|---|---|
| १ ब्रह्मदेशाचा प्रवास | १॥ |
| २ भक्ति-कुसुमें | ३ |

**य. दि. पेण्ढरकर**

| | |
|---|---|
| १ प्रापंचिक पत्रें | ३ |
| २ घायाळ | २ |

**ना. ह. आपटे**

| | |
|---|---|
| १ फसगत | १॥ |
| २ साजणी | ५ |

**पु. य. देशपांडे**

| | |
|---|---|
| १ नवें जग !– | २॥ |

**भाई बेके**

| | |
|---|---|
| १ रॅयचरित्र– | १॥ |

**वि. स. खांडेकर** (परिचय लेखक)

| | |
|---|---|
| १ काव्यज्योति ( आ. दुसरी ) | १ |

**आनंदीबाई जयवंत**

| | |
|---|---|
| १ पारंब्या | २ |

**रा. वि. फडतरे**

| | |
|---|---|
| १ मृगया | ४ |

**लक्ष्मणराव सरदेसाई**

| | |
|---|---|
| १ ढासळलेले बुरुज | २ |

**प्रो. वि. ह. कुलकर्णी**

| | |
|---|---|
| १ व्यक्तिचित्रें | २॥ |

**शकुंतलाबाई परांजपे**

| | |
|---|---|
| १ भिल्लिणीचीं बोरें | ३ |

# देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

| | रु. |
|---|---|
| **कृष्णाबाई मोटे** | |
| १ मीनाक्षीचें जीवन | २। |
| **र. गो. सरदेसाई** | |
| १ चलतीं नाणीं | २ |
| **संपादक आचार्य भागवत** | |
| १ वर्धा शिक्षण योजना | ४। |
| **रा. श्री. जोग** | |
| १ सौंदर्यशोध आणि आनंदबोध | ८ |
| **वि. वि. बोकील** | |
| १ बेबीची बहीण | ३ |
| **सत्यग्राही** | |
| १ ग्रह आणि तारे— | ४॥ |
| **वि. म. भुस्कुटे** | |
| १ स्टॅलिन— | ३॥ |
| २ आई ( मॅक्झिम गॉर्की ) | ७ |
| **कमलाबाई टिळक** | |
| १ आकाशगंगा | २॥ |
| **रामतनय** | |
| १ साखरगोटी | ५ |
| **ह. रा. महाजनी** | |
| १ आपलें आर्थिक नियोजन | ५ |
| **पं. क्षमा राव** | |
| १ देणगी | २॥ |

| | रु. |
|---|---|
| **गोपीनाथ तळवळकर** | |
| १ मंगलधाम | ३ |
| **श्री. किनरे** | |
| १ प्रकृति-दर्शन | ५ |
| **प्रो. हेरॉल्ड लास्की** | |
| १ राज्यशास्त्र प्रवेश | २ |
| **बाबूराव गोखले** | |
| १ बारा फोफावला | २ |
| **प्रो. एम्. एल्. दांतवाला** | |
| १ आपली राहणी | १॥। |
| **बापू गोखले** | |
| १ निवड | ३ |
| **अरविंद गोखले** | |
| १ उन्मेष | २।। |
| **रमातनय** | |
| १ समाजशास्त्र | ५ |
| **बिवलकर** | |
| १ नाना पाटील चरित्र | १ |
| **एस. एन्. अग्रवाल** | |
| १ विद्यार्थ्यांसाठीं विधायक कार्यक्रम | |
| **वियोगी हरि** | |
| १ अंतरींचे बोल | २॥ |

## Our English Publications

I *The New Matriculation Essays & Letters.*

by M. K. Deshpande. Rs. 2

II *The Changing Shape of Indian Politics.*

by K. M. Munshi. Rs. 5

III *On to Delhi.*

by Subhash Chandra Bose. Rs. 3

---

— DESHMUKH & COMPANY —

# अंतरींचे बोल

वियोगी हरि

# माझें म्हणणें असें

कीं मला स्वतःचें घर वाटणारीं अशीं अगदीं मोजकींच ठिकाणें आहेत; पण जीं आहेत त्यांच्याबद्दल मला आत्यंतिक आत्मीयता वाटते. अशा ठिकाणांपैकीं दिल्लीची हरिजन उद्योगशाळा हें एक आहे. दिल्लीला मीं एकच वर्ष काढलें. पण आपल्या एखाद्या जुन्या जिवलग मैत्रिणीची आठवण झाली म्हणजे ज्या प्रकारचे भावनातरंग आपल्या मनांत उठतात तशा प्रकारचे भावनातरंग हरिजन उद्योगशाळेची गोष्ट निघाली कीं माझ्या मनांत उठतात. याचें कारण मीं तेथें इतक्या घरगुती वातावरणाचें सुख अनुभविलें आहे कीं, तसें सुख इतरत्र क्वचित्‌च अनुभवावयास मिळतें. पूज्य पंडितजी (श्री. वियोगी हरि यांना आम्ही पंडितजी म्हणतों) एखाद्या प्रेमळ पित्याप्रमाणें माझी काळजी वाहात असत. उद्योगशाळेंतील विद्यार्थ्यांशीं व्यवस्थापक या नात्यानें वागलेलें मीं त्यांना कधीं पाहिलें नाहीं. ती शिक्षणसंस्था नसून एक मोठें कुटुंब आहे अशाच भावनेनें आम्ही सर्वजण तेथें राहात होतों. पू. श्री. काकासाहेबांनीं मला उर्दू शिकण्यासाठीं दिल्लीस पाठविलें. पण मी हरिजन उद्योगशाळेंत हिन्दी शिक्षकाचें काम करूं लागलों. फुरसतीच्या वेळीं पंडितजींच्या जवळ प्राचीन हिन्दी वाचीत असे. तें वाचन चालू असतांच मला सन्त–साहित्याची गोडी लागली. पंडितजींच्याकडून मला मिळालेली सर्वांत मोठी देणगी ती हीच. मला मराठींतील सन्त-साहित्याबद्दल नीटशी माहिती नाहीं, परंतु उत्तर भारतीय सन्त आणि सन्त-साहित्य यांच्याशीं मात्र माझा बराच परिचय आहे ही गोष्ट थोडी विचित्र तर खरीच. पण याला जबाबदार आजची शिक्षणपद्धति आहे. वियोगी हरींकडे मी गेलों नसतों तर जुन्या साहित्याशीं माझी ओळख झाली असती कीं नाहीं आणि त्यांतहि मला सन्त-साहित्याची गोडी लागली असती कीं नाहीं हें सांगणें कठिण आहे. यामुळें मला वियोगी हरींबद्दल विशेष कृतज्ञता वाटते. माझी वृत्ति दिवसेंदिवस (प्रचलित अर्थानें) धर्मरहित अशा साम्यवादाकडे झुकत असलेली

मला दिसत आहे. पण म्हणून माझ्यांतील सन्त-साहित्याविषयींचा आदर व गोडी हीं तिळमात्रहि कमी झालीं आहेत असें मला वाटत नाहीं.

सन्त-साहित्याबरोबरच हरिजींनीं मला दुसऱ्या एका गोष्टीची गोडी लावली. ती म्हणजे संडास सफाई. दिल्लीला जाण्यापूर्वी कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं संडास–सफाई केल्याचें मला स्मरतें. पण त्यांत एक प्रकारची कर्तव्यवृत्ति आणि उदासीनता होती. दिल्लीला गेल्यानंतर हरिजींनीं मला सांगितलें, "येथील भंग्याला दर रविवारीं पूर्ण सुट्टी मिळावी म्हणून मी त्या दिवशीं संडास सफाई करीत असतों. माझ्याबरोबर फक्त सवर्ण विद्यार्थ्यांनाच मी त्या दिवशीं संडास-सफाई करूं देतों. तुला यावयाचें आहे काय?" मी कांहींसा धर्मसंकटांत पडलों. विशेष उत्सुकता तर नव्हती. पण नाहींहि म्हणवेना. अखेर मीं होंकार दिला आणि त्यांच्या बरोबर संडास-सफाई करूं लागलों. प्रथम एकदोन खेपेस मला त्यांच्याकडून धडे घ्यावे लागले. नंतर मी त्यांत प्रवीण झालों. आणि मग जसजसें त्यांतील तत्त्व समजून येऊं लागलें तसतशी त्यांत मजाहि वाटूं लागली.

१९४२ ते ४४ च्या दरम्यान येरवड्याच्या कृष्णमंदिरांत असतांना मला दिल्लीची खूप आठवण होई. कारण उद्योगशाळेप्रमाणेंच तुरुंगांतील जीवनहि सामूहिक व वक्तशीर होतें. त्या आठवणीला विधायक स्वरूप देण्याच्या इराद्यानें पंडितजींचें साहित्य मराठींत आणण्यास मीं सुरवात केली. तत्पूर्वी दिल्लीस असतांनाच मीं त्यांच्या 'ठंडे छींटे' या पुस्तकाचें भाषान्तर केलें. त्यांचें 'अन्तरींचे बोल' हें नामकरण ध्रुवाचे सम्पादक श्री. रा. प्र. कानिटकर यांनीं केलें. मला तें आवडलें आणि माझे प्रकाशक मित्र श्री. देशमुख यांनाहि तें आवडल्यामुळें आतां तें प्रकाशांत येत आहे.

आपल्या सर्व पुस्तकांचीं मराठींत भाषान्तरें करण्याची मला परवानगी देऊन श्री. वियोगी हरि यांनीं मला उपकृत केलें आहे. हें काम माझ्या हातून होवो असें मी इच्छितों. मराठी वाचकांना वियोगींचें लिखाण आवडेल अशी मला आशा आहे.

काकावाडी<br>
वर्धा<br>
१ ऑगस्ट १९४६

श्रीपाद जोशी

# श्री. वियोगी हरि यांचा परिचय

श्री. श्रीपाद जोशींना हिन्दी-उर्दू शिकण्यासाठीं दिल्लीला पाठविलें तेव्हां उर्दूसाठीं जी व्यवस्था योजिली होती ती अंमलांत न आल्यामुळें त्यांना ती भाषा बऱ्याच त्रासानें अवगत करून घ्यावी लागली. हिन्दीसाठीं मात्र माझ्या व्यवस्थेची मला खात्री होती. श्री. वियोगी हरि म्हणजे हिन्दी जगतांतील सन्त साहित्याचे उत्कृष्ट दर्दी, लोकभाषेंतील शब्दरत्नांचे पारखी आणि आधुनिक साहित्याचे एक ठरेल दिशादर्शक. श्री. वियोगी हरि केवळ साहित्यिक नसून निःस्पृह समाजसेवकहि आहेत हें मला ठाऊक होतें. त्यांच्या सहवासांत श्रीपादना साहित्याचें मर्म तर समजूं लागेलच, पण अविश्रांत सेवेचीहि दीक्षा मिळेल या विश्वासानें मीं त्यांना वियोगी हरींकडेच पाठविलें होतें.

श्री. वियोगींनीं आपल्या साहित्यिक कारकीर्दीचा प्रारंभ हिंदींतील सर्वोत्कृष्ट सन्तकवि सूरदास याच्या काव्याचें आटोपशीर संपादन करून केला. सूरदास सन्त तर खराच. 'पापाची वासना' डोळ्यांनीं सेवत राहण्यापेक्षां आंधळें होणेंच चांगलें असें ज्यानें अक्षरशः ठरविलें त्याच्या साधनेच्या उत्कटतेविषयीं अधिक तें काय सांगावयाचें ! पण भिन्न भिन्न रस आळविण्याच्या बाबतींतहि त्याला मागें टाकील असा कवि हिन्दींत तरी झाला नाहीं. श्री. वियोगींनीं संपादिलेला संक्षिप्त सूर तावडतोब रसिकांच्या आदराला पात्र झाला. यानंतर वियोगीजींनीं स्वतंत्र काव्य 'वीर सतसई' हें लिहून सिद्ध करून दाखविलें कीं ब्रजभाषा ही नुसता शृंगार किंवा नुसती भक्ति आळविण्यालाच समर्थ नसून वीररस देखील तिला उत्कृष्टपणें हाताळतां येतो. राजस्तानमधील भाटचारणांचें काव्य जर सोडून दिलें तर जुन्या (आणि नव्याहि) हिन्दीमध्यें वीररस फारसा खुललाच नाहीं. येऊन जाऊन भूषणासारख्या एकदोन कवींचें नांव घेऊनच सन्तोष मानावा लागत असे. अशा स्थितींत वियोगींची वीरसतसई पाहून हिन्दी जगत् खूष, खूष झालें आणि हिन्दी साहित्य सम्मेलनानें त्यांना त्या भाषेंतील सर्वोच्च

इनाम श्रीमंगलप्रसाद पारितोषिक दिलें. अशा रीतीनें वियोगींना यश आणि अर्थ दोहोंचा लाभ झाला. यश त्यांनीं पदरीं बांधून घेतलें आणि अर्थ साहित्य-सेवेसाठीं सम्मेलनालाच अर्पण केला. दरमहा तीस रुपयांच्या पगारावर काम करणाऱ्या तरुण लेखकानें बाराशेंचें इनाम परत करणें ही कांहीं सामान्य गोष्ट नव्हे. ही गोष्ट त्यांना सहज साधली. पण यश किंवा कीर्ति ही परत देण्याचा त्यांचा पुकार कांहींसा विचित्र होता. बरींच वर्षें सुन्दर कविता केल्यानंतर एकेदिवशीं त्यांना निर्वेद उत्पन्न झाला आणि त्यांनीं असें जाहीर केलें कीं त्यापुढें कवीं कोणीं माझ्याकडे कविता मागूं नये; मीं कविता करण्याचें बंद केलें आहे. मी खरोखर कविच नव्हे. कवि असतों तर कविता केल्यावांचून माझ्यानें राहवलें नसतें जे मला कवि समजतात ते चूक करतात. यापुढें मी कविता करणार नाहीं. आणि म्हणून माझ्याकडे कविता मागण्याचे वृथा कष्ट कोणी करूं नयेत.

श्री. वियोगींनीं कविता करण्याचें सोडून दिलें हा त्यांच्या वैयक्तिक अभिरुचीचा प्रश्न आहे. पण ज्या परीक्षकांनीं सर्वोत्कृष्ट काव्य लिहिल्याबद्दल त्यांना मंगलप्रसाद पारितोषिक दिलें त्यांचा मुलाहिजा राखण्यासाठीं तरी वियोगींनीं म्हणावयास नको होतें कीं 'जे मला कवि समजत'त ते चूक करतात.' कसेंहि असो. वियोगिजींनीं आपल्या या घोषणेनंतर पद्यरचना केली नाहीं खरी.

वियोगी हरींनीं भक्तिरसानें थबथबलेल्या व्रजसाहित्यांतून उत्कृष्ट नमुने एकत्र करून संपादिले आहेत. त्यांनीं दुसरें कांहीं केलें नसतें आणि फक्त 'व्रजमाधुरीसार'च आपल्याला दिलें असतें तरी त्यांच्या या अभिजात अभिरुचीच्या परिश्रमाबद्दल साहित्यरसिकांनीं त्यांचेविषयीं कृतज्ञताच बाळ-गिली असती. अशाच प्रकारची त्यांची दुसरी सेवा म्हणजे हिन्दींतील उत्त-मोत्तम भजनांच्या संग्रहाचे त्यांनीं संपादिलेले पांच भाग होय.

सन्तवाणी म्हणून भिन्नाभिन्न सन्तांच्या वचनांचा एक लहानसा मासला त्यांनीं एकत्र केला आहे आणि त्या सर्व वचनांचें स्वतःच्या गोड हिन्दीमध्यें त्यांनीं गोड रूपान्तर केलें आहे. या संग्रहाविषयीं इतकेंच म्हणतां येईल कीं पंचपक्वान्नांचें भोजन देण्याचें आमिष दाखवून एखाद्याला

जेवायला बोलवावें; पक्वान्नें उत्कृष्ट, स्वादिष्ट आणि पौष्टिक असावींत पण एकादें देखील पक्वान्न पोटभर खावयास मिळूं नये अशासारखी या संग्रहाची स्थिति झाली आहे. या संग्रहांतील विषयक्रम देखील गोड साधलेला आहे. रूपान्तर शाब्दिक नसून मुळांतील भाव व्यक्त करण्यासाठीं पदरचें शब्दहि त्यांनीं उदार हातानें वापरले आहेत. पण कृति झाली आहे सुन्दर. याच नमुन्याची एक बुद्धवाणी देखील वियोगींनीं संपादिली आहे. ती इतकी कांहीं आकर्षक झाली कीं तशाच प्रकारची महावीरवाणी तयार करण्याची दुसऱ्या एका विद्वानाला त्यावरून प्रेरणा झाली. हे दोन्ही संग्रह आपापल्यापरींनीं सुन्दर आहेत आणि सामान्य वाचकांना त्या दोन्ही धर्मसंस्थापकांच्या शिकवणुकींची उत्कृष्ट कल्पना देतात.

कवीनें कविता करावयाची नाहीं असें ठरविलें खरें पण जित्याची खोड मेल्यावांचून कशी जावयाची ? पद्याबरोबर गद्यकाव्य लिहिण्याची संवय त्यांना प्रथमपासून होतीच. ती त्यांना कायमची चिकटली आहे. त्यांनीं सुन्दर सुन्दर वचनें आणि कंडिका लिहून गद्यकाव्याला शोभा आणली आहे.

—२—

कै. महादेवभाई देसाई नेहमीं म्हणत, "Prose is never done" गद्य किती जरी घोटलें तरी आणखीहि त्यावर एखादा हात फिरवावासारखा वाटतोच. गद्यांत कधीं 'अलम्' बुद्धि येत नसते. कवितेचें तसें नाहीं. चांगल्या छंदांत नेमके शब्द एकदां बसले म्हणजे त्यांत कांहीं शुद्धि–वृद्धि करावीशी वाटत नाहीं. झालें तें ठीक आहे असा सन्तोष उत्पन्न झाल्यानें परिमार्जनाला अवकाश रहात नाहीं. आपले साहित्यकारहि म्हणतात, 'गद्यं कवीनां निकषं वदन्ति !' कवींची खरी कसोटी गद्य लिहिण्यांतच होत असते. वियोगी हरींच्या कवि-हृदयाला लहानपणापासून सन्तसाहित्याचें पोषण मिळाल्यामुळेंच त्यांना इतकें हृद्य गद्य लिहितां आलें. जे सन्तकवि असतात त्यांच्यांत काव्यगुण कितीहि असला तरी त्यांची पारमार्थिकता त्यांना भाषेचा विलास फारसा करूं देत नाहीं. म्हणूनच कविजनांना सन्तवाङ्मयांतील मसाला वापरून त्यावर आपली कुसर चालवितां येते आणि मूळच्या सोन्याला ओप चढवून साहित्याला सुन्दर अलंकार चढवितां येतात.

प्रस्तुत संग्रहांत तीन लहान लहान पुस्तकांचा किंवा प्रकरणांचा अनुवाद-रूपानें समावेश झालेला आहे. ' ठंडे छींटें ' किंवा गार शिंतोडे (' अंतरींचे बोल ') या पुस्तकांत कारुण्य, क्षमा आणि सेवा यांतील स्थायिभावना परिपुष्ट करण्यासाठीं मननयुक्त विचार दिलेले आहेत. जेथें तेथें उपदेश भरलेला असला तरी त्याचें ओझें भाषेच्या सौष्ठवानें बरेंच कमी केलेलें आहे; आणि त्यांतील उपदेश देखील शुद्धिप्रियांच्या सोवळेपणावर आधारलेला नसून आत्मौपम्याच्या माणुसकीवर प्रतिष्ठित असल्यानें उपदेश असून देखील तो आकर्षक झाला आहे. मनांतील विचार पौष्टिकहि असावा, रोचकहि असावा आणि शब्दरचनेमुळें तो मोहकहि व्हावा अशी त्रिविध कसोटी या अंतरींच्या बोलांना सहज लावितां येईल.

' भावना ' या पुस्तकाचें आमूलाग्र भाषांतर न करतां फक्त दहापंधरा नमुने देऊन त्या पुस्तकाची कल्पनाच येथें दिली आहे. आणि शेवटीं निर-निराळ्या वेळीं कवीनें केलेल्या प्रार्थना दिल्या आहेत. साहित्य या दृष्टीनें या प्रार्थनांमध्यें जी सुन्दरता आली आहे ती सुन्दरताच त्या प्रार्थनांच्या पारमार्थिकतेला बाधक झाली आहे असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. साहित्यविलास इतर सर्वत्र विलसो पण निदान प्रार्थनेच्या वेळीं तरी साहित्य आणि संगीत या दोन्ही उत्कृष्ट कलांनीं आपली पायरी सांभाळली पाहिजे. प्रार्थना हेंच एक असें क्षेत्र आहे कीं जेथें भक्तीखेरीज इतर सर्व तत्त्वांनीं आपली हाजिरी भरून देखील नम्रतापूर्वक गौणस्थान स्वीकारलें पाहिजे.

पण आपल्याला वियोगींच्या गद्याची परीक्षा सन्त-साहित्य म्हणून करावयाची नसून हृदयाचा विकास दर्शविणारें गद्यकाव्य म्हणूनच करावयाची आहे. या कसोटीप्रमाणें त्यांच्या प्रार्थनादेखील नितान्त रमणीय झाल्या आहेत असें म्हणतां येईल.

कोण जाणे कशामुळें, हल्लींचें युग हृदयाविष्करणपरायण झालें आहे. यामुळें प्रत्येक लेखकाला केव्हां ना केव्हां आत्मकथा लिहिण्याची ऊर्मि उत्पन्न होते. वियोगी हरींनीं देखील गद्य–पद्य दोन्ही प्रकारचें काव्य सोडून देऊन सध्यां आत्मकथा लिहावयास सुरवात केली आहे. जगांतील सर्व प्रातिनिधिक व्यक्तींना मजेदार मजेदार उपदेश करून थकल्यानंतर त्यांना

आत्मकथा लिहावीशी वाटली असली पाहिजे. भाषेच्या साधेपणाच्या दृष्टीनें त्यांची ' मेरी हिमाकत ' आणि सध्या चालू असलेला ' मेरा जीवन-प्रवाह ' हीं दोन्हीं वाचकांना आकर्षक वाटतील.

वियोगींना साहित्य साधलें. चांगलें साहित्य लिहिण्याची त्यांची ऊर्मिहि शमलेली नाहीं; कदाचित् ती कधींच शमावयाची नाहीं पण त्यांना आपल्या जीवनाचें साफल्य साहित्य-सेवेंत दिसत नसून हरिजन-सेवेंत दिसत आहे ही खरोखर अभिनन्दनीय गोष्ट आहे. दिल्ली येथील हरिजन उद्योगशाळेंत जें उद्योगप्रधान संस्कारी शिक्षण दिलें जातें त्याची सर्व देखरेख श्री वियोगी हरिच करीत असतात; आणि आपला सर्व वेळ तेथील मुलांकडे आणि त्यांच्या जीवनविकासाकडे अर्पण करण्यांतच त्यांना सन्तोष मिळत आहे.

हिंदी साहित्यातील अशा एका वैशिष्ट्ययुक्त साहित्यिकाचा आज या पुस्तकाच्या द्वारें महाराष्ट्राला परिचय होत आहे हें सर्व बाजूंनीं इष्ट आहे. श्री. श्रीपादनीं हिंदी साहित्याचा मराठीला परिचय करून देतांना आपल्या विद्यागुरूपासूनच प्रारंभ केला हें यथायोग्यच होय.

काकावाडी,<br>
वर्धा<br>
२१-७-४६

काका कालेलकर

# अंतरींचे बोल

— १ —

या मंगल प्रभातीं आमच्या नम्र अभिवादनाचा स्वीकार कर. हे प्रभो! तुझ्या पवित्र प्रेरणेचे सोनेरी किरण आमच्या आराध्य विश्वधर्माच्या सत्संकल्पावर निरंतर पडत राहोत--हाच आशीर्वाद दे. अखिल विश्वेश! पुनः एकदां नमस्काराचा स्वीकार कर, विश्वात्मन्!

— २ —

कृष्णाची ती मोहिनी मुरली, हाय! केव्हांपासून त्या विजन वनांत वाजत आहे, पण तुम्ही तर ती बांसरी ऐकतच नाहीं? काय? दीन दलितांचा आर्त उसासा तुम्हीं कधीं ऐकला आहे? जर ऐकला असल तर त्याच करुण क्रंदनांत तर आमच्या मोहनाच्या प्रिय मुरलीची सुमधुर स्वरलहरी सदा तरंगत असते. तुम्ही कदाचित् एकाद्या ललित माधवी-निकुंजांत मुरलीची तान ऐकायला जात असाल. अरे बाबांनो, हीच तर तुमची चूक आहे. या दारुण दारिद्र्ययुगांत आमचा तो करुणामय कृष्ण त्या कल्पित कुसुमकुंजांना सोडून या दीन दलितांच्या पीडित हृदयांमध्यें येऊन बसला आहे. तेव्हां आपल्या त्या दीर्घकालापासून अलग झालेल्या मोहनाला आतां, येथेंच शोधूं या अन् येथेंच पुजूं या!

— ३ —

आमचा तो विश्वविमोहन विहारी आज त्या विजन वनांत वेदनेची कशी मधुर मुरली वाजवीत आहे ! ऐकणारांनो ! जरा तें वेधक वादन विव्हळ होऊन ऐका तर खरें ! त्या बांसरीच्या सदय स्वरांतून दलितांचें अन् पतितांचें कसें हृदयविदारक करुण-संगीत प्रवाहित होत आहे ! दुर्बल पतितांना घृणा-पूर्वक ठोकर मारणारांनो, धुवून टाका आज त्या मोहन-मुरलीच्या रसधारेंत आपापलीं मलिन मनें—

— ४ —

तसें पाहिलें तर, नाथ, तुझीं सहस्रों सुंदर नांवें आहेत; पण माझी तर कांहींशी अशी धारणा आहे कीं तुझें 'पतित-पावन' हें नामच सर्वांत मधुर, सर्वांत सुंदर व सर्वांत अधिक प्रिय आहे ! होय ! तूं पतित-पावन आहेस, पतित-प्रिय आहेस, पतित-वत्सल आहेस अन् पतित-बंधु आहेस ! पतितांशीं तुझा अनादि अनंत संबंध आहे. पतितांच्या नात्यानेंच मी तुला जाणूं शकेन. पतितांच्या बरोबरच मी तुला ओळखूं शकेन. धन्य आहे तुझी पतितपावनता प्रभो !

— ५ —

करुणालय कृष्ण ! तुझ्या करुणेचा अंत कुणाला लागला आहे ? तुझ्या दयेचा थांग कुणाला लागला आहे ? हे आमच्या महा–महा–कारुणिक कृष्णा ! पोहोंचवून देच आज, करुणामय शरणाजवळ आमच्या निष्करुण अंतः-करणाला ! धुऊन टाक आज आपल्या दयाधारेंत आमची अमानुष हृदय-हीनता, हे करुणालय कृष्ण ! हे करुणामय कृष्ण !

— ६ —

प्रभो ! आमच्यापैकीं प्रत्येकाच्या वात्सल्यपूर्ण हृदयामधून तुझ्या दयेचा आणि करुणेचा झरा निरंतर स्रवत राहो ! नाथ ! आमच्या अंतःकरणांत तुझ्या कृपेची शुद्ध सात्त्विकता सदासर्वदा निवास करो ! संशय तर याच क्षणीं स्वप्नाच्या जगतांत निघून जावो आणि स्वर्गीय विश्वास–वृक्ष आमच्या श्रद्धामय अन्तर्विश्वांमध्यें निरंतर विकसित होत जावो ! प्रियतम ! तुझ्या

प्रेमावर आम्हीं निष्काम भावानें प्रीति करीत रहावें आणि तुझ्या महा–महा-कारुणिक रूपाचें चारुचित्र आपल्या अंतःपटावर अंकित करावें ! हा शुष्क अंतरात्मा सदा तुझ्या अनुरागरसानें आर्द्र राहो आणि तुझ्या प्रीतीचा प्याला प्याला प्रतिपल आमच्या तृषित ओठांना स्पर्श करीत राहो. प्रभो ! हीच कामना आहे, हीच प्रार्थना आहे !

— ७ —

हे माझ्या दयाळू दात्या ! तुझ्या दारीं जें मागितलें तें मिळालें ! तुझी दया मागितली ती मिळाली. तुझी प्रीति मागितली तीही मिळाली अन्, आज हे प्रेममूर्ति ! तुझी स्वतःची याचना केली तों तूंहि मिळालास ! आतां मागायला कांहीं राहिलेंच नाहीं, आतां मिळवायचें कांहीं शिल्लक नाहीं ! तुझ्या या दानशील कराचें आज पुनःपुनः मी कां बरें चुंबन घेऊं नये ?

— ८ —

कोण म्हणतो प्रार्थना विफल होते म्हणून ? प्रभु आमच्या अहंकारशून्य अंतस्तलांतून निघालेली प्रत्येक प्रार्थना ऐकतोच ऐकतो ! परंतु आमचा अंतरात्मा अन् आमची प्रार्थना यांच्यामध्यें ऐकात्म्य होतेंच आहे कधीं ? आमच्या या क्षणिक आसक्ति ऐकात्म्य होऊंच देत नाहींत. करुणामय प्रभूचें प्रत्यक्ष दर्शन व्हावयास कितीसा विलंब लागणार ? कमतरता तर खरोखर आमच्या प्रार्थनेंतच आहे.

— ९ —

होय ! माझा ईश्वराच्या अस्तित्वावर विश्वास आहे आणि प्रभूच्या प्रकट होण्यावरही पूर्ण विश्वास आहे. कारण माझी प्रार्थनेवर अटल श्रद्धा आहे. आपल्या या आवडत्या श्रद्धेकडे मी एक क्षणभरहि अविश्वासी दृष्टीनें पाहूं शकत नाहीं ! विचारा आणखी काय विचारतां तें !

— १० —

बापरे, किती उंच अन् अवघड जिना आहे माझ्या स्वामींच्या दया-मंदिराचा ! कठीण आहे आपल्या बळावर तेथपर्यंत चढून जाणें, तेथपर्यंत

पोहोंचणें ! एकीकडे शिरावर अपराधांचें ओझें लादलेलें आहे अन् दुसरीकडे कपटी स्वार्थानें सारें शरीर जखडून टाकलें आहे. आणि डोळ्यांसमोर मोहाची काळोखी पसरली आहे. हाय ! आपल्या त्या अज्ञ जीवनाला मी कठोरतेच्या अन् क्रूरतेच्या ओघांत व्यर्थ कां बरें राहूं दिलें ! माझ्या हृदयघटांत आज वेदनेचा एक थेंबही नाहीं. तेथें जाऊन पोहोंचलों, तरी त्या प्रिय कृपावन्त स्वामीला मी काय बरें नजराणा देऊं ? हं, तो दयाळू प्रियतम इच्छील तर आपल्या करुणेचा पाश फेंकून मला त्या उंच जिन्यावर खेंचून घेऊं शकतो. अन् तोच प्रेमळ साकी ( मद्य देणारा सेवक ) पश्चात्तापाच्या चषकांत आपल्या कृपामधूचे दोन घोट ओतून मोठ्या मजेंत मला पाजवूं शकतो.

— ११ —

मित्रा ! का एकाद्या गरिबाच्या जीवाला होरपळतोस ? ती धगधगीत ज्वाला काय कधीं तुझ्या अंतस्तलापर्यंत पोहोंचत नाहीं ? अन् ती ( आंच ) जर पोहोंचत नसेल तर 'एकात्मवादा'चा पोकळ प्रचार कां बरें करीत आहेस ?

— १२ —

ज्याला तुम्ही पतित अन् पापी म्हणतां तोच तर आज तुमच्या ईश्वरी दयेस वास्तविक पात्र आहे. शक्य असेल तर टाका धुऊन आपल्या प्रीतिजलानें त्याच्या अंतःपटावर पडलेले कृष्णकलंक ! आश्चर्य वाटेल तुम्हाला कीं, असें करण्यामुळें तुमच्या अंतरंगांतील घाणेरडे कलंकहि आपोआपच धुऊन जातील !

— १३ —

काय करूं ? कसा दूर करूं आपला हा अटल विश्वास ? हृदयपटावर कोण जाणे कां तें, पण हें निश्चितच झालें आहे कीं जे आपल्या पश्चात्तापाच्या पुनीत अश्रुजलानें या पापपरितप्त धरेला सदा भिजवीत राहतील त्यांच पतित लोकांना करुणालय भगवानाचें देवदुर्लभ स्नेहदान भरपूर मिळेल ! जे स्वतःला न्यायाधीश समजण्याऐवजीं सदा अपराधीच समजत

राहतील, तेच दीन दलित प्राणी त्या हृदयविहारी कृष्णाचे लाडके होतील ! असा संभव आहे, माझी ही चूक असेल, पण मी तर म्हणेन कीं हजार वेळां लखलाभ होवो मला आपली ही आवडती चूक !

— १४ —

एकाद्या सदाचारी साधूचें मनुष्यत्व जितकें पवित्र अन् आदरणीय आहे, तितकेंच एकाद्या पतित पाप्याचेंही नाहीं काय ! शक्य असेल तर त्याचा पापज्वर आपल्या दयेच्या औषधानें दूर कर बन्धु ! त्या ठोकर खाल्लेल्या अनुकंपनीय रोग्याला घृणापूर्वक 'पापी' या नांवानें पुनः पुनः संबोधून आतां अधिक व्यथित करूं नकोस !

— १५ —

इथें आपल्या प्रेमभावनेच्या मंजूषेंतून जराशी दया त्या अधःपतित गरिबांना दे, अन् तिथें जाऊन तूं त्या दयानिधीच्या दयेचा अतूट खजिना हवा तितका लुटून घे ! तिथें त्या प्रियतमाच्या क्षमाभावनेचा मधुर रस पिण्याची इच्छा करीत असशील तर येथें या तृषित अपराध्यांना दयामृताचे दोन घोट पाजीत जा !

— १६ —

जो राम अन् रहीमाच्या दर्शनाचा तहानेला नसेल तो दुर्दैवी प्राणी निःसंशय अतिनिष्ठुर होय. दयाच तर त्या स्वामींची सर्वश्रेष्ठ देणगी आहे. त्या दयानिधीच्या दयेला अशा प्रकारें कुठपर्यंत विसरून जाणार ? त्या दयाळू ईश्वराच्या ज्या दयारूपी निर्मल जलाच्या योगें आम्ही या सुंदर उद्यानांत लहानाचे मोठे झालों आहोंत, त्याच पवित्र दयेला आम्ही मदांध जन आज किती बेफिकीरपणें लाथाडत आहोंत ! हाय ! मरणोत्तर आम्हाला त्या रामचन्द्राचे प्रेमळ चरण कसे लाभतील ? जर आम्ही सावध झालों, तर ठीक आहे, नाहीं तर नंतर पश्चात्तापच हातीं उरावयाचा !

— १७ —

करुणेची रसाळ रसवती धारा तुमच्याही शुष्क हृदयावर अखंड वाहत राहो. पण तुमच्या खोट्या अभिमानाची आग तिला वाहूं देईल तर ना !

आंत तर भरला आहे जळजळीत द्वेष अन् दंभ, मग दयेचें शीतल जल तुमच्या हृदयाला कसें काय शांतवणार ? अंतरांत तर जळते आहे खोट्या मोठेपणाची आग, मग करुणेची रसार्द्र धारा तुमच्या हृदयाच्या मरुभूमीचें कसें काय सिंचन करणार ? मानसन्मानाचा त्याग करा अन् मग पहा तुमचें जीर्ण व जर्जर जीवन ईश्वरी करुणाधारेनें थबथबून जातें कीं नाहीं !

— १८ —

तुमच्या आत्म्यामध्यें चांगुलपणा अन् दया यांचें जें भांडार पूर्ण भरलेलें आहे तें तुम्ही दोन्ही हातांनीं सर्वत्र उधळून कां देत नाहीं ? जितकें तुम्ही तें लुटवाल तितकेंच तो सृष्टिकर्ता दाता तें भरून काढील. जगांत यानंतर तुम्हाला कसलाच वांकडेपणा दिसणार नाहीं ! तुमचें स्वर्गोपाविश्व त्या दिवशीं द्वेष अन् दुःखापासून मुक्त होईल ! तुमच्या हृदयसागरांत पवित्र प्रेमाच्या लाटा उसळूं लागतील ! सर्वत्र श्रीकृष्णाचेंच स्मित प्रस्फुटित होत असलेलें दिसून येईल. जरा उघडा तर खरे आपल्या त्या नेकी अन् दयेच्या बंद खजिन्याचे दरवाजे, माझ्या प्रिय बंधूंनों !

— १९ —

क्षमाच तर आज तुमच्याजवळ सर्वश्रेष्ठ देणगी आहे ! मोकळें कर ना रे मित्रा क्षमेचें तें विशाल भांडार ! दोन्ही हातांनीं लुटवून दे ना आपली ती हृदयसंपत्ति ! करुणेच्या आशीर्वादानें शक्य असेल तर रंगवून टाक आपल्या प्रिय जीवनाचा हा गलिच्छ [ बुरखा ] अंचल !

— २० —

दयानिधि येशूशीं संबद्ध ' किरिस्ताव ' शब्दाकडे तुम्ही घृणेच्या दृष्टीनें कां बरें पाहतां ? त्यापेक्षां शरमेनें चर्या कां झांकून घेत नाहीं ? हे स्वार्थान्धांनो ! त्या महात्म्याच्या पवित्र रक्ताचे कृष्णकलंक डाग आजही तुमच्या हृदयरूपी विद्रोही वस्त्रावर पडलेले आहेत ! मानवांनो ! अजूनही त्या महापुरुषाच्या कृपाळू ' क्रूसा 'च्या करुणेनें आपापलीं पापें धुऊन टाका !

— २१ —

आम्हांला पुन्हां भगवान् बुद्धाला शरण जाणें भाग पडेल अन् तेंहि अत्यंत

तातडीनें ! हें मोहसंमूढ विश्व कदाचित् फिरून एकदां त्या तिरस्कृत ' शरण-त्रयी 'च्या समन्वयांत आपल्या कल्याणाचा मार्ग पाहील. आमच्या सम्मोहनसुखवादानेंच आम्हांला निर्वाणाच्या आनंद मार्गापासून विन्मुख केलें आहे. तेव्हां आपली ही भयंकर-चूक आम्हांला आज ना उद्यां सुधारावीच लागेल.

— २२ —

हे पतित पापीच तर वास्तविकपणें प्रेमास पात्र आहेत. धरूं द्या या बिचाऱ्यांना तुमच्या दयेचा पदर; कारण दैन्याचे चरण आज या लोकांनीं आपल्या अश्रूंनीं धुतले आहेत. पसरवूं द्या या गरिबांना तुमच्या प्रेमाचा प्रकाश आपल्या अंधकारमय अंतस्तलावर; कारण घृणा अन् निराशेच्या आगींत यांचा अंतरात्मा पुरा तप्त होऊन निघाला आहे ! बस, आतां पिऊं द्या या तृषार्त प्राण्यांना आपल्या हृदयघटांतील ती ईश्वरी प्रेमसुधा, हे विश्वबान्धवांनो !

— २३ —

हें मुळींच विसरूं नका कीं, तुमचा अंतरात्मा करुणा अन् दयेच्या धारांमध्यें अवगाहन करूनच निष्कलंक होऊं शकेल. तुमचें जीवन ईश्वराच्या एका अस्पष्ट प्रेमसंकेताबरोबर एकाद्या दिवशीं याच धवल धारांमध्यें निमज्जित होईल ! हेंच काय तें सत्य आहे, बाकी सारा भ्रम आहे.

— २४ —

वेदनेचा मर्मभेदी प्रहार तर या पाषाण हृदयावर अजून झालेलाच नाहीं तर मग दयेची करुणधारा कुठून अन् कशी बाहेर पाझरणार ? एकादा जबरदस्त घाव तर खाऊं दे, मग पहा तें वज्रकठोर हृदय किती कोमल, किती सरस अन् किती सदय होऊन जातें तें !

— २५ —

माझी ही शुद्धि काय कामाची ? आग लागो अशा या शुद्धीला जिनें मला आज महान् स्वार्थी, अभिमानी अन् महान् क्रूर बनवून या हत्यारी नरकांत ढकललें आहे. मला तर अजूनही कोणी तरी वेदनेचें

विष पाजवून बेशुद्ध करील तर किती छान होईल ! केव्हां बरं मिळेल मला ती वेदनेची आवडती बेशुद्धि ?

— २६ —

सुखवस्तु लोकांचे दोस्त मित्र तर येथें शेंकडों नव्हे हजारों आहेत. परंतु दुःखी लोकांच्या जवळ बसणारे मूर्ख कितीसे असतील ? हंसण्याखिदळणाऱ्यांच्या उल्हासाला साथ देणारे तर येथें भाराभर मिळतील आणि खूप स्वस्तही मिळतील. पण गरीब, दुःखीकष्टी लोकांच्या विषयीं खरीखुरी सहानुभूति बाळगणारे या स्वार्थपूर्ण जगाच्या बाजारांत विरळाच, आणि जरी क्वचित् असले तरी ते खूपच महाग मिळतील. लोक तुम्हांला पागल खुशाल म्हणोत. पण तुम्ही तर या 'वाह्वा' प्रेमी लोकांची नव्हे तर त्या 'हाय' प्रेमी लोकांचीच सेवा करीत रहा ! स्वामीशीं मीलन होण्याचा राजमार्ग तर 'निश्वास' 'वेदना' अन् 'अश्रू' यांचाच आहे.

— २७ —

वाईट असतें बरें, अत्यंत वाईट असतें पीडित हृदयाचें दुःख ! आज तुम्ही एकाद्या गरिबाच्या झोपडीला आग लावा, उद्यां तुमचा भव्य अन् विशाल महाल धुळीला मिळेल ! आज तुम्ही एकाद्या दीनदुबळ्या माणसाच्या अश्रूंचा उपहास करून एक घटकाभर खुशाल हंसा, उद्यां तर तुम्हांला अथांग शोकसागरांत बुडावेंच लागेल. यासाठीं तर म्हणतात कीं, ईश्वराला एक वेळ भ्याला नाहींत तरी चालेल पण जर आपलें भलें इच्छित असाल तर कहर गुजरविणाऱ्या दुःखाला हमेशाच भीत जा !

— २८ —

तुम्ही आपल्यांतील सर्व दोष जनसेवेच्या द्वारांच दूर करूं शकाल. तुमच्या या आंतरिक दुर्बलतेला तुमचा स्वार्थ आणि तुमचा अहंकार यांनींच हें आत्मघातकी स्वरूप दिलें आहे. आतां प्रेममयी लोकसेवाच तुम्हांला कारुणिक पश्चात्तापाच्या मंदिरांत या भीषण मृत्यूपासून मुक्ति देईल.

— २९ —

सेवेमध्यें 'लोकोद्धारा'ची भावना कसली ? सेवेच्या द्वारां आपण

दुसऱ्यांचा नव्हे तर स्वतः आपलाच उद्धार करीत असतों. आपण आपल्याच भोळ्या बांधवांच्या बरोबर विषमतेचा अमानुषी नीच व्यवहार करून कांहीं लहानसहान पाप नाहीं केलें. आपल्या त्याच नरकतुल्य पापाचें प्रायश्चित्त आपल्याला आज स्वार्थशून्य सेवेच्या द्वारां करावयाचें आहे. म्हणून सेवेंत उद्धाराची एकादी भावना जर असेल तर ती आत्मोद्धाराचीच आहे.

— ३० —

होय ! आम्हांला जाह्नवी-जलाच्या पवित्रतेविषयीं अजूनही शंका आहे. परन्तु, प्रत्येक आर्त अनाथ व्यक्तीच्या अश्रुबिंदूच्या स्वर्गीय पवित्रतेविषयीं मात्र खरंच सांगतों आम्ही, आम्हांला लवलेशहि शंका नाहीं. तें जाह्नवी-जल आमचीं पापें धुवो किंवा न धुवो पण हे तीर्थकण तर आमच्या मलिन अंतस्तलांतील समस्त मालिन्य तत्काल धुवून टाकीत आहेत. कोण मतिमूढ आर्त अनाथांच्या पवित्रतम अश्रुबिंदूंचा अनादर करूं इच्छील ?

— ३१ —

हं, सांगून टाका बरं जीवनाचा तुम्हीं एकादा नवा अर्थ लावला असेल तर ! ऋषींनीं तर 'जनसेवा' हाच एकमात्र अर्थ घेतलेला आहे. भोग तर हा जीवनाचा अर्थ कधींच होऊं शकत नाहीं अनू योगाचा अंतर्भाव सेवेंत होतोच आहे.

— ३२ —

विश्वबंधुत्वावर अंतःकरणापासून विश्वास ठेवा; कारण ही तर तुमच्या मनुष्यत्वाची एक मोठी भूक आहे कीं तुमच्यावर साऱ्या जगानें डोळे मिटून पूर्ण विश्वास ठेवावा अन् तुम्हीं मात्र या ईश्वरी सुंदर सृष्टीकडे सदान्‌कदां संशयात्मक दृष्टीनेंच पहात रहावें ! अशी अपेक्षा करणें हा ईश्वराशीं विद्रोह आहे.

— ३३ —

विश्व जाळून टाका हवें तर, पण श्रद्धेवर कुठाराघात करूं नका. विश्वासाची निंदा करूं नका. विश्वासाची चेष्टा करूं नका. काय माहीत नाहीं

— ४१ —

सत्य अन् क्रूरता यांचें कसलें सख्य ? क्रौर्याची उत्पत्ति तर खोटया अहंकारांतून झाली आहे पण खरेपणामध्यें यत्किंचितही अहंकाराला स्थान नसतें. धर्म आणि आस्तिकतेच्या नांवावर महमूदानें आणि औरंगजेबानें निर्दयतेला अनुचितपणें छातीशीं कवटाळलें होतें, परंतु अखेरशेवटीं आपले अंतिम क्षण त्यांनाही भयंकर चुकीनें भरलेले दिसून आले. क्रूरतेची भयानक मूर्ति समोर उभी राहिलेली पाहून ते विश्वविजयी विख्यात जुल्मीही पोरक्या पोराप्रमाणें ओक्साबोक्सी रडूं लागले. पण त्या बिचाऱ्यांचे अश्रु ईश्वराच्या चरणांपर्यंत पोहोंचले असतील कीं नाहीं याची शंकाच आहे. कारण ते अश्रु जिवंत नसून मृतवत् होते !

— ४२ —

कधीं ना कधीं तुम्ही पश्चात्तापाच्या पायऱ्यांवर चढालच, चढाल! एकादे दिवशीं तुम्ही या तिरस्कृत अश्रूंचें स्वागत कराल आणि या अपमानित निःश्वासांची पूजा कराल पण सर्व व्यर्थ ! त्या दिवशीं तर हृदयाच्या शुष्क अन् होरपळलेल्या शेतांत पावसाचें पाणी पडेल त्यावेळीं प्रायश्चित्ताचा सुवर्ण क्षण टळून गेलेला असेल. जीवनाची कृष्णसंध्या तुमच्या धुगधुगत्या डोळ्यांसमोर एक अज्ञात संकेत करीत असेल. खरी संधि तर बाबांनो आजच आहे. पश्चात्ताप अन् प्रायाश्चित्त करण्याची सुंदर वेळ तर आजच आहे.

— ४३ —

आम्हीं पतित पाप्यांनींही आज सर्वांनुमतें एक ठराव पास केला आहे. त्याच निश्चयानुसार आतां एक टोळी करून पतित-पावन रामाच्या दया दरबारांत जाऊं आणि त्या प्रभूकडे अपील करूं कीं, "हे नाथ ! आम्हीही प्रेममयी सेवेच्या अग्नींत आपल्या अवमानित जीवनाचा होम करावा. यासाठीं आमच्या सर्व दुर्बलता तूं आपल्या कृपा अन् करुणेच्या योगें धुवून टाक."

— ४४ —

आणखी काय प्रमाण हवें आहे तुम्हांला ? आमच्या आस्तिकेचा हाच सर्वांत बळकट पुरावा समजला पाहिजे कीं पश्चात्तापाच्या पुनीत बलि-

वेदीवर आमच्या हृदयाचे थोडे वेदनापूर्ण उष्ण अश्रू आम्ही वाहत आहोंत. आपल्या रुसलेल्या रामाची समजूत आम्ही रडूनकढूनच काढूं शकूं. होय आमचा असाच विश्वास आहे. आणखी कोणता पुरावा रुजूं करावा आम्हीं तुमच्या कचेरींत आपल्या आत्मविश्वासाचा ?

— ४५ —

प्रभुता अन् सहृदयता यांचा संयोग कुठून व्हायला ? जोडी तर ब्रह्मदेवानें प्रभुता आणि हृदयहीनता यांचीच बनविली आहे ! जर आज प्रभुता आणि सहृदयता यांचा संयोग शक्य असेल तर मग जगांत 'असंभव' शब्दासाठीं स्थानच नाहीं.

— ४६ —

धन्य ! उच्चनीचत्वाच्या या मनःकल्पित गलिच्छ भेदभावाला हे धर्मव्यवसायी लोक 'ईश्वरविधान' म्हणतात ! जघन्य स्वार्थीपणाला या धूर्त ठकांनीं 'ईश्वरनिर्दिष्ट' म्हणून वर्णिलें आहे. आपल्या चिर-अभ्यस्त पापांना आणि कुसंस्कारांना सुरक्षित राखण्यासाठीं या सभ्य गुंडांनीं धर्माचा आश्रय घेऊन, उच्चनीचपणाचे हे अनेक अमानुषीय भेद, मानवसमाजांत रचून ठेवले आहेत. या निर्लज्ज धर्मव्यवसायांना शरमेचा स्पर्शही झाला नाहीं.

— ४७ —

दुसऱ्यांचे दोष पहायला आतां आम्हाला फुरसतच नाहीं. प्रथम आपली अगणित छिद्रें तर पाहूं या. द्वेष-दृष्टीच्या सहाय्यानें दुसऱ्यांचे दोष आम्ही स्पष्टपणें पाहूंच शकत नाहीं ! दयेच्या अंजनानें प्रथम आपली दृष्टि स्वच्छ करूं या आणि मग परदोषदर्शनाच्या हानिकारक व्यवसायांत लक्ष घालूं या. उगीचच काय म्हणून प्रभूच्या लीलेची टर उडवीत फिरावें ?

— ४८ —

आमच्या अंतरंगांतील पापच तर पांढरा कोड आहे. अन् या कोडाचे डाग कुणाच्या शरीरावर नाहींत ? मोठ्याच्याजवळ पुरेशीं साधनें आहेत, ते आपले डाग मोठ्या कलात्मक रीतीनें लपवितात पण लहानांचे सफेत डाग स्पष्ट दिसत राहतात. बस, फरक एवढाच आहे. नाहीं तर 'उंच चढून पाहिलें तर सारे एकाच माळेचे मणी.'

— ४९ —

कसे आहांत तरी बाबांनो तुम्ही ! दुसऱ्यांच्या अंतरांतील दोषांकडे पाहून आज हंसत आहांत ! तुमचें कर्तव्य तर हें आहे कीं त्या गरिबांच्या दुर्बलतारूपी दर्पणांत आपल्याही पुष्कळ दोषांचें प्रतिबिंब पहावें अन् पुनः पुनीत पश्चात्तापाच्या अश्रूंनीं त्यांच्या व आपल्या दोघांच्याही मधील दोष धुऊन टाकावेत ! अरे बाबा, या व्यंगपूर्ण उपहासाचा परिणाम अखेरशेवटीं रडण्याशिवाय काय होणार ? दुसऱ्यांचा उपहास करून करून, अरेरे, त्या परमपित्याच्या दयेची भिक्षा मागण्याची ही सुवर्णसन्धि तुम्ही फुकटच दवडीत आहांत !

— ५० —

एकाद्याच्या कांहीं दोषापासून कां बरें फायदा करून घेण्याची इच्छा करतां ? तुम्हाला जर लाभ करून घ्यावयाचा असेल–अन् तो घेतलाच पाहिजे म्हणा–तर त्याच्यामध्यें जी भलाई आहे तिच्यापासून घ्या करून लाभ. त्याच्या भलेपणापासून तुमचें जें भलें होईल त्याबद्दल त्याचे सप्रेम आभार माना, अन् त्याच्यांत जो दोष असेल तो दूर करण्याबद्दल दयाळू ईश्वराची मनापासून प्रार्थना करा. हे मित्रांनो ! कल्याणमार्ग तर हाच आहे.

— ५१ —

आतां हे बिचारे सख्या भावाप्रमाणें प्रेमानें एकमेकांस कसे बरें भेटणार ? मोठे अन् छोटे यांच्यामध्यें ही किती मोठी भयंकर खाई येऊन पडली आहे ! क्षमा करोत आमचे श्रीमंत बंधु, ही विस्तीर्ण अन् खोल खाई त्यांनीं आपल्या अधःपतनासाठीं स्वतःच खोदलेली आहे. ते जर संधी देतील तर त्यांचे हे अधःपतित गरीब बंधु अजूनहि ही खाई पार करून त्यांना कडकडून भेटूं शकतील. मोठेपणाच्या ज्वालेनें होरपळलेल्या त्यांच्या शरीराला हे क्षुद्रजन अजूनसुद्धां आपल्या प्रेमाश्रूंनीं न्हाऊं घालूं शकतील. आमच्यांतून आज असे कितीसे मायेचे पूत निघतील कीं जे आपल्या हाडांनीं ती घातकी खाई सपाट करून या हजारों वर्षांपासून दूर पडलेल्या आपल्या बांधवांना प्रेमाच्या मीलन-मंदिरांत भेटविण्याची इच्छा करतात ?

— ५२ —

तुम्हीच सांगा बरें या दुःखितांची अन् सुखवस्तूंची बरोबरी कशी होऊं शकेल ? हे अभागी कधीं स्फुंदतात, कधीं आक्रोश करतात तर कधीं किंकाळया फोडतात; अन् हे लोक कधीं नखरे करतात, कधीं थट्टामस्करी करतात व कधीं हंसतात तर कधीं गातात. जमीनअस्मानाचें अंतर ! या अशुभ रडतोंड्यांचें तोंडहि ते पाहूं इच्छित नाहींत; म्हणून तर त्यांच्या दरवाज्यांसमोरून या अभाग्यांना लाथ मारून हांकून लावलें जांत आहे. खरेंच ! या दुष्ट दुःखितांना जर धुडकावून लावलें नाहीं तर त्यामुळें त्या सुंदर सुखवस्तु लोकांच्या झोंपेचें खोबरें झाल्यावांचून रहावयाचें नाहीं. अन् त्यांच्या ख्यालीखुशालींत अन् विलासलीलांमध्यें किती खंड पडेल याची जरा तरी कल्पना ? कांहींहि असो; विलासाच्या त्या पोलादी अभेद्य किल्ल्यांत बंद होऊन राहणारे हे सुखी सेनापती या दीनदुबळ्यांच्या अश्रूंशीं अन् निश्वासांशीं सामना करूं शकणार नाहींत.

— ५३ —

सावधान ! आपल्या दुर्लभ हास्यविनोदाचा अशा प्रकारें अपव्यय का बरें करतां ? जितकें तुम्हांला हंसावयाचें असेल तितकें हंसून घ्या पण अश्रूंच्या झिरझिरीत पडद्याच्या आड जाऊन हंसा. अश्रूंनीं भिजलेलें हास्य पुनः तुम्हांला मृत्युतरंगिणीच्या तीरावर रडवूं शकणार नाहीं. विश्वास ठेवा बरें, नाहींतर तुमचा हा सारा अल्लड आमोदप्रमोद् एकादे दिवशीं अथांग शोकसागरांत तुम्हाला बुडवून टाकील.

— ५४ —

तुमचें साह्यहि व्यर्थ अन् तुमची दयाहि व्यर्थ. तुम्ही त्या गरिबाला मदत केलीत खरी पण समाजांत त्याची मान खालीं करून—त्याच्यावरील आपल्या उपकाराची त्याला जाणीव देऊन ! तुम्ही त्या अपराध्यावर दयाहि केली पण त्याला करपटासमान तुच्छ लेखून ! म्हणून तर तुमची दयाभावना अन् तुमची सेवासहायता सात्विक न राहतां तामस झाली. तुमच्या क्षुद्र अहंकारानें तुम्हाला भयंकर दगा दिला. तरीसुद्धां अजूनहि संधि आहे.

ईश्वरी करुणेच्या प्रवाहांत आपली तामसी सेवा अन् दया पश्चात्तापाच्या साबणानें धुऊन स्वच्छ करा. ध्यानांत ठेवा कीं सात्विकताच कल्याण करणारी असते.

— ५५ —

ज्यांच्या डोळ्यांवर धनदौलत अन् प्रभुतेची धुंदी आलेली आहे ते तहानभुकेनें झोकांड्या खाणाऱ्या गरीब कंगालांना बुटांच्या ठोकरा मारणारच. यांत आश्चर्य कसलें ? श्रीमंत लोक डोळे उघडे ठेवून चालतातच कधीं ? हेंच आश्चर्य आहे कीं, जोडे खाणारे हे अभागी गरीब पुनः पुनः त्याच मदांध अमीरांच्या दारावर लाथा खायला कशाला जातात !

— ५६ —

गरिबाचें सुखदुःख बिचारा गरीबच समजूं शकतो. अन् गरिबाची सेवासहायता पण गरीबच करूं शकतो. आर्त अनाथांच्या झोपड्यांतून निघालेला तहानभुकेचा भयंकर आक्रोश मोठ्या मोठ्या सुंदर हवेल्यांच्या आंत कधीं पोहोंचूंच शकत नाहीं. दीनदुबळ्यांचें रक्तशोषण करणारे हृदयहीन अमीर कधीं कुणा असहाय अनाथाची सेवासहायता करतील असें समजणें ही मूर्खपणाची परिसीमा आहे.

— ५७ —

विलासी अन् ईश्वरभक्त ! खूप छान ! विषयविलासाचाच जर तो अनन्य भक्त असेल तर गोष्ट वेगळी होय. 'विलास-देवा'चा तो अनन्य भक्त होऊं शकतो खरा. केवळ 'देवा'चा नव्हे. तर मग मंदिरामध्यें ध्यान लावून तासन्तास जी पूजा-अर्चा तो करीत असतो, तें सर्व काय आहे ? ती तरी आपल्या विशुद्ध विलासदेवाची सेवा-पूजाच आहे झालें ! दुसरें काय ?

— ५८ —

हे अमीरांनो ! असूयेची कशी निर्धूम आग जळत आहे तुमच्या कोळशासारख्या काळ्या अन् दगडासारख्या कठोर हृदयांमध्यें ! अरेरे ! या गरीबांची थोडीहि प्रगति तुमच्यानें पाहवत नाहीं ना ? या बिचाऱ्यांना तुम्ही त्याच दशेंत सदा पाहूं इच्छितां—ज्या दशेंत दुर्भाग्यानें हे दुर्दैवी जीव उत्पन्न

झाले आहेत ! या दलितांनीं आपली उन्नति करून घेणें हा जणूं काय एक गुन्हा आहे, एक पाप आहे. तुमचा सारा मोठेपणा या गरिबांच्या प्रगति-विरोधांतच आहे. समाजांतील प्रतिष्ठित लोक आहांत ना ? तरीच !

— ५९ —

वरिष्ठांनीं कृपा करून कमींत कमी येवढें तरी विसरून जाऊं नये कीं, कनिष्ठांचाहि तसाच अंतरात्मा आहे– जसा त्यांचा आहे. त्या गलेलठ्ठ अमीरांच्या प्रमाणेंच हे दुबळे गरीबहि मान-अपमान अन् सुखःदुख यांचा अनुभव घेऊं शकतात. त्या अमीरांनीं मोठेपणाची मदिरा पिऊन या बिचाऱ्यांचें तोंड बंद केलें आहे किंवा यांचीं हृदयें ठेंचून तुडवून टाकलीं आहेत, म्हणून काय झालें ? अंतर्यामीं ईश्वर तर सर्व ऐकतो आहे अन् सर्व पहात आहे. त्या मोठ्या माणसांनीं विसरूं नये कीं तोच प्रत्येक हृदयांत वास करणारा राम त्या मुक्यांची भाषा आहे अन् तोच त्या हृदयविहीनांचें हृदय आहे.

— ६० —

आमच्या "स्वार्थ-संहितें"तील तो महामंत्र काय तुम्हीं कधीं ऐकला आहे ? जर ऐकला नसेल तर आतां ऐका, "जग मूर्ख आहे. मीच एकटा बुद्धिमान आहें ! बाकी सगळे नास्तिक आहेत, अन् मीच एकटा आस्तिक आहें." ज्या कुणाच्या कानांत हा महामंत्र शिरला नसेल, अशा दुर्दैवी काफिरांना या जगांत राहायला कदाचित् जागाहि नसेल ! माझी तर कांहींशी अशीच कल्पना आहे.

— ६१ —

तुम्ही निर्दय आहांत, क्रूर आहांत ! तुमच्यासमोर कोणी पीडित प्राण्यानें अश्रू ढाळण्यास काय म्हणून यावें ? तुमचा हिंस्र चेहरा पाहतांक्षणींच त्याच्या नयनांतील पवित्र जल आंतल्या आंत सुकून जाईल. अश्रू तर अश्रूंना पाहूनच प्रकट होतात. तुमच्या हृदयांत दयेचा अन् करुणेचा संचार जर झाला असता तर पीडित अभाग्यानें आपल्या नेत्रांतून अश्रूंची झड लावली असती. तुमच्या अंतःकरणांत विश्वासाला अन् प्रेमाला थोडीहि

जागा असती तर त्या दलित दुःखितांनींहि तुमच्या हृदयद्वारावर ओक्साबोक्सी रडणें सुरू केलें असतें. पण त्या गरिबाच्या डोळ्यांतील पाणी तुमच्या आंधळया हृदयहीनतेच्या समोर आपली मानखंडना कधींहि करून घेणार नाहीं !

— ६२ —

हे दारुण दुःखानें पीडलेल्या प्राण्यांनो ! या पिशाचिनी क्रूरतेचा परित्याग करा अन् अजूनहि त्या महाकरुणेला छातीशीं कवटाळा ! हां, या कुलटा कठोरतेची संगत सोडून द्या अन् अजूनहि त्या महामहा दयेला आलिंगन द्या. निराश कां होतां ? तुम्हांला विशुद्ध श्रद्धाहि मिळेल, दिव्य दृष्टीहि मिळेल, अन् अनंत आनंदहि मिळेल.

— ६३ —

अरे, तुमचा एकादा गरीब भाऊ एक पायरी खालीं घसरला, तर त्याला उठवून वर घ्या. त्या अज्ञानी प्राण्याला संभाळून घ्या. अजूनहि त्या अभाग्याचा घोर पतनापासून बचाव करा. वरून दोन धक्के देऊन पापाच्या खड्यांत त्याला लोटून देण्यांत तुम्हाला काय मिळणार ? जो बिचारा कोणत्याहि प्रकारें कां होईना घसरून पडला आहे त्याला प्रेमळपणें उठवून पश्चात्तापाच्या पतितपावन मंदिरांत घेऊन जा ! ईश्वरानें तुमच्या ठायीं जो आत्मप्रकाश दिला आहे त्याचा हाच तर एक उत्तम उपयोग आहे.

— ६४ —

दया करा, आपल्या या पवित्र मनुष्यत्वावर दया करा. व्यर्थ कां बरें चेंदामेंदा करतां आपल्या उदार हृदयाचा दुष्ट घमेंडीच्या मस्तीमध्यें ? बिचाऱ्या डोळ्यांवर तरी दया करा अन् जरा खालीं पाहून चला ! रस्त्यावरील किती तरी अधःपतित दीन दुबळ्यांना तुम्ही सहजासहजीं ठोकर मारीत निघून जाता ! कल्पना तरी आहे तुम्हांला कीं किती अनाथांच्या अश्रूंवर थुंकून जाता तुम्ही ? या मदोन्मत्त यौवनाला तुम्ही खुशाल छातीशीं कवटाळून बसा, पण त्या उज्ज्वल वार्धक्याच्या चरणांवर अवश्य आपलें मस्तक टेकीत जा. मजा अन् मस्तीचा आनंद खूप लुटीत जा. पण त्या

अंतिम शिक्षेसाठींहि नेहमीं तयार राहात जा. जें कांहीं तुमच्याजवळ असेल तें सर्व घालवाना का, पण एका पवित्र मानवतेला मात्र अखेरपर्यंत हातांतून जाऊं देऊं नका.

— ६५ —

एकाद्याच्या वैयक्तिक अवगुणांचा कां बरें असा गुप्त शोध करीत फिरत असतां ? तुम्हांला जर शोधच लावावयाचा असेल तर त्या हृदयांत ईश्वरी प्रेमाची जी पीडा ( उत्कंठा ) किंवा विश्वाच्यासाठीं जें दुःख खळबळ माजवीत आहे त्या ठिकाणीं खोलपर्यंत घुसून त्या पीडेचा अन् दुःखाचा पुरा पुरा छडा लावा अन् खरा शोध आपल्याच अंतरंगांतील अवगुणांचा करा !

— ६६ —

या कटुवादी निंदकांच्या नीरस निंदेचा निरादर करूं नका. जमल्यास खुषीनें त्यांना मदत देऊन त्यायोगें त्यांचा अहंकार दूर करा. रामाचा रस्ता हेच अप्रिय पथ-प्रदर्शक दाखवितील.

— ६७ —

बाबांनो, एकाद्यावर दोषारोप करणें आज सोपें आहे, परंतु परमपित्या-समोर आपला बचाव देणें काय त्या अंतिम दिवशीं तितकेंच सुलभ होईल ? सत्याच्यासमोर तुमचा दंभयुक्त द्वेष तिथें कसा अन् कुठवर टिकूं शकेल ?

— ६८ —

किती आनंदाची गोष्ट आहे कीं ते तुमची निंदा करून या ना त्या प्रकारें प्रसन्न तर होतात ! तुम्हाला यांतच संतोष मानला पाहिजे कीं तुम्ही आपल्या निंदकांच्या प्रसन्नतेस कारणीभूत आहांत. तर मग बोलूं द्या, गड्यांनो, खुशाल तुमच्याविषयीं ज्याला जें बोलावयाचें असेल तें.

— ६९ —

तुमच्या तोंडावर जर कुणी थुंकलें तर वाईट नका मानून घेऊं. उलट त्याच्याकडे पाहून हंसत हंसत निघून जा. ज्या दिवशीं तुम्ही आपल्या टीकाकारांच्या थुंकीला फूल मानूं लागाल त्याच दिवशीं तुम्हाला दयाळू स्वामीच्या कृपाकोषांतून दुर्लभ ' अभयदान ' मिळेल !

— ७० —

या गोष्टीची आम्हीं जरा देखील परवा करतां कामा नये कीं आमच्या विषयीं लोक काय म्हणतात अन् काय म्हणतील ! आमचें ध्यान तर सदा याच एका ध्येयावर असलें पाहिजे कीं 'आम्ही कसे आहोंत अन् काय होऊं शकूं ?' तुम्हीच सांगा बरें, टीकेच्या कच्च्या आधारावर आमचें जर्जरित जीवन किती दिवस टिकूं शकेल ? जीवनाचें खरें साध्य तर सत्य आहे, सामान्य लोकांनीं केलेली भग्मसाट टीका नव्हे.

— ७१ —

तुमची ही कशी पितृ-पूजा आहे ? भावाचें हृदयरक्त पिऊन आपल्या श्रद्धेय पित्याचे पाय धुण्यास जात आहांत नाहीं कां ?

— ७२ —

दयाळू पिता तुमच्या या शालजोडीच्या महाग नजराण्याचा स्वीकार नाहीं करावयाचा ! माहित आहे ना कीं या मूल्यवान शालींतील प्रत्येक धागा त्याच्या शेंकडों दुर्बल मुलांच्या रक्तहीन शिरांपासून खेंचून ताणून तयार झाला आहे ?

— ७३ —

सोन्याच्या वाटींतून हें केशरी दूध कुणाला पाजवावयास घेऊन जात आहांत ? सावधान ! यामध्यें तुमच्या सख्या बहिणींचें रक्त मिसळलेलें आहे. तुमचा दीनवत्सल प्रेमी पिता याचा कसा बरें स्वीकार करील ?

— ७४ —

अरे, ही तर नुसती सांगण्यापुरतीच गोष्ट आहे कीं सुधारलेल्या जगांतून गुलामगिरीची पद्धत कायमची नष्ट झाली आहे. अरे बाबा, धर्मांत काय अन् व्यवहारांत काय गुलामीचें प्रस्थ अजूनहि जसेंच्या तसें माजलेलें आहे. केवळ कांहीं भागांत तिचें रूपांतर मात्र झालेलें आहे. हें तरी कोण सांगूं शकतें कीं अशी ही गुलामी कुठवर चालूं राहाणार ? वस्तुस्थिति अशी आहे कीं, गुलामगिरीनें आमच्या जीवनांत घर केलें आहे. ती आमच्या हृदयापासून आतां अलग होऊंच शकत नाहीं.

— ७५ —

दास बनवणें अन् दास बनणें या दोन्ही प्रकारच्या मलिन मनोवृत्ति आमच्या सभ्य समाजांत आजहि मोठ्या प्रमाणांत दिसून येतात. आम्ही आपल्या मूक आश्रितांना एकीकडे जरी आपला दास बनवून टाकलें असलें तरी दुसरीकडे आम्हीहि एकाद्या प्रभूचे वा महाप्रभूचे दासानुदास झालेलों असतों.

— ७६ —

एकाद्या गरीब असहाय व्यक्तीला तांब्याचे किंवा चांदीचे कांहीं गोल गोल तुकडे आम्ही देतो अन् त्याच्या मोबदल्यांत त्याचें शरीर, त्याचें मन इतकेंच काय पण त्याचा आत्माहि विकत घेण्याची इच्छा करतों. कसा स्वस्त अन् सुंदर सौदा आहे !

— ७७ —

आमचा तो भिकारडा नोकर आमच्यासमोर हात जोडून " अन्नदाते महाराज" असें कां बरें म्हणत नाहीं ? आमच्याच संपन्न राजवाड्यांतून त्या हरामखोर नोकराला मूल्यवान भाकरीचें नित्यदान मिळत असतें ना ? तरी सुद्धां त्याचा हा माजोरीपणा ! हा कृतघ्नपणा !!

— ७८ —

' हुजूर ' ' सरकार ' ' अन्नदाता ' इत्यादि महामंत्रांमध्यें भारी मोहिनी-शक्ति आहे. एकाद्या प्रभु-नामधारी देवाच्या देवळांत जर एकादा गुलाम साधक सत्याला असत्याचें अन् असत्याला सत्याचें सुंदर रूप देऊं इच्छित असेल तर त्याला या महामहिम मंत्रांची महासिद्धि अवश्य प्राप्त करून घेतली पाहिजे.

— ७९ —

हे भल्या माणसांनो ! एका गरीब माणसाकडून आपले जोडे साफ करून घेतांना लाज नाहीं वाटत तुम्हांला ? धरून चालूं कीं तो तुमचा पगारदार नोकर आहे, तुमचा विकत घेतलेला गुलाम आहे, पण शेवटीं आहे तर तो तुमच्यासारखाच एक मनुष्य ना ? निदान पवित्र मनुष्यत्वाची तरी जरा कदर करा !

— ८० —

या अनाथ आश्रितांच्यामध्यें काय तोच प्रिय आत्मा खेळत नाहीं, जो तुमच्या अंतरंगांत नाच करीत आहे? तर मग काय म्हणून या गरिबांच्या बरोबर तुम्ही असली नीच वागणूक ठेवीत आहांत? हे लोक काय पाळीव जनावरांपेक्षांही हलक्या दर्जाचे आहेत? कुत्र्याचा तर मोठ्या प्रेमानें तुम्ही मुका घेता, पण आपल्याच सारख्या रूपगुणयुक्त लोकांना शिवण्यांसहि तुम्हांला घृणा वाटते? असें करतांना तुम्ही आपल्याच अंतरात्म्याच्या अस्तित्वाला ठोकर मारत नाहीं काय?

— ८१ —

त्याचे तुम्ही मालक कसे? त्या गरिबाला काय तुम्ही आपला आश्रित समजता? तो अनंत आशामय उत्पत्तिकर्ता एका करुणाधारेनें तुमच्या कोरड्या पडलेल्या अंगणांत पाण्याचा वर्षाव करीत आहे याबद्दल उत्सव करा. तुम्हाला खरोखर हा एक सुवर्णक्षण प्राप्त झालेला आहे. आपल्या दारुण अन् कठोर अभिमानाचा चक्काचूर कां नाहीं करून टाकत या विपद्-ग्रस्त बंधूच्या सेवा-शिलेवर? धुवून टाका या गरिबाच्या उज्ज्वल अश्रूंनीं आपली मदोन्मत्त हृदयहीनता! तुम्हांला जेव्हां कोणी 'मालक' म्हणून संबोधितो तेव्हां लाजेनें आपली मान खालीं कां घालीत नाहीं! अजूनहि त्याला नोकर न समजतां, आपला प्रिय अनुज माना. त्याला आश्रित न समजतां, आपला एक सहयोगी माना.

— ८२ —

कां बरें एकाद्याला आपल्या पाया पडूं देता? ही तुमची बेअदबी नाहीं तर काय आहे? अजूनहि हे स्वतःला मोठे म्हणविणारानो! आपल्या धुंद डोळ्यांवरील अभिमानाचें हें कृष्णपटल दूर सारून द्या. अजूनहि शुद्धीवर या. पवित्र मनुष्यत्वाला उगीचच लाथाडूं नका. हे उन्मत्त मद्यप्यांनो! ध्यानांत ठेवा कीं तोहि मनुष्य आहे अन् तुम्हीहि मनुष्य आहांत. तर मग कां बरें त्या गरिबाला आपल्या पायां पडूं देता? ईश्वर-विद्रोही बनण्यापासून कांहीं लाभ आहे?

— ८३ —

ही आमच्या आत्म्याच्या सन्मानाची नव्हे तर अपमानाची गोष्ट आहे कीं आम्ही एकाद्या मनुष्याला प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रीतीनें आपल्या पायांवर लोळण घ्यावयास अन् आमची पायधूळ घेण्यास भाग पाडावें ! पाया पडावयास लावणारे जर चरणस्पर्शाला भक्तिभावाचें चिन्ह समजत असतील तर ते अपराध तर करतातच पण त्याबरोबर आपली स्वतःची फसवणूकहि करतात.

— ८४ —

तुमच्या आवडत्या पैशाच्या तीक्ष्ण शस्त्रानें कदाचित् त्या गरिबाची जीभ मुळांतूनच कापून टाकली असावी; अन् त्या बिचाऱ्याच्या लाचारीनें तुमच्या जिव्हेची धार अधिकच तीक्ष्ण केलेली असावी. तुमचा तो नोकर बहिरा नसून फक्त मुका आहे. तुम्ही त्याला शेंकडों घाणेरड्या शिव्या देता; तो मुकाट्यानें सर्व ऐकून घेतो. उलटून एक शब्दहि बोलत नाहीं. तुम्ही मोठेपणाची मदिरा पिऊन हें विसरून गेला आहांत कीं तो जोडे पुसणाराहि अखेर शेवटीं एक मनुष्यच आहे. स्वतःच्या दृष्टीनें तुम्ही खुशाल सज्जन मनुष्य होऊन बसा. पण अंतर्यामीं प्रभूच्या नजरेंतून तर बाबांनो तुम्ही कधींच उतरला आहांत. ईश्वर त्या मूक गरिबांच्यावरच प्रेम करतो, तुमच्यासारख्या उद्धत अमीरांवर नव्हे !

— ८५ —

कुणी याचें उत्तर देईल काय कीं शिव्या देणारा धनी श्रेष्ठ आहे कीं शिव्यांना शिरावर धारण करणारा नोकर ? आम्ही तर असेंच म्हणूं कीं घेणाराच श्रेष्ठ आहे, कारण तो आपल्या जिव्हेला ताब्यांत ठेवतो अन् शिव्या देणारा तर आपल्या गलिच्छ जिव्हेचा विकत घेतलेला गुलाम आहे. तो कसा श्रेष्ठ होऊं शकेल ?

— ८६ —

जोडे मारमारून त्या बिचाऱ्याला भुईवर पाडून अर्धमेला तर करून टाकलेत सरकार ! आतां तरी दया करा ! रागानें एकदम बेभान कां बरें

होता इतके ? काय झालें एका बुटाला थोडेसं पॉलिश करावयाचें राहिलें म्हणून ? या मुक्या गुलामानें तुमची अशी बेअदबी तरी काय केली आहे ? हा तर हात जोडून आपल्या चुकीबद्दल माफी मागत होता, पण तुम्ही या गरिबाचें जरासुद्धां ऐकलें नाहीं, अन् उलट त्याचीच कणीक तिंबायला सुरवात केलीत जोड्यानें ! अरे, अजून तरी स्वतःवर दया करा ! तुम्ही मनुष्य आहांत, मनुष्यत्वाला विसरून जाऊं नका. या कण्हणाऱ्या घायाळ देवाला जमिनीवरून उठवून छातीशीं कवटाळा. आपल्या अश्रूंनीं त्याच्या जखमा धुऊन काढा. अन् आपल्या उपरण्यानें पुसून काढा. हृदयाच्या न्यायालयांत बसलेल्या त्या न्यायाधिशाच्या भयंकर शासनापासून वांचावयाचें असेल तर अजूनहि त्या तिरस्कृत दलित देवाची समजूत घाला. आजपासून या भोळ्या महात्म्याला नोकर समजूं नका तर उलट आपला सख्खा भाऊ माना.

— ८७ —

तुमच्या ‘ प्रभुते ’च्या हक्काला खोटा कुठें ठरवतों आहोंत आम्ही ? मजेंत मालक होऊन बसा. पण मालकीची मिळकत हृदयाला गहाण ठेवून खरेदी करू नका. प्रभुतेच्या मदांत मत्त होऊन हृदयहीन बनूं नका. दयेच्या जलानें दुःखपूर्ण हृदयांचें सिंचन करीत रहा. जर अहंकाराला ताब्यांत ठेवाल अन् ईश्वराला भिऊन वागाल तरच प्रभुता तुमच्या कायमची मालकीची होईल.

— ८८ —

तुम्ही मोठे बना पण खरेखुरे मोठे बना. तुम्ही हृदयानें मोठे व्हा, आत्म्यानं मोठे व्हा, सदा सहृदय रहा, सदय रहा, सस्नेह रहा. परपीडेचे सहानुभवी बना, अश्रूंचे ग्राहक बना, निःश्वासांचे प्रणयी बना. हृदयानें उच्च रहा, मनानें शुद्ध रहा. तुम्ही सुखाचा उपभोग घ्या, कुठें सुखच तुमचा उपभोग न घेवो म्हणजे झालें. तुम्ही सुखी रहा अन् दुःखितांनाहि आपल्या संक्रमणशील सुखानें सुखी बनवा.

— ८९ —

जर याच जन्मीं नराचें नारायण व्हायचें असेल तर आपल्या अधीन अन् आश्रितांच्या बरोबर दयेची अन प्रेमाची वागणूक करा. पण जर

मनुष्यत्व गमावून पाशवी प्रकृति मिळवावयाची असेल तर पाशवी कठोर शासनाचा मार्ग मोकळाच आहे !

— ९० —

असा अभिमान तर कधीं स्वप्नांतहि मनांत येऊं देऊं नका. एकाद्याला आश्रय देणारे तुम्ही कोण ? ईश्वराचे आभार माना कीं हे अनाथ जन आश्रिताच्या रूपानें नव्हे तर बंधुबांधवांच्या रूपानें तुमच्याकडून स्नेहदान घेण्यासाठीं तुमच्या जीवनपथावर येऊन आज तुम्हांला मिळाले आहेत. असें मुळींच समजूं नका कीं तुम्ही त्यांच्यावर दयाबुद्धीनें कांहीं उपकार करीत आहांत. ज्या कर्तव्यदृष्टीनें तुम्ही आपल्या आवडत्या परिजनांचा प्रतिपाळ करता त्याच सहज दृष्टीनेंहि या नोकर म्हणविल्या जाणाऱ्या दीन प्राण्यांचेंहि भरणपोषण करीत रहा.

— ९१ —

दुसऱ्यांच्या स्वातंत्र्याचें अपहरण करून तुम्ही स्वतः कसे स्वतंत्र होणार बरें ? दुसऱ्यांना पायाखालीं तुडवून स्वातंत्र्य मिळालें तरी त्याचा काय उपयोग ? जर तुम्ही स्वतः स्वाधीनतेची विजय-माळ धारण करूं इच्छित असाल तर तुम्ही दास्याच्या शृंखलेनें ज्यांना बद्ध करून टाकलें आहे त्या बिचाऱ्यांची पहिल्या प्रथम मुक्तता करा.

— ९२ —

हे सर्व तुमचे खरीदलेले नोकर नव्हेत, तर वाट चुकलेले लाडके भाऊ-बंद आहेत. हे पैशांचे नव्हेत तर प्रेमाचे भुकेले आहेत. कदाचित् तुम्ही ही गोष्ट विसरून जात असाल कीं या बद्धकर मूक प्राण्यांशीं कठोर नी क्रूर वर्तन करतां करतां तुम्ही आपलें देवदुर्लभ मनुष्यत्वहि एकादे दिवशीं उगीचच्या उगीच गमावून बसाल.

— ९३ —

हें तर बाबा निव्वळ ढोंग आहे ! शिक्षेची भीति दाखवून सुधारणा कसली करणार आपल्या कपाळाची ? तुमच्या या अहंकारपूर्ण क्षुद्र मालकी-पणाच्या दगडासारख्या कठोरतम अभिमानाच्या योगानें कधीं कुणांत सुधारणा

झाली आहे ? अरे असेंच असतें तर त्या 'माय-बाप' संबोधिल्या जाणाऱ्या सरकाराचे हे काळे तुरुंग या दुर्दैवी कैद्यांविना कधींच रिकामे पडले असते. कोर्टकचेरीचें नांवहि आज कोश-ग्रंथांतून राहिलें नसतें ! हे मदोन्मत्त मालकांनो ! आपल्या काळ्या क्रूरतेवर सुधारणेचा चुना अशा प्रकारें कां बरें फासू पाहत आहांत ?

— ९४ —

प्रभु-नामधारी आम्ही मोठे लोक स्वामिभक्तीचे किती लोलुप अन् रसिक असतों बरें ? आपण विकत घेतलेल्या तुच्छ आश्रितांच्या हृदयांत आम्ही नेहमींच स्वामिभक्तीची लता फुललेली पाहूं इच्छितों. आम्ही त्यांना पैसे देत आहोंत ना ? म्हणूनच तर त्या भिकारड्या नोकरांनीं आम्हांला ईश्वरापेक्षांहि मोठा धनी मानलें पाहिजे—हीच तर आम्हां महाप्रभूंची स्वर्गीय आकांक्षा आहे !

— ९५ —

हा धर्म नव्हे; हा तर केवळ धर्माचा आभास आहे. याला तर आतां पार विनष्टच होऊं द्या. या धर्माभासासाठीं व्यर्थ हाय हाय कशाला करीत आहांत ? धर्माची ही मिथ्या छाया आज ना उद्यां नष्टच व्हावयाची आहे. श्रेणि-भेद-वाद्यांनो ! तुम्हींच सांगा बरें, लोकनायक भगवानांच्या मंगलमयी इच्छेचा विकास तुमच्या या धर्माभासाच्या द्वारें कसा होऊं शकणार ? तर मग असल्या या पोकळ जातिधर्मासाठीं इतका हलकल्लोळ माजविण्यापासून आहे कांहीं फायदा ?

— ९६ —

तुमचे डोळे का फुटले आहेत ? हे दुर्बल विलासी जनहो ! माहीत आहे तुम्हांला तुमचीं हीं भारी भारी भव्य भवनें कोणत्या पायावर रचलेलीं आहेत ! शेंकडों गृहविहीन गरिबांच्या छातीच्या फांसळ्या काय या उंच गगनभेदी इमारतींच्या खालीं रचलेल्या नाहींत ? अन् त्यांच्याच रक्ताच्या गाऱ्यानें काय हे दगडविटांचे सांधे जोडले गेले नाहींत ? त्या घायाळ अनाथांचे निःश्वास काय या सुंदर झरोक्यांमधून येत नाहींत ? याउप्परहि हे रामाच्या अन्

रहीमाच्या उपासकांनो ! तुम्ही काय म्हणून या भीषण हत्यागृहामध्यें सुख अन् शांतिपूर्वक निवास करीत आहांत ?

— १७ —

तें पहा; वार्धक्यानें वांकलेल्या त्या आंधळ्या म्हातारीच्या पाठीवर एक चिंधीचा तुकडाहि नाहीं, आणि तुम्ही तिच्या समोरच सुंदर रेशमी वस्त्रें लेवून फिरत आहांत. महाराज, तुम्हाला हें बघून थोडी देखील ग्लानि येत नाहीं ? हें पहा या भिकारणीच्या, भुकेनें कंठाशीं प्राण आलेल्या मुलाच्या हातांत शिळ्या भाकरीचा एक तुकडाहि नाहीं पण तुम्ही या सजविलेल्या सुंदर 'डायनिंग टेबला' वर आपल्या लाडक्या कुत्र्याला पुडिंग अन् मलई भरवीत आहांत. यापेक्षां, अरे बाबांनो, जमीन दुभंगून जाईल अन् तुम्ही तिच्यांत जिवंतच गडप व्हाल तर तें कितीतरी छान होईल !

— १८ —

समदर्शी भगवानाच्या इच्छेच्या हें आजिबात विरुद्ध आहे कीं एका श्रेणींतील माणसांनीं दुसऱ्या श्रेणींतील माणसांवर पाशवी प्रभुत्व स्थापित करण्याचा निर्दय व भ्रष्ट प्रयत्न करावा. हा तर स्पष्टच निरीश्वरवाद आहे. पण दुनिया उलटी आहे. तिला साम्यवादांत अनीश्वरवाद दिसतो ! तुम्हीच सांगा, साम्यवादांत ईश्वराला स्थान नाहीं यावर कसा विश्वास ठेवावा ? चुकतात लोक ! खरा ईश्वरवाद तर साम्यवादांतच आहे. हें निश्चित आहे कीं भगवानाच्या मंगलमयी इच्छेचा पूर्ण विकास विश्वबंधुत्वाच्या सुंदर भावनेंतच दिसून येईल, श्रेणि–विभेदाच्या या घाणेरड्या स्वरूपांत नाहीं.

— १९ —

एकाद्या स्वार्थलोलुप प्रापंचिक मनुष्याचे जसे विचार असतात, जवळ जवळ तसेच तुमचेहि हे धार्मिक विचार आहेत. इथें तर वास्तविक धर्माचें नांवसुद्धां नाहीं. एकाद्या अवताराची किंवा पैगंबराची पूजा, एकादें मंदिर, मशीद किंवा चर्च यांची चर्चा, एकाद्या वेदाचें, कुराणाचें वा बायबलाचें प्रमाण—काय एवढ्यांतच धर्मांचें प्राणभूत तत्त्व येऊन जातें ? असा धर्म किंवा पंथ तर जगांत सर्वत्रच प्रचलित आहे. आमच्या समोर तर आज विश्व-

कल्याणकारी, जीवितजीवनोपयोगी, सदाचारयुक्त सद्विचार ठेवून द्या. मग ते एकाद्या ईश्वरवाद्याचे विचार असोत किंवा अनीश्वरवाद्याचे असोत.

— १०० —

वाहवा ! तुम्ही आपल्या ईश्वराचीहि अगदीं आपणा स्वतःसारखीच कल्पना करून ठेवलीय कीं ! तर मग तुम्हां दोघांचें खूप छान पटत असेल नाहीं ? तुम्ही भांडवलवाले आहांत तर तुमचा ईश्वरहि भांडवलशाहीचा पूर्ण समर्थक आहे. तुम्ही विषयविलासी आहांत तर तुमचा भोगलोलुप भगवानहि विलासप्रिय आहे. तुम्ही गरिबांचे गळे कापता तर तुमचा ईश्वरही दीनदुबळ्यांचा विघातक आहे. धनाढ्य श्रीमंतांनो ! तुमच्या स्वकल्पित ईश्वरवादाचें समर्थन जगांतील समस्त धर्मग्रंथहि मुक्तकंठानें करीत आहेत; अन् त्यां पूज्यपाद धर्माचार्योंनींहि तुमच्याच मनाच्या विलक्षण व्यवस्था बनवून टाकल्या आहेत ! अहाहा ! किती आनंदाचा विषय आहे !

— १०१ —

ध्यानांतच येत नाहीं कीं तुम्ही इतरांपेक्षां स्वतःला उच्च किंवा विशिष्ट कसें समजत असतां ! तुमच्यामध्यें, तुम्हीच सांगा, अशीं कोणतीं वैशिष्ट्यें आहेत कीं, ज्याच्यामुळें तुम्हांला उच्चता प्राप्त झाली आहे ? केवळ मिथ्या अहंकाराचा आश्रय घेऊनच कां कोणी उच्च होत असतो ? हे ईश्वर-विद्रोह्यांनो ! कठोर शासनाचा परिणाम काय तुम्हांला स्पष्ट दिसत नाहीं ? काय तुम्ही आपला सर्वनाश स्वतःच्या डोळ्यांनीं पहात नाहीं ? अरेरे ! आज उच्चता अन् वैशिष्ट्यपूर्णता यांच्या खोट्या आशेनें तुम्ही आपल्या पवित्र अन् सर्वोत्कृष्ट मनुष्यत्वाचा स्वतःच नाश करून टाकला आहे.

— १०२ —

जेव्हां मी म्हणतों कीं मी आज या पृथ्वीवरील कोणत्याहि प्रचलित धर्माचा किंवा पंथाचा अंध पक्षपाती नाहीं, तेव्हां तुम्ही त्याबद्दल तिरस्कारपूर्ण आश्चर्य कां बरें प्रगट करता ? दुर्दैव ! त्या धर्मधुरीणांच्याबद्दल तर तुम्ही आश्चर्य प्रदर्शित करीत नाहीं, जे बाह्यतः रामाचें नी रहीमाचें पवित्र नांव घेऊन आततायी, अधिकारलोलुप अन् बेइमान भांडवलवाल्यांच्या पापकृत्यांचें

अंधसमर्थन करतात, जे भुकेकंगाल गरिबांच्या रक्तशोषणाचा धर्मशास्त्राचीं पानें चाळचाळून निर्णय देतात किंवा जे मदांध अमीरांच्या पायांखालीं चाललेलें दीनदुबलांचें दुर्दलन डोळ्यांनीं पाहूनहि वेद, कुराण किंवा बायबल यांच्या सुंदर ओळींनाच अनुचितपणें चिकटून बसतात.

— १०३ —

श्रीमंतांनो ! तुम्ही धर्मचर्चा करणार नाहीं तर कोण करणार ? आयुष्य मोठ्या आरामांत चाललें आहे ना ! नीच दलितांच्या रक्तशोषणाचा अत्युपयोगी उपचार करतां करतां तुमचें धार्मिक शरीर खूप धष्टपुष्ट झालें आहे. धर्मात्मा बनण्यासाठीं आणखी काय हवें ? कसलीहि काळजी नाहीं, कांहींहि भानगड नाहीं. त्या बुभुक्षित मूर्खांच्या ध्यानांत तुमचें उज्ज्वल धर्मतत्त्व येत नाहीं, न कां येईना ! धर्म सगळ्यांच्यासाठीं थोडाच आहे ! तो तर तुमच्या-सारख्या खास दर्जाच्या लोकांसाठीं आहे. त्या दुर्बल पराधीन प्राण्यांना, हे धर्मधुरीणांनो ! लाथ मारून आपल्या सभोंरून दूर का लोटीत नाहीं ? निस्संदेह, पापी पोटाच्या असह्य ज्वालेनें होरपळलेल्या त्या नीच कंगालांना धर्म–चर्चा ऐकण्याचा काय अधिकार ? तुमच्या आनंदसमर्थक धर्म-ग्रंथांनीं त्या धर्मच्युत दारिद्र्यदलितांना 'नास्तिक' या पदवीनें विभूषित केलें आहे यांत अधर्म आहेच काय मुळीं ?

— १०४ —

हें ऐकून ऐकून तर बुवा कान किटले कीं "बाहेरील साधेपणाशीं काय संबंध ? आंत साधेपणा अन् स्वच्छता हवी !" ही गोष्ट तर शिरतच नाहीं डोक्यांत ! अहो, ज्याच्या अंतरंगांत खरा साधेपणा असेल तो वरवरची घाणेरडी सजावट अन् शृंगारी पोषाक कधींहि पसंत करणार नाहीं. त्याचें अंतरंग व बहिरंग दोन्ही एकसारखेंच असणार. ज्याच्या दुःखपूर्ण नेत्रांमध्यें फाटक्यातुटक्या अन् घाणेरड्या कपड्यांची लंगोटी लावलेल्या गरिबांची ती करुणाजनक मूर्ति प्रतिबिंबित झाली असेल तो तऱ्हेतऱ्हेचे नखरेदार कपडे कसे बरे वापरील ? त्याचें जखमी झालेलें निर्मळ मन दिखावू डामडौल पसंत करूंच शकणार नाहीं. ज्याच्या अंतरंगांत खरेपणा अन् साधेपणा हे सामावले आहेत

त्याची बाहेरील राहाणी साधी अन् गरिबीची नसेल असें कधींच होणार नाहीं.

— १०५ —

जगांत अमुक एक जन-समुदाय तुमच्या नवीन कार्यपद्धतीचा विरोध करीत असेल तर करूं दे त्याला ! दुःखी काय म्हणून होता ? हें तर तुमच्या साफल्याचें शुभ लक्षण आहे. परम-पिता-परमात्म्याची प्रार्थना करीत जाल तर तो विरोधी समुदायहि एक दिवस तुमच्या ईश्वरप्रेरित संघाचें एक बलिष्ठ अंग बनेल !

— १०६ —

स्वामी महाराजांचा उच्च अन् गंभीर वेदांत दारिद्र्यांच्या या अर्धनग्न अर्धपोटी वस्तींत कोण बरें ऐकणार ? ते कंगाल ओरडतात 'भाकरी' अन् स्वामीजी म्हणतात 'तत्त्वमसि !' वेदांती महाराजांनीं ब्रह्मानुभव खुशाल घेतलेला असो, पण त्यांना अजून भयंकर भुकेचा प्रत्यक्ष अनुभव आलेला नाहीं ! अनुभव येणार तरी कसा– जिथें धनाढ्य भक्तजन अनुचितपणें बाधक होत आहेत ? केवळ चारच दिवस ब्रह्मविद्येच्या पोथ्या हातीं देऊन स्वामीजींना या उपाशीपोटी कंगालांच्यामध्यें सोडून द्यावें, अन् मग पहावें त्यांचें ब्रह्मसूत्र तसेंच ताजें राहतें आहे किंवा त्याचा ठीक अर्थ समजाविण्यासाठीं त्यांना 'रोटी-भाष्यम्' पाहण्याची जरूर पडते आहे !

— १०७ —

तुमचा परमपिता त्या अर्धवट जळलेल्या झोंपडींतील तुटक्या बाजेजवळ उभा राहून केव्हांपासून तुमची वाट पहात आहे ! या स्वर्णमंदिरांत ह्या रेशमी गाद्या काय त्याच्यासाठीं अंथरीत आहांत तुम्ही ? मित्रांनों ! या मऊ मऊ गाद्या तुम्ही आपल्याच भावांच्या प्रेतवस्त्रांच्या तुकड्यापासून तयार केल्या आहेत ना ? काय तो देवाधिदेव या खुनी गाद्यांवर बसेल ?

— १०८ —

बाबा ! तुम्ही खरेंच फार भोळे आहांत ! कोण जाणे कुठल्या अज्ञात, भव्य, भवनाच्या शोधांत तुम्ही विमनस्क होत आहांत ! दयाळू स्वामीचें

स्वागत काय या सभ्यांच्या झोंपडींत होऊं सकणार नाहीं ? अहो, आतां या झोंपडीलाच तयार करा अन् इलाच सजवा. अजूनही आपली चूक कबूल करा.

— १०९ —

आमच्या उत्क्रांत समाजांतील प्रत्येक दुर्दलित मनुष्यात्मा आज समता आणि स्वातंत्र्य यांच्या प्राप्तीसाठीं स्वभावतः जीवनक्षेत्रांत अग्रेसर होत आहे. ही ईश्वर-दर्शनाचीच एक अत्यन्त शुभ सूचना नव्हे काय ? त्या मंगलमयाच्या पुनीत प्रेरणेनें या द्वेषपूर्ण धरा-धामावर 'विश्वबंधुत्व' स्थापित होईलच होईल. विश्वधर्मांच्या सुंदर साधकांनो ! त्या शुभ दिवसाची प्रतीक्षा निरंतर करीत रहा !

— ११० —

हेंही त्या सृष्टिकर्त्याचें एक स्वरूप आहे, हें कोण नाकबूल करतो आहे ? पण हें कसें मानावयाचें कीं, बस, हेंच त्या विश्वविहारीचें पूर्णरूप आहे ?

— १११ —

भोळ्या बांधवांनो ! सांगा तरी पाहूं कीं तुमचा दयाळू पिता हिंदु आहे कीं बौद्ध ? मुसलमान आहे कां पारसी ? यहुदी आहे वा ख्रिस्ती ? शीख आहे कीं जैन ? तर मग तुम्ही 'कोणीतरी बनून' आपल्या पवित्र पितृकुळाला कां बरें कलंक लावतां ?

— ११२ —

परमपिता तर तुम्हाला मुक्तसंतानाच्या रूपांतच पाहूं इच्छितो ! मग काढून कां टाकीत नाहीं आपल्या या सोनेरी आवडत्या बेड्या ? 'तुम्ही त्या विश्वाच्या वात्सल्यमय अंकावर खेळावयास जात आहांत' हें बंधन काय थोडें आहे ?

— ११३ —

एका मनुष्यतेवरून ओवाळून टाका शेकडों नवे जुने पंथधर्म अन् धर्म-

शास्त्राच्या हजारों पोथ्या. तुम्ही तर बाबांनों मनुष्यत्वाची पूजा करा, पंथ अन् पुस्तकांची नव्हे !

— ११४ —

आपल्या अन्तरात्म्याचा अनादर कधींही करूं नका ! या आत्म-अनादराचा स्पष्ट अर्थ आहे जगताचा तिरस्कार अन् ईश्वरविद्रोह ! तुम्ही याचा कांहीं दुसरा अर्थ लावलाय का ?

— ११५ —

निःसंशय तुम्ही शक्तिशाली आहांत ! तुमच्या कठोरतेच्या अन् क्रूरतेच्या जोरावर काय होणार नाहीं ? या अभागी अपराध्यांना तुम्ही सहजासहजीं तुडवून त्यांचा चेंदामेंदा करूं शकतां. होय, तुम्ही सर्व कांहीं करूं शकतां पण याद राखून ठेवा, या गरिबांच्या साठीं आम्हां निर्बलांच्या हृदयांत प्रेम अन् दयेच्या ज्या करुणधारा वाहात आहेत त्यांना तुमच्या अगणित अत्याचारांचा प्रलयाग्नीही कांहीं केल्या सुकवूं शकणार नाहीं. तुमची ती शक्ति—आमचें स्वायत्त जेव्हां तुम्ही हिसकावून घेऊं शकाल तेव्हांच आम्ही तुम्हांला खरें शक्तिशाली व प्रतापी म्हणूं !

— ११६ —

येथें गरीब बिचाऱ्या प्रेमाला स्थान आहेच कुठें ? त्या पराधीन हृदयावर तर आज क्रूरता अन् हिंसा यांचाच अखंड अधिकार आहे. प्रीति अन् प्रतीति यांच्यासाठीं आतां तेथें जागा राहिलेली नाहीं. कुलटा कृतघ्नतेचा तर हृदयद्वारीं खूप स्वागतसत्कार होत आहे अन् ती बिचारी श्रद्धा बाहेर अनाथपणें भटकत आहे. निष्ठुरतेची तर हृदयमंदिरांत सेवापूजा होत आहे, पण ती दुर्दलित करुणा बाहेर पडल्यापडल्या कण्हत आहे. अत्याचारी अहंकारानें त्या दयनीय हृदयांत तेवणाऱ्या प्रेमाचा दिवा अत्यंत निर्दयपणें विझवून टाकला आहे. त्या अंधाऱ्या कालकोठडीकडून आतां काय आशा करतां ?

— ११७ —

या असल्या गुणांनीं तुम्ही ईश्वराच्या प्रेमाचा वांटा घ्यावयास आला

आहांत काय ? हा केवढा अनर्थ करून ठेवला आहे त्यांच्या चरणांच्या पवित्र छायेखालीं उभे राहून ? त्या गरिबाची हिरवीगार (टवटवीत) बाग उध्वस्त केल्यावांचून काय तुम्ही आपल्या बागेची शोभा वाढवूं शकला नसतांच ! काय त्या शेजाऱ्याची झोंपडी जमीनदोस्त करूनच तुम्हाला आपला भपकेदार महाल उभा करता आला असता ? सुखी अन् संपन्न बनण्यासाठीं त्या भिकाऱ्याच्या सुखांत विष कालवावेंच लागलें असतें काय ? फळाफुलांनीं भरलेली डहाळी, बाबांनो, खालीं वांकत असते; ताठ्यानें वर मान करीत नाहीं.

— ११८ —

ज्याच्या चरणांवर तुम्ही आपल्या सच्च्या व्यक्तित्वाचें मस्तक नमविलें आहे, तें पवित्र प्रेम नसून प्रेमाभास आहे तो ! वास्तविकपणें ती उन्माद-कारिणी कामुकता आहे. तुम्ही जरा घाई केलीत. विनाकारण आपल्या संचित साधनेला आग लावलीत. अमृत समजून व्यर्थच हलाहल प्यालात. ज़रा विचार करा कीं तुमचें व्यक्तित्व किती मौल्यवान होतें; तुमची साधना किती महाग होती ! काय देऊन काय घेतलें ! तुम्ही तेव्हां कसे होतां अन् आतां ही तुमची काय दशा झाली आहे ! अरेरे ! बघतां बघतां कशाचें काय होऊन गेलांत तुम्ही !

— ११९ —

जग कोणत्या स्वरूपांत तुम्हांला दिसेल हें तर तुमच्याच स्वतःच्या दृष्टीवर अवलंबून आहे. युधिष्ठिराच्या साधु दृष्टीनें पाहूं लागाल तर तुम्हांला एकाही व्यक्तींत असज्जनता मिळणार नाहीं, प्रत्येक मनुष्यांत सज्जनताच सज्जनता दिसून येईल. अन् दुर्योधनाच्या असाधु दृष्टीनें या सुंदर विश्वा-कडे पहाल तर स्वप्नांतही तुम्हाला कोणी साधुपुरुष दिसणार नाहीं. सर्वत्र कपटच कपट मिळेल. विश्वदर्शन करण्यापूर्वी आपला दृष्टिकोण शुद्ध करा. या जगांत कोणी कुणाचा मित्र नाहीं व कोणी कुणाचा शत्रु नाहीं ! तुम्हीच आपले मित्र आहांत अन् तुम्हीच आपले शत्रु ।

— १२० —

अरे ! येथें तर चोहोंकडे संशयाची अन् द्वेषाची आग पेटलेली आहे.

कुठेंही पळून जावयास रस्ता नाहीं, कुठेंही आत्मरक्षण करावयास जागा नाहीं. ईश्वरच या द्वेषदावानलापासून वांचवील तर वांचूं शकूं, नाहींतर नाहीं. जीवनाच्या हरितवनांत हें कसें प्रलयंकर दृश्य आहे. पण हें काय–जणूं काय कुणीतरी अंतस्तलांत सांगत आहे कीं, 'अखंड प्रेमाच्या जलधारेनेंच हा दावाग्नि विझेल. विझवून टाका शक्य असेल तर !' धन्य प्रभो धन्य !

— १२१ —

'प्रेमशून्यत्व'च सर्वांत भयंकर पाप आहे ! खरोखर जो प्रेमी नाहीं तो किती भयंकर पातकी आहे ! आणि ज्यानें आपल्या आदरयुक्त हृदयांत प्रेमाला सर्वोच्च स्थान दिलें असेल तो निःसंशय समस्त पापपरितापानें रहित आहे. जर आम्ही प्रेमविहीन असूं तर ईश्वरविमुखही आहोंत. आम्हां नास्तिकांना प्रेमशून्यत्वाची आज कशी दारुण शिक्षा मिळत आहे.

— १२२ —

हें कधींच विसरूं नका कीं तुम्ही आपल्या पवित्र व्यक्तित्वाबद्दल जबाबदार आहांत. पवित्र अशासाठीं कीं, ईश्वरानें त्याला आपल्या प्रेमाच्या आधारावर उत्पन्न केलें आहे. आपल्या जबाबदारीची तुम्ही स्वतःच हेळसांड करीत आहांत आणि अशा रीतीनें तुमच्या व्यक्तित्वाचें स्वाभाविक पावित्र्य आपोआपच नष्ट होत आहे. जरा विचार तरी करा, ईश्वराविषयीं तुमची ही किती भयंकर कृतघ्नता आहे !

— १२३ —

आम्ही तर पुनः म्हणूं अन् हजार वेळां म्हणूं कीं तुम्हांला घृणाच करावयाची असेल तर घृणेची घृणा करा. घृणा प्रदर्शित करण्याचा तुम्हांला येथें अधिकारच नाहीं. तुम्ही तर केवळ प्रेमासाठीं प्रेम करा. विश्वासमूलक प्रेमच तुमच्याबरोबर राहील, ती कुलटा घृणा कधींही साथ देणार नाहीं. बाबांनो, प्रेमच स्वर्ग आहे अन् घृणाच नरक ! दोहोंतून काय पसंत करणार ?

— १२४ —

धर्मवीरांनो ! जरा डोळे उघडा, ओळखा, हे तुमचे कोण आहेत ? काय हे सगळे तुमचे प्रेमळ भाऊ नाहींत ? हे देखील त्याच जगत्पित्याचे

लाडके पुत्र आहेत ना, कीं ज्याचें प्रेम अन् लाड प्राप्त करण्यासाठीं तुम्ही दीनवाणे इकडेतिकडे भटकत आहांत ?

— १२५ —

आश्चर्य ! सदा जिभेवर शास्त्र राखणाऱ्या त्या पंडिताला तुम्ही धर्मवान् समजतां ! तर मग हेंही संभाव्य आहे, कीं याच प्रमाणें हमेशा हातांत शस्त्र सुसज्ज ठेवणाऱ्या पुरुषाला तुम्ही वीर मानीत असाल ?

— १२६ —

कोण जाणे, धर्माच्या नांवावर तुम्ही काय काय ठांसून ठांसून पोटांत भरलें आहे. आश्चर्य ! धर्माचें अजीर्ण झालें पण अजूनही ईश्वराच्या घरापासून तुम्ही हजारों कोस दूर आहांत.

— १२७ —

एक वेळ स्वार्थ सोडून तर पहा, पडतोय दुसऱ्यांवर त्याचा प्रभाव कीं नाहीं ! खात्री आहे कीं ते लोकही तुमच्या आत्मत्यागाचें श्रद्धापूर्वक अनुकरण करतील आणि अशाप्रकारें तुम्ही सर्वजण आत्मशुद्धीच्या द्वारां जेथें परार्थही स्वार्थ मानला जातो अशा त्या प्रशस्त पथावर जाऊन पोहोंचाल.

— १२८ —

सेवा करविण्यानें नव्हे तर सेवा करण्यानेंच तुम्ही वर उठाल. खोल गर्तेत पडावयाचें असेल तर खूप खुशामत करवून घ्या अन् शिखरावर चढावयाचें असेल तर सदा सेवा करीत रहा ! आतां बोला, काय पसंत करणार ?

— १२९ —

अरे, हें काय ! आपल्याच सख्या भावाच्या रुधिरानें रंगवून आणली आहे काय ही तीक्ष्ण तलवार ? तुमच्या धार्मिक दृष्टीनें परमपित्याच्या अश्रूंचें काय कांहींच मूल्य नाहीं ?

— १३० —

सावधान ! या प्रियवादी समर्थकांच्या सरस समर्थनामुळें विसरून जाऊं नका. ईश्वराचें घर दूर आहे. खूप दूर आहे. हे सगळे तर तुम्हांला ( खुदी ) अहंकाराचा मार्ग दाखवून नामानिराळे होऊन जातील.

— १३१ —

शिवण्याचा तिरस्कार नका करूं. धुवून टाका प्रेमपूर्वक या स्वच्छ हातांनीं आपल्या या प्रेमळ भावाचा किळसवाणा कलंक ! जरा पहा तर खरे, या सडलेल्या जखमेच्या पुवांतून तुमच्या परमपित्याची प्रेमपूर्ण दृष्टि तुमच्यावर काय निर्मळ होऊन पडत नाहीं ?

— १३२ —

महाराज ! तुमच्या या उचनीचांच्या विचित्र व्यवस्थेंत त्या बिचाऱ्या ईश्वराला तरी कुठें एकादें स्थान मिळालें आहे काय ? एका भावाला तर जन्मापासूनच उच्च समजावयाचें अन् दुसऱ्याला नीच व निकृष्ट असें निर्णित करावयाचें ही काय तुमची विशुद्ध नास्तिकता नव्हे ? तुमच्या दृष्टीनें तर कदाचित् हीच आस्तिकता असेल.

— १३३ —

बोला, हा गरीब भंगी कसा अस्पृश्य झाला ? बाबांनो, तुमची ही घाणेरडी, मदोन्मत्त वासनाच खरी अस्पृश्यता आहे, जिला छातीशीं कवटाळून आज तुम्ही मस्त होऊन पडलां आहांत.

— १३४ —

विनाकारण तुम्ही अस्पृश्यांनीं या सुंदर मंदिरांत जाण्याचा प्रयत्न केलां ! तुमची कदाचित् अशी समजूत होऊन बसली असेल कीं, हें एक दिव्य देवालय आहे ! अहो, हा तर त्या पुनीत पुजाऱ्यांचा ‘ प्रायव्हेट पॅलेस ’ आहे !

— १३५ —

वेड तर नाहीं लागलें तुम्हाला ? त्या परमपित्याच्या दया दरबारांत जात असतां कां बरें अडवितां त्याच्या एकाद्या पुत्राला ? हे उच्चतेच्या ठेकेदारांनो ! दुनियेंत तोच एक असा दरबार आहे कीं जेथें आम्ही सर्व बेशक जाऊं शकतों. याद राखून ठेवा, तें घर देवाचें आहे, कुणाच्या काकाचें नाहीं !

— १३६ —

जीवनाच्या शर्यतींत, पैज जिंकण्याची संधि तर बाबा सर्वांना एकसारखी

मिळावयास हवी. ईश्वरी आज्ञा तर हीच आहे. तर मग तुम्ही का बरें एकाद्याला विद्यादान अन् देवदर्शन यांपासून वंचित करतां ? त्याच्या करतां दयेचें दान तुम्हीही घ्या व दुसऱ्यांनाही घेऊं द्या. तुम्हांला तर आज जगन्नियंत्यां प्रभूनें चालविलेल्या नियमांचे साधक बनावयाचें आहे. बाधक नव्हे.

— १३७ —

जेव्हां एकादा अत्याचारी राजकर्मचारी एकाद्या दीन प्रजेपासून लांच घेतो किंवा आपला स्वार्थ साधण्यासाठीं तिला उत्पीडित करतो तेव्हां तो शक्यतोंवर त्या फिर्याद्याला राजास भेटूं देत नाहीं. हाच कावा आज गरिब दलितांच्या बाबतींत केला जात आहे. बिचाऱ्यांना जबरदस्तीनें विन्मुख केलें जात आहे. आम्ही त्यांना हरिसन्मुख होऊं देत नाहीं. नाहींतर एकादे-वेळीं ते त्या समदर्शी सृष्टिकर्त्याकडे आमच्या विरुद्ध तक्रार करावयाचे अन् म्हणून त्या नीचांना ईश्वरासमोर जाऊं देणेंच ठीक नाहीं. असेंच ना ?

— १३८ —

प्रभु—प्रेमाची सरिता अनादिकालापासून सर्व तृषा-पीडितांच्यासाठीं अबाधित गतीनें वाहत आली आहे. त्या प्रबल प्रवाहाला अडविणारे आम्ही तुच्छ ( भुंगे ) किडे आहोंत तरी कोण ? प्रभूच्या त्या प्रेम--जलाचें पान ब्राह्मणही करील अन् तो भंगीही करील. श्रीकृष्णाचे प्रिय चरण द्विजही धुवील अन् तो डोमही धुवील.

— १३९ —

त्या हरिजनांना हे लोक भगवानाच्या मंदिरांत जाऊं देत नाहींत. किती भयंकर अंदाधुंदी आहे ! अरे या हृदयशून्य अंधाना एवढेंसुद्धां समजत नाहीं कीं ती सभा लोकनायक पतितपावन रामाची आहे. एकाद्या अमीर-उमरावाची किंवा बादशहाची नव्हे. होय, त्याच प्रभूची कीं ज्याचें नांव पतितपावन आहे, दीनवत्सल आहे.

— १४० —

उच्चवर्णाभिमानी हिंदूंचा हा कसला नीच दुराग्रह ! आमचे दलितबंधु

पतितपावन--प्रभूच्या समोर जाऊं इच्छितात तर त्यांत त्यांचें काय बिघडलें ? मंदिरांत एकाद्या दुष्ट हेतूनें तर ते जात नाहींत ! प्रभूचें दर्शन अन् पूजन करण्याच्या सदिच्छेनेंच देवालयांत जाण्याचा ते लोक प्रयत्न करीत आहेत. हें काय कांहीं पापकर्म आहे ? पण कोण जाणे या दुर्दैवी बिचाऱ्यांना काय म्हणून अडविलें जातें.

— १४१ —

हरिजनांना मंदिरांत जाण्यास प्रतिबंध करणारे हे सर्वजण काय करीत आहेत ? प्रभूच्या प्रभुत्वाच्या जागीं ते लोक काय आपलें प्रभुत्व प्रस्थापित करीत नाहींत ? भगवान् हे सर्व अनर्थ पाहून मनांत काय बरें म्हणत असतील ? पण त्या दुराग्रह्यांना भगवानाची काय पर्वा ?

— १४२ —

ही तर सर्वसम्मत गोष्ट आहे कीं, भगवत्पूजा कांहीं चोरी किंवा हरामखोरी नाहीं. आपल्या परमपित्याचे पाय धुण्याचें साहस करणें हें कांहीं दुष्कर्म नाहीं. असें करण्याचा त्याच्या सर्वच पुत्रांना अधिकार आहे. जर अंत्यजांनीं देवालयांत जाऊन भगवानाची अर्चा केली तर तें कांहीं मानवबुद्धीच्या विरुद्ध आचरण नाहीं. याबाबतींत कुणालाही चिडण्याची किंवा विरोध करण्याची गरज नाहीं.

— १४३ —

एकाद्या देवदर्शनेच्छूला मंदिरांत न जाऊं देणें हा धर्माचा सर्वांत भयंकर उपहास अन् अपमान आहे. ही तर मानवबुद्धीच्या आटोक्याबाहेरची अशी एक अजब गोष्ट आहे. समदर्शी ईश्वर आपला व आपल्या दलित भक्तांचा हा अपमान अशा रीतीनें कुठपर्यंत सहन करील ? धर्म तरी हा भयंकर अधर्म कुठपर्यंत पचवीत राहील ? ते दुराग्रही पुजारी पतित--पावन प्रभूला कडयाकुलुपांत कुठवर बद्ध ठेवूं शकतील ?

— १४४ —

हा मानवतेवरील अत्याचार नाहीं तर दुसरें काय ? गरीब अंत्यजांना

विद्यालयांत आणि देवालयांत न जाऊं दणें हें एक असें अक्षम्य पाप आहे कीं ज्याची कैफियत देतांना मानवबुद्धि कोणत्याही प्रकारें वकिली करूं शकत नाहीं. मेंदू, बुद्धि व आत्मा यांना विकसित अन् उन्नत करण्याचा तर सर्वांना एकसारखा अनुकूल अवसर मिळालाच पाहिजे. सृष्टिकर्त्याची हीच इच्छा आहे.

— १४५ —

तो दिवस तर आतां अगदीं नजीक येऊं लागला आहे, कीं ज्या दिवशीं आपसांतील द्वेष अन् घृणा यांना प्रेमाच्या ज्वालेंत जाळून टाकून आम्ही सर्व बालकें आपल्या वडिलांसमोर आनंदानें खेळूं. याची पर्वा नाहीं कीं तो दिवस कलियुगाचा मानावा कीं सत्ययुगाचा. आम्ही तर त्या युगाला 'हरियुग' म्हणूं.

— १४६ —

पण तुम्हांला मुळीं हक्कच काय एकाद्याला नीच किंवा अस्पृश्य म्हणावयाचा ? त्या कुशल कुंभारानें हीं सगळीं खेळणीं एकाच मातीचीं व एकाच चाकावर चढवून बनविलीं आहेत ना ? त्या समर्थ सृष्टिकर्त्याच्या अलौकिक करामतीचा अंत काय खरोखर तुम्हांला लागला आहे ? जर नसेल तर मग विश्वास ठेवा कीं तुमच्या विचित्र व्यवस्थेचा कांहींच अर्थ नाहीं.

— १४७ —

अहो, आज तुम्हाला या दलितबांधवांना शिवण्यांत किळस वाटते. तर मग उद्यां त्या दलितबंधु रामाचे पाय तुम्ही कसे स्पर्शूं शकाल ? अरे, अजूनही या गरिबाला छातीशीं कवटाळा; राम तुम्हालाही छातीशीं धरील.

— १४८ —

या सुंदर सृष्टींत एकाद्याला अस्पृश्य किंवा घृणास्पद समजणें याचा अर्थ त्या सुंदरतम सृष्टिनिर्मात्याला तिरस्कारानें सदोष अथवा अपूर्ण मानणें हाच होय. म्हणून अस्पृश्यतेचा तर कोणताही जिवंत ईश्वरी धर्म अंगिकार करूं शकत नाहीं.

— १४९ —

परमात्म्याच्या या सुंदर सृष्टीमध्यें ज्या दरवाजानें हे देवा ! तुम्हीं प्रवेश केला आहे त्याच दरवाजानें हा बिचारा भंगीही आला आहे. अन् अखेर शेवटीं तुम्ही दोघेही जाणारही एकाच फाटकामधून ! मग या स्नेहसंबंधाच्या सुंदर सृष्टींत तुम्हीं विनाकारणच शिवाशिवीचा हा झगडा उभा केला आहे. धर्म-पंथांच्या पवित्र नांवावर आज ईश्वरी नियमांचें का बरें उल्लंघन करतां ?

— १५० —

छान ! आपलें जन्मजात पवित्र शरीर धर्मांच्या अति सुंदर शृंगारानें आज तुम्हीं सजविलें आहे. पण हें तर सांगा आधीं कीं अस्पृश्यतेचें काळें फासून आपल्याच हातांनीं आपला चेहेरा कां बरें काळा करून टाकला आहे महाराज ? हाही एकादा धर्मशृंगार आहे काय द्विजदेव ?

— १५१ —

दुसऱ्यांना अपवित्र समजून तुम्ही कसे पवित्र राहूं शकाल ? अहो, पवित्र तर तोच आहे ज्याचें हृदय अहंकाररहित आहे. अन् पवित्र तर हृदय-सदनांत बसलेला आमचा आवडता तो राम आहे. आपण सर्वच्या सर्व अपवित्र आहोंतच आहोंत.

— १५२ —

अरे बाबा ! आपल्या स्वतःकडे तरी नजर फेका ! ज्या गरीब चांभाराला तुम्ही नीच व अस्पृश्य म्हणत आहांत त्याच्यापेक्षां तुम्ही खरोखरच उच्च अन् पवित्र आहांत काय ? जरा आपलें रंगेल हृदय चांचपून तर पहा ! किती मलिनता जमलीय तुमच्या अंतरंगाच्या सुंदर पडद्यावर ! नका, नका हो करूं धर्म अन् व्यवस्थेच्या नांवावर ईश्वराच्या न्यायाचा खून !

— १५३ —

महाराज ! आरशांत जरा आपलाही चेहरा तर पहा ! काय, लागलीय एकादी विशेष मुद्रा ( मोहर ) तुमच्या शुभ्र भालावर ? तरी सुद्धां तुम्ही इतरांपेक्षां स्वतःला उच्च आणि पवित्र मानीतच आहांत ! काय हा उघड

उघड ईश्वर-विद्रोह नव्हे ? अशा तऱ्हेनें हे धर्मधुरंधरांनो आपल्या धर्माची व श्रद्धेची कां टर उडवीत आहांत ?

— १५४ —

मेहतर ( भंगी ) नव्हे, शुद्ध शब्द महत्तर ( श्रेष्ठतर ) आहे. तुमच्या कृतघ्न हिंदु समाजाची नीचातिनीच सेवा करतां करतां हा गरीब मनुष्य तुमच्या आंधळ्या दृष्टीनें नाहीं तर नाहीं पण त्या दीनवत्सल भगवानाच्या दृष्टीनें तर अवश्यमेव आज महत्तर झाला आहे. आपल्या या भोळ्या भावाला अजूनही पोटाशीं धरा अन् ईश्वराचे आभार माना. अरे, धुऊन टाका या दलित भंग्याच्या उज्ज्वल हृदयाच्या महत्तेनें आपली सर्व अंतरींची घाण.

— १५५ —

„दुरूनच त्या भंग्याच्या फाटक्या गलिच्छ वस्त्रांत तांब्याचे कांहीं गोल गोल तुकडे टाकूनच तुम्ही त्याच्या भारी ऋणांतून मुक्त होऊं शकाल काय ? अरे दौलतीच्या घमेंडखोर पुतळ्यांनो ! त्या गरिब्राच्या पवित्र घामाचें मूल्य तर आपला सगळाच्या सगळा खजीना देऊनही तुम्ही चुकवूं शकणार नाहीं. तुम्ही तर केवळ आपल्या हृदयाचें द्वार उघडूनच त्याच्या अमूल्य सेवेवर प्रीतीचीं फुलें वाहा; पतित-पावन प्रभु तुमचें कल्याण करील.

— १५६ —

ज्याच्या हृदयांत दीनदलितांविषयींची पीडा नसेल त्याच्या आत्म्यावर प्रेमाचा पक्का रंग कसा चढूं शकणार ? अन् त्याचा अंतरात्मा प्रेमाच्या रंगानें रंगला नसेल त्याला परम-पिता परमात्म्याचें पवित्र नांव घेण्याचा कांहींसुद्धां हक्क नाहीं. जेव्हां तुम्ही परमेश्वराच्या दीन व दलित लेकरांकडे प्रेमळ दृष्टीनें पहाल तेव्हांच तो तुमच्यावर प्रेम करील !

— १५७ —

निस्संदेह अस्पृश्यतेची उत्पत्ति असत्यापासूनच झाली आहे. तिला सत्य-मूलकधर्माचा आश्रय कसा बरें मिळणार ? उज्ज्वल धर्मावर जबरदस्तीनें फांसलेली ही अस्पृश्यतेची कलंक-कालिमा तुम्हां हिंदूंना धुवावीच लागेल.

असें करण्यांत तुम्ही केवळ त्या अंतर्यामी ईश्वराचीच आज्ञा मानाल. पवित्र पोथ्यांच्या काळ्या काळ्या रेघोट्यांची नव्हे.

— १५८ —

दया येते आहे महाराज, तुमच्या या ढोंगी शास्त्रपूजेची! एकवेळ मान्यही केलें कीं, या शास्त्रांत हें लिहिलें आहे, अन् त्या स्मृतीमध्यें तें लिहिलें आहे, पण हेंही माहीत झालें पाहिजे ना कीं ज्याच्यावरून साऱ्या जगांतील धर्मपोथ्या ओंवाळून टाकाव्या लागतील अशा तुमच्या अंतरात्म्याच्या त्या महान् ग्रंथांत काय लिहिलें आहे?

— १५९ —

पुसून कां नाहीं टाकीत आपल्या धर्मपुस्तकांतील त्या काळ्या काळ्या निरर्थक रेघोट्या, ज्यांच्यांतून क्षुद्र अस्पृश्यतेचा प्रेम-शून्य कलुषित अर्थ निघत असेल? अरे काय तुम्ही हें विसरून गेलांत कीं त्या मंगल-प्रभातीं या सुंदर सृष्टीचें सृजन प्रेम-प्रसाराच्या महान् सिद्धांतावरच केलें होतें? तर मग सांगा बरें, तुम्ही प्रेमवेदनेचे भिक्षुक (उपासक) बनणार कीं निव्वळ गतानुगतिक बनणार?

— १६० —

ठीक, आम्हीं कांहीं असत्यमूलक प्रमाणाची अवज्ञा करून तुमच्या धर्मपुस्तकांविरुद्ध विद्रोह केला अन् तुम्हीं मानवसमाजांत स्पर्शास्पर्शाची अजब सृष्टि रचून ईश्वराविरुद्ध विद्रोह केलांत! कुणी सांगेल, कीं कुणाची चूक आहे? पुस्तक-विद्रोह्याची कीं ईश्वर-विद्रोह्याची?

— १६१ —

अरे बाबा, चांभारही अस्पृश्य नाहीं किंवा भंगीही अस्पृश्य नाहीं. कोणी अस्पृश्य असेल तर स्त्रीसाठीं परपुरुष, अन् पुरुषाला परस्त्री! याचप्रमाणें दुसऱ्याचा पैसाही अस्पृश्य आहे.

— १६२ —

दुरूनच हात जोडतों बाबा, अशा या विचित्र धर्माला, ज्यामध्यें एक अहंमन्य

मनुष्य दुसऱ्या दलित मनुष्याला पाहून अनुचितपणें घृणा करीत असेल अन् ज्या धर्मांत परमात्म्याचीं खरींखुरीं मंदिरें जीं मानव हृदयें त्यांची मोडतोड करून दगडा-विटांच्या नकली देवळाचें रक्षण केलें जात असेल ! अशा या ईश्वर-शून्य धर्म-जाती घेऊन अखेर आम्ही करणार तरी काय?

— १६३ —

मर्यादा कसली ? अहो, सत्याच्या मर्यादेचें उल्लंघन कोण बरें करील ? पण कुठेंही असत्य व अधर्म यांचीही मर्यादा असू शकते ? ज्या धर्म-मर्यादेचें रक्षण तुम्ही आपल्या शिवाशिवीच्या भुतांच्या द्वारें करूं इच्छितां त्या लाजाळू-रूपी धर्माला, बाबांनों, हें पहा, आम्ही दुरूनच नमस्कार करीत आहोंत. होय, अशा धर्माचें ग्रहण करून आम्ही काय करणार ?

— १६४ —

हिंदु जातीचे धर्मव्यवस्थापक जर अस्पृश्यतेची प्रथा शास्त्रविहित अन् धर्मानुमोदित मानीत असतील तर त्यांत काय आश्चर्य ? गोऱ्या पाद्र्यांनींही बायबलांतून एकदां असें सिद्ध केलें होतें कीं दास्यत्वप्रथा धर्मसंमत अन् ईश्वरनिर्दिष्ट आहे ! आपल्या नीच स्वार्थसिद्धीसाठीं कल्पतरूसारख्या सांप्रदायिक ग्रंथाच्या योगें काय प्रमाणित करणें अवघड आहे ? त्या उद्धट अमीरांची गोष्ट सोडूं या ! आम्ही तर असें विचारीत आहोंत कीं, आम्हां ठेंचलेल्या गरीब गुलामांच्या हृदयांत या धर्मपुस्तकांविषयींचा अन् या धर्मगुरूंविषयींचा श्रद्धाभाव कसा काय राहूं शकेल ?

— १६५ —

मित्रांनो ! ही सगळी त्या विश्वेश्वराच्या दरबारांत हजर होण्याची तयारी करीत आहांत ना ? तर मग आपला हा रंगीत धार्मिक पोषाक उतरवून टाका ! तिथें तर, बस्, मनुष्यतेचें एक पांढरें शुभ्र वस्त्र पांघरूनच तुम्हांला गेलें पाहिजे.

— १६६ —

काय-तुम्हीं आत्मशुद्धि केली आहे ? तसें दिसत तर नाहीं ! कारण या वैदिक वेदीवर आजही तसलेंच शुद्धीचें विचित्र सोंग तुम्हीं घेतलें आहे.

— १६७ —

विध्वंस करणें तर सोंपे आहे. सृजन करा. आम्ही तुम्हांला पुरुषार्थी समजूं. होय बाबा, एक वेळ जगांला विनाशामधून विकासाची चमक दाखवा; पण हें ध्यानांत आहे ना कीं, पुरुषार्थप्रदर्शन प्रभु-कृपा-साध्य आहे ?

— १६८ —

हे परिश्रांत पथिकांनो ! घ्या तर खरें, मानव-प्रेमाचें हें दोन घोट थंडगार सरबत ! हें पिऊन मजेनें प्रेमळ रामाच्या पायाशीं बसा ! तुमच्या जीर्ण जीवनाचें एकमात्र ध्येय हेंच आहे ना ? तर मग तुम्ही धन्य आहांत !

— १६९ —

एक वेळ ठोठावा तरी हे मित्रांनो, त्या प्रियतमाचा दया दरवाजा ! दार उघडेल अन् तुम्ही आंत जाल ! एकदां हांक तरी मारा प्रेमानें त्या प्रेमळ कृष्णाला ! तो ऐकेल अन् हृदय मोकळें करून तुम्हांला भेटेल.

— १७० —

नाहींतर दुसरा कोण आज्ञा देणार ? आमच्या सृष्टिकर्त्यांचीच तर ही राजाज्ञा आहे ! होय बाबा, हीच ती कीं, 'धूलि-भरित' दलितांच्या अन लाथाडलेल्या पतितांच्या सजल नेत्रांमध्यें ईश्वरी प्रेमाचा प्रकाश पहा.

— १७१ —

ललितकलांच्या विषयीं काय हीच तुमची श्रेयस्कर भावना आहे ? मनुष्यतेचा तिरस्कार हें कांहीं कला-प्रेम आहे ? मित्रांनो ! या सुंदर सृष्टींत मनुष्यताच तर त्या सुंदरतम कलाकाराची श्रेष्ठतम ललित कला आहे.

— १७२ —

मी रोगी आहें; महारोगी आहें. मी दुस्साध्य अपराध-रोगानें ग्रस्त आहे बाबा ! एकाही वैद्यानें किंवा हकीमानें आजपर्यंत माझ्या या रोगांवर योग्य उपाय केला नाहीं. न्यायालयवाल्यांनीं, अडाणीपणानें माझी नाडी पाहून मला तुरुंगांतील दवाखान्यांत कोंडून घातलें. तेथील घाणेरड्या वातावरणांत तर माझा रोग भयंकर वाढला. आजपर्यंत जुलूम अन् घृणा यांचीं विषारी

औषधेंच मला पाजविलीं गेलीं. कुणी प्रेमाची एक मात्राही मला दिली नाहीं. त्या अत्याचारी क्रूर डॉक्टरांना माझ्या या रोगाचा उपायच माहीत नाहीं, तर उपाय काय करणार माती !

— १७३ —

हजार वेळां स्वागत आहे त्या दारुण दुःखाचें, जें दया अन् करुणेच्या धारेंत स्नान करून माझ्या हृदयद्वारावर आलें आहे. खात्री आहे कीं, माझा तो मित्र मला प्रेमाच्या समीप घेऊन जाईल. जें क्रूरता व कृतघ्नता यांचा नजराणा देऊन मजकडून मोहनगरींत नंगा नाच नाचवूं इच्छितें तें हें सुंदर सुख बरोबर घेऊन मी काय करूं ? खात्री आहे कीं हें विषरूप सुख एखादे दिवशीं माझा विश्वासघात करील. होय. आपल्या क्रूर कामनांनीं सहृदयतेचा श्रोत आटवूनच हा थांबेल. मग हृदयहीनाच्या नशिबीं प्रेमाचा निधि कुठला ? म्हणून मी दुःखीच बरा आहें; कारण या अवस्थेंत मला प्रेम-देवाची आराधना कधीं ना कधीं करावीच लागेल. अन् म्हणूनच आपल्या दारुण दुःखाचें मी स्वागत करतों.

— १७४ —

माझ्या अपराध-रोगाला लोक सांथीचा रोग समजतात. सगळे माझ्या-पासून दूर रहातात, सर्वच जण माझी घृणा करतात. एकाही हृदयांत मला स्थान नाहीं. माझ्याविषयीं सहानुभूति बाळगणारा एकहि मनुष्य नाहीं. लोक म्हणतात कीं हा रोग उडून लागतो. 'दूर रहा, दूर रहा,' हा एकच आवाज माझ्या कानांत दुमदुमत असतो. मी तळमळत असतों सहानुभूति अन् प्रेम यांच्या औषधासाठीं, अन् ते सगळे मला दुरूनच हुसकून लाव-तात. कृपा करून कुणी तरी मला तें एकच औषध देईल तर मी आत्तांच्या आतां खडखडीत बरा होईन. पण देणार कोण? सगळेच तर तिरस्कार करताहेत. हाय, गे हृदयहीनते ! तुझें लोकभक्षक विक्राळ रूप मीं आज प्रथमच पाहिलें.

— १७५ —

या दयेबद्दल आभार ! तुम्ही मला आपल्याजवळ बोलवीत आहांत, पण मी तेथें कसा येऊं ? जरा शोध करून पहा. मी अपराधी आहें. पहातां-

क्षणींच तुम्ही मला आपल्या समोरून घालवून द्याल. जरा बारकाईनें पहा. मी पतित आहें. ओळखतांक्षणींच तुम्ही मला लाथाडून द्याल. आमच्यासारख्या दलित-पतितांविषयीं तुमच्या विलासपूर्ण हृदयांत घृणाच निर्माण होऊं शकेल. सहानुभूति नव्हे. तुम्ही मोठे आहांत, संपन्न आहांत, सुखी आहांत नि मी करुणेचा एक पतित भिकारी आहें. तुमच्या कृपेचा मी हक्कदार नाहीं. तुमच्याजवळ यावयास माझ्यासमोर मार्गच नाहीं. गरिबाला या मोहाच्या दलदलींत अडकवूं नका. क्षमा करा, बाबांनो क्षमा करा !

— १७६ —

किती ढोंगी आहें मी ! आंत तर दुःखाच्या दारुण दावाग्नीच्या योगें जळत आहे आणि वरून असें दाखवीत आहे कीं जणूं काय मी परमप्रसन्न आहें, महान् सुखी आहें ! वास्तविकपणें हें सर्व सुखाचें सोंग घेऊन मी फिरत आहें. उसनें हंसें आणतों आणि नकली आनंद प्रकट करतों. कोणीतरी हृदयांत जाऊन जरा पाहावें तरी–तेथें कसा भयानक चीत्कार आहे, कसा भीषण हाहाःकार आहे ! जेव्हां मी सुखी मनुष्याचें सोंग घेऊन दुसऱ्यांच्या मनोरंजनासाठीं हंसू खेळूं लागतों तेव्हां माझ्या हृदयांतील जखमा अधिकच ताज्या होतात, टाके तुटून जातात ! माझ्या निर्लज्जपणाला कांहीं अंत, कांहीं सीमा ?

— १७७ —

लखलाभ होवो मला माझी ही जराशी अंधुक चेतना. माझा कृष्णमोहन माझ्या हृदयाच्या अंगणांत ठुमकत ठुमकत नाचत तर आहे; बस् इतकीच चेतना मला सदा हवी आहे: बाकी सर्व खुशाल विसरून जाईना का पण ही प्रेमळ आठवण न विसरो ! हिच्याविणें तर बेशुद्धिच चांगली ! जी माझ्या मोहनाची स्मृति निर्दयपणें विसरून जाते अशा त्या सावधानतेला घेऊन करणार तरी काय मी ? माझ्या या जराशा चेतनेनें जी अमर्याद बेशुद्धि उत्पन्न होते. तिची मधुर मधुर मजा मीच जाणूं शकतों. विश्वास ठेवा, ही मजा आमच्या साऱ्या संसारी सावधानतेंत नाहीं. एवढ्याच चेतनेची प्राप्ती करून आम्हीं सदा बेशुद्ध व्हावें, बस हेंच आपल्या कृष्णमोहनापाशीं

आम्ही मागत आहोंत आणि आपल्या या मागणीचें अभिनंदनहि आम्ही मोठ्या मधुरमस्तपणें करीत आहोंत.

— १७८ —

हे स्वामी, ज्याच्या मदिरेनें उन्मत्त होऊन मी तुझी करुणामयी कृपा विसरून जाईन असें सम्मोहन सुख मला मुळींच देऊं नकोस. आपल्या कांटेरी झोपडींत बसून मी आपल्या सुखकर पीडेवर यासाठीं प्रेम नव्हतें केलें कीं बक्षिसाखातर मला अहंकाराचा पेला मिळावा ! हें नाहीं चालाव-वयाचें. मी तर आपल्या त्या आवडत्या दुःखाचीच आठवण काढीत राहीन. तें दुःख कधींमधीं मला तुझी आठवण तर देईल, तुझ्या प्रीतीसाठीं मला कधीं उन्मत्त ( वेडा ) तरी बनवील.

— १७९ —

माझी निर्लज्जता तर पहा. जराशा स्वार्थासाठीं आपलें सर्व स्वातंत्र्य विकून टाकून या प्राणांना मोठ्या प्रेमळपणें अपमानित जीवनाच्या हिंदोळ्यावर मी जोजवीत आहे. आपलें सर्वस्व गमावूनहि ऐट करीत आहे, डोलत आहे नि हंसत आहे. आज हृदयांत दयाहि नाहीं अन् करुणाहि नाहीं; सरसताहि नाहीं नी सहृदयताहि नाहीं. प्रेम कशाला म्हणतात हें सुद्धां विसरलों आहे. आतां तर ही पराधीनताच चांगली लागत आहे. गुलामीच्या गळ्यांत प्रेमानें हात टाकून मृत्यूची मधुर मजा अनुभवित आहें पण माझी बेभान निर्लज्जता सांगत आहे कीं, 'हेंच जीवनाचें माधुर्य आहे !'

— १८० —

हे कुशल चालकांनो ! चालवीत रहा झालें आपल्या मर्जीप्रमाणें आम्हाला यंत्राप्रमाणें. जोंपर्यंत तुमच्यानें शक्य होईल तोंपर्यंत. चालतां चालतां आम्ही झिजून जाऊं किंवा थकून जाऊं, पण आम्हांला सदोदित फिरवीत ठेवणें तुम्ही सोडूं नका. होय; नाहींतर तुमचें मनोरंजन कसें होणार ? आम्हां दुर्दलित गुलामांचें अस्तित्वच तुमच्या मनोरंजनासाठीं आहे. मजेनें करीत रहा मनोरंजन आमच्या दलितावस्थेकडून ! यांतच तुमची योग्यता आहे. यांतच तुमची प्रतिष्ठा आहे.

— १८१ —

हीच तर तुमची चूक आहे कीं, तुम्ही एकाद्या अपराध्याच्या बाबतींत आपण दिलेला निर्णय अंतिम समजतां. तुमचा निर्णय अंतिम होऊं शकत नाहीं, यथार्थ होऊं शकत नाहीं, आणि पूर्णहि होऊं शकत नाहीं. जिथें निर्णायक स्वतःच अल्पज्ञ नि अपूर्ण आहे तेथें त्यानें दिलेला निर्णय सर्वज्ञता-सूचक आणि पूर्णतापरिचायक तर होऊंच शकत नाहीं. सत्याला आमच्या-पाशीं कांहीं मर्यादा नाहीं, पूर्णतेची आमच्याजवळ कांहीं व्याख्या नाहीं-सर्वसत्य अन् परमपूर्ण तर तो पतितपावन प्रभूच आहे. अंतिम निर्णय तोच दयाळू सृष्टिकर्ता करूं शकेल. त्याचा अतर्क्य अधिकार आम्ही क्षुद्र जीव कसा हिरावून घेऊं शकूं ?

— १८२ —

दया हेंच या भयंकर रोगांवरील औषध आहे. अपराधांचा हा अधि-काधिक वाढणारा रोग याच औषधानें दूर होऊं शकेल. जरा अधिक खोल-वर घुसा, हृदयाचा दरवाजा उघडा, अन पहा तेथें हें औषध ठेवलेलें आढ-ळून येतें कीं नाहीं तें ! अवश्य ठेवलें असेल; तुम्ही त्याला केवळ विसरला आहांत. उघडा तर खरें तो आंतील दवाखाना अन् लुटूं द्या तुमच्या दयेचें तें सगळेंच्या सगळें औषध त्या निराश रोग्यांना-त्या प्रेमळ अपराध्यांना ! तुम्ही गृहस्थ असाल तर आपल्या मुलाबाळांसाठींच या संजीवनीचा खजिना सताड उघडा ठेवा. तुम्ही विरक्त असाल तर त्या परम प्रभूच्या प्राप्तीसाठीं या स्वर्गीय सुधेचा वर्षाव परितप्त धरातलावर करा.

— १८३ —

क्रोधाचें हें दास्यत्व आम्हीं कां स्वीकारलें ? क्रूरतेला आम्हीं छातीशीं कां म्हणून कवटाळलें ? यासाठींच ना, कीं आमची विश्वासमयी अभागिनी सहृदयता त्या सत्यानाशी मादक संदेहाच्या सुंदर रूपावर आसक्त झाली. अन् संधि साधून आमच्या मानसिक दुर्बलतेनें कपटानें तिला जुलुमाचा एक विषारी प्याला पाजवला. आतां आम्हांला हें समस्त विश्व अविश्वासमयच दिसत आहे. आज आम्हीं संशयाच्या जगांत रहात आहोंत. एवढ्या

तेवढ्याशा गोष्टींत आतां आम्हांला क्रोध येतो, कुलटा क्रूरता आमचें हृदय खाऊन टाकते, तरीसुद्धां आम्ही तिच्या गळ्यांत हात टाकून तिच्यावर प्रेम करीत आहोंत. म्हणूनच तर आम्हांला आज अहंकाराचा हा अंधार बरा वाटतो आहे, प्रेमाचा तो प्रकाश नव्हे !

— १८४ —

हा आनंदच तर मला भयानक वाटतो. सदोदित हीच आशंका मनांत रहाते कीं, ही क्रूर प्रसन्नता माझ्या भोळ्या हृदयाशीं कुठें विश्वासघात तर नाहींना करणार? ही उन्मादिनी प्रफुल्लता माझ्या लाडक्या वेदनेला जबरदस्तीनें माझ्यापासून अलग तर नाहींना करणार? आनंदाचा कैफ उतरतांच मला माहीत आहे मी स्वतःला किती खोल गर्तेत पडलेला पहातों ! मी आनंदी कसला रहातों, आपल्या स्वतःशींच बेईमानी करतों. जो आनंद-रस माझ्या खिन्नतेच्या भग्न पात्रांतून ओसंडत आहे, तो या प्रसन्नतेच्या हेमपात्रांत कुठून येणार? जग मला खुशाल मूर्ख म्हणो, पण मी तर बुवा, अप्रसन्नच बरा, खिन्नच बरा.

— १८५ —

मनाविरहित कां होईना, पण या रंगांत मी खूप हंसतों, खूप खेळतों. हंस-णार खेळणार नाहीं तर तुमच्या या रंगेल आंगणांतून लगेच बाहेर हाकलून देतील मला. हंसण्याखेळण्याची आज्ञाच झालीय ना ! होय. माझ्या राणीनें, माझ्या अहंतेनें मला हा हुकूम दिला आहे.

— १८६ —

वाहवा ! जेव्हां मी हंसतों तेव्हां एका अज्ञात वेदनेच्या शेंकडों बरच्या हृदयाला छेदून पार जातात. जेव्हां मी खेळतों तेव्हां एका अज्ञात दावा-नलाच्या ज्वाला (झळा) उन्मत्त होऊन छातीशीं भिडतात. तरीसुद्धां निर्लज्जतेच्या मोहविणाऱ्या मांडीवर बसून मन रमविण्यासाठीं मी नेह-मींच हंसत असतों. नेहमींच खेळत असतों. आपल्या या गलिच्छ फाटक्या-तुटक्या कपड्यांवरहि गर्द गुलाबी रंग देत असतों.

— १८७ —

पण हें कुणाला माहीत असणार कीं मी किती भयंकर कपटी आहें. माझें हें सगळें हंसणें, खिदळणें बनावटी आहे. अंतःकरणापासूनचें नाहीं. हा माझा सारा रंग वरवरचा आहे, नैसर्गिक नाहीं. अहो मी तर स्फुंदत स्फुंदत हंसतों अन् आक्रोश करीत खेळतों. माझ्या स्वतःपुढेंहि हें एक मजेदार कोडें आहे.

— १८८ —

मी जगाशीं दगाबाजी खुशाल करीत असेन, पण आपल्या या मुसमुसणाऱ्या, स्फुन्दणाऱ्या हृदयाला मी कसा दगा देऊं शकेन? याच्यावर खूप रंग चढवला पण चढतच नाहीं हा दुःखित जीव तर जन्मापासूनच अश्रूंचा हट्टी प्रेमी आहे. याला कसें हंसवूं? कसें खेळवूं? हा एखाद्याच्या सुस्काऱ्याला हृदयाशीं कवटाळण्यासाठीं धावतो, तर एकाद्याच्या किंचाळीसरशीं कावराबावरा होतो. रागरंगाच्या गुलाबी अधरांवर सदा रुसून बसतो अन् खुशामतीच्या गोड गोड वाणीशीं याचें कधीं पटत नाहीं! असें दिसतें कीं या वेड्याची मैत्री त्या लाडक्या वेदनेशीं आहे,-ज्या वेदनेवर भुरळ पाडणारा रंग बसूं शकत नाहीं! याचें प्रेम त्या पीडेवर आहे, जिचें सुंदर मुख बुरख्यानें झांकलें जात नाहीं. मी तर बाबा आश्चर्यचकित झालोंय आपल्या या नाराज हृदयामुळें.

— १८९ —

ज्यानें या हैराणीच्या चक्रांत मला गुंतवून टाकलें आहे, आतां त्याच आपल्या रुसलेल्या हृदयाची मी समजूत घालीन अन् त्याच्याच पवित्र अश्रूंनीं या कलंकित शरीरास न्हाऊं घालीन. आतां त्या निष्प्रेमी प्राण्यांचच प्रेम करीन, त्या दलितांचेच लाड करीन, त्या पतितांचीच पूजा करीन. एकाद्या कोपऱ्यांत बसून आतां पश्चात्ताप अन् प्रायश्चित्त यांचीच साधना करीन.

— १९० —

"आमच्या ध्येयाचें जरासुद्धां ठावठिकाण माहीत नाहीं तरीहि पुढें पुढें

जातच आहोंत. हिला काय सफर म्हणावयाचें? रस्ता चुकतों, इकडे तिकडे भटकतों, तरीहि एका विशिष्ट स्थानाकडे आकर्षित होऊन ओढलें जात आहोंत. आमच्या या पराभूत हृदयाच्या खिळखिळ्या झालेल्या कड्या जबरदस्तीनें कोण ओढत असतो, समजत नाहीं! आशेची व्याख्या तर आम्हांला माहीत नाहीं, पण आम्ही इतके सांगूं शकतों कीं या अज्ञात-लक्ष्य (ध्येय) यात्रेमध्यें आणि त्या अस्पष्ट आकर्षणामध्यें अनंत आनंद आहे. जें आकर्षण पडद्याच्या आड असेल, तें सत्यच असणार, शिवच असणार नि सुंदरच असणार.

— १९१ —

ज्या दयेच्या जवळ अहंकार असेल, क्षुद्रता असेल, जाहिरातबाजी असेल ती दया नसून ढोंग आहे. अशाच प्रकारच्या खोट्या अन् नकली दयेची विक्री आजकाल मोठेपणाच्या बाजारांत मोठ्या धडाक्यानें होत आहे. या दयेचे चतुर व्यापारी गरीब दुःखितांना खूप फसवितात. नकली दयेचा एक तुकडा घेऊन त्याच्या बदल्यांत बिचारे जन्मभर गुलामीचा पट्टा गळ्यांत खुशीनें बांधून घेतात. जे आश्रित आहेत, आर्त आहेत ते ही कपटी कला कसें काय ओळखणार? दयालुत्वाचा साईनबोर्ड लावून किती क्रूर अन् कलुषित हृदयाचे व्यापारी हा नीच व्यवसाय करीत आहेत, कांहीं सुमार!

— १९२ —

प्रकृति ज्याला सांसारिक सुख अन् विषय यांमध्यें अडकवूं इच्छिते त्याचें हृदय करुणा-रहित व प्रेमशून्य करून टाकते. अन् ज्याला तो प्रभु आपल्याजवळ बोलावूं इच्छितो त्याला ती महामाया दुःख देते, दैन्य देते, दया देते अन् प्रेम देते. असा कोण मूर्ख असेल कीं जो रत्न देऊन कांच खरेदी करील? जे सुख अन् विषय यांवर लाथ मारून दुःख अन् दयेच्या गळ्यास मिठी मारतात ते खरोखर धन्य आहेत. जे प्रभुतेला ठोकर मारून प्रभु-प्रेमासाठींच अधीर रहातात ते खरोखर धन्य होत.

— १९३ —

हें भावनाप्रधान हृदय कसलें म्हणावयाचें, ही एक आपत्तिच आहे. जरा

याला ठेच लागण्याचा अवकाश कीं लागलींच सारें शरीर बेचैन होऊन जातें. हें हमेशा वेदनेच्या तीक्ष्ण तीरांनीं घायाळ होत असतें. हें वेडें हृदय सुखाचा त्याग करतें अन् दुःखाला आपलेंसें करून घेतें. याचा क्षमेवर विश्वास आहे अन् शिक्षेवर अविश्वास. तसें पाहिलें तर ईश्वराचीहि अधीनता हें मानीत नाहीं, पण सरळ प्रेमाचें तर हें पहिल्यापासूनच गुलाम आहे, असलें हें भावनाप्रधान हृदय जगाच्या काय कामाचें? कोण मूर्ख सुख व स्वार्थ सोडून ही आपत्ति आपल्यावर ओढवून घेईल?

— १९४ —

हींच तर विनाशाचीं स्पष्ट लक्षणें आहेत. जें तुमच्या आत्म्याच्या अनुकूल आहे त्याच्याकडे तुम्ही संदेहाच्या दृष्टीनें पाहतां अन् जें प्रतिकूल आहे त्याच्यावर झटकन विश्वास ठेवता. या विश्वांत प्रेमच आत्म्याच्या अनुकूल आहे व द्वेषच त्याच्या प्रतिकूल आहे. तुमच्या हृदयांत प्रेमाविषयीं परमप्रेम आणि द्वेषाविषयीं आत्यंतिक द्वेषभाव यांना जर स्थान मिळालें असेल तर हें निश्चित आहे कीं तुम्ही कल्याणपथावर पोहोंचला आहांत.

— १९५ —

भावी समयच खरा निर्णय देईल, अन् अवश्य न्याय मिळेल. छेः छेः! असं नका म्हणूं कीं ईश्वर अन्यायी आहे. तो आपलें अव्यक्त सत्य अवश्य प्रगट करील. पण तें केव्हां अन् कसें? हेंच तर तुमच्यासमोर एक महान् रहस्य आहे. अधैर्यवश होऊन तुम्ही अविश्वासाकडे धांव घेतां अन् लागलींच त्या मोहक संशयाला पोटाशीं धरतां. कधीं आत्म-निर्णय तरी केला आहे? कदाचित् कधींच नाहीं. तर मग राग व द्वेष यापासून उत्पन्न झालेल्या या अर्धवट निर्णयांना अंतिम निर्णय समजता? अनंत सत्याची प्रतीक्षा करीत रहा; न्याय अवश्य मिळेल.

— १९६ —

भटकत भटकत आज आम्ही या 'पीडा-पुरी'त येऊन पोहोंचलों आहोंत. खरें पाहिलें असतां ही वास्तविकतेची वस्ती आहे. गरीब गोपाळ येथें नागव्यानेंच खेळत आहे. हातांतील भाकरीवर लोणीहि नाहीं. तर

येथें मेवामिठाई कुठून येणार ? आमचा हा हृदयहारी कोरडे चणेच मोठ्या आनंदानें खात आहे. गोविंदाच्या बांसरीमधून हे कसें हृदयवेधक स्वर निघत आहेत पहा. काळ्याकुळकुळीत किसानांच्या अन् मलिन मजुरांच्या जमावांत कसा सुंदर थयथय नाचत आहे आमचा सांवळा कान्हा !

— १९७ —

कुणाला कल्पना होती कीं या अर्धनग्न व अर्धपोटी लोकांच्या या भयानक भग्नावशेषामध्यें आमचा प्रेमळ प्राणाधार खेळत असेल म्हणून ? कुणाला माहीत होतें कीं या गलिच्छ गल्ल्यांतून आमचा कुंजविहारी कृष्ण आपली विश्वविमोहिनी बांसरी वाजवीत असेल म्हणून ? मोठीं मोठीं मंदिरें अन् महाल यांना सोडून आमचा राजराजेश्वर या सडलेल्या झोपड्यांमध्यें मजुरांची मजुरी करावयास आहे. किती दिव्य दर्शन आहे ! श्रीकृष्णाच्या या लोकललामरूपाचें चित्र वेद, बायबल, अवेस्ता इत्यादि धर्मग्रंथांच्या पानापानांवर रेखाटलेलें आहे. पण दरिद्रीनारायणाच्या या तसबिरीची पूजा आमच्यापैकीं किती लोक करीत असतील ? ते नेत्रच नाहींत; तें हृदयच नाहीं ! विलासदेवाचे उच्छृंखल उपासक आमच्या दरिद्रीनारायणाचें हें कलाविहीन रूप आपल्या रंगेल नेत्रामध्यें कसें बरें रेखाटणार ?

— १९८ —

हें पहा, उभे आहोंत ? तपासावयाचें असेल तर तपासा, पारखावयाचें असेल तर पारखा. एकदां सांगून तर टाकलंय कीं आम्ही अपराधी आहोंत पतित आहोंत, पापी आहोत. आम्ही आपली नग्न निर्लज्जता झाकूंच शकत नाहीं. भ्रम झालाय तुम्हाला. आम्हां नीचांना जवळ करण्यापासून काय फायदा तुमचा ? हें विकतचें श्राद्ध कशाला ओढवून घेता शिरावर ! तुम्ही आमच्यावर दया करतां ! ही तर आमच्या जीवनांत एक अत्यंत अभ्दुत गोष्ट आहे. दया अन् प्रेमाचें मर्म आम्हां पतितजनांना कुठून समजणार ? आम्हाला तर तुमच्या शिव्या अन् लाथा खावयाच्या एवढेंच ठाऊक आहे. तुमच्या चिरपरिचित क्रूरतेतच आम्हांला जीवनाचें सौंदर्य दिसतें. तुमची ही दया अन् हें प्रेम पाहून तर आम्ही थरथर कांपू लागतों. तुम्ही तर आम्हाला आपलें तेंच सुंदर हिंसक रूप दाखवा नि करून टाका तुकडे तुकडे आमच्या

अभागिनी मनुष्यतेचे. भल्या माणसांनों, आम्हां पाप्यांवर हीच तुमची मोठी कृपा होईल.

— १९९ —

सोडा, हे जुलुम्यांनो, निष्ठुरांनो, ही आशा सोडून द्या! तुमच्या त्या क्रूरतेचा मी मुळींच अनुयायी होऊं शकणार नाहीं. दुर्दैवानें माझें हृदय तसें बनविलें गेलें नाहीं. जुलूम पाहून हें दुर्बल हृदय थरथर कापूं लागतें. कुठून आणूं ती कठोर दृढता यामध्यें? कशा देऊं एकाद्याला शिव्या? कसा एकाद्याचा अपमान करूं? दुसऱ्यांचीं क्षुद्र छिद्रें पहात असतां आपले महान दोष कसे नजरे आड करूं? हें कांहीं होणार नाहीं. माझ्या हृदयाची ही दुर्बलताच मला लखलाभ होवो. तुमच्या क्रूरतापूर्ण विचारामध्यें मी सहकार्य देऊं शकत नाहीं म्हणून तुम्ही नाराज कां बरे होतां? तुमच्या त्या निर्दयतेच्या भडक रंगांत हें दुर्बल हृदय कधीं रंगून जाईल ही आशा सोडून द्या.

— २०० —

मी विकला गेलों आहे, खरोखर मी विकला गेलों आहे. आपली आवडती स्वतंत्रता गुलामीच्या बाजारांत मी स्वतःच्या हातांनीं मातीमोलानें विकून टाकली. आहे. अंतःकरणांत एक आग लागली आहे अन् त्या गिऱ्हाइक.बरोबर मनोरंजनासाठीं रुक्ष हास्य करीत आहे. त्यांच्या भयानें गरीब बिचाऱ्या निःश्वासांवर ही प्रेम करूं शकत नाहीं किंवा अभाग्या अश्रूंचा ही आदरसत्कार करूं शकत नाहीं. हृदयाला आंतल्या आंत दडपत असतों. वेदनेला लपवींत असतों, तरीसुद्धां माझे ते मित्र मला सुखी समजतात. पण वास्तविकपणें विकल्या गेलेल्या व परतंत्र अशा माझ्यावर काय आपत्ति येऊन पडली आहे हें मलाच माहीत! खरेंच सांगतों, पारतंत्र्याच्या या सोनेरी पिंजऱ्यांत माझा एक एक क्षण एक एक युगाप्रमाणें जात आहे.

— २०१ —

आतां तर तूं तेथेंच जा, तेथेंच निवास कर अन् तेथेंच रमून जा. आपलें भग्न हृदय दलितांचें व पतितांचें निवासस्थान बनव. पतितपावन

प्रभूला तूं स्वतः शरण जा अन् सामाजिक अत्याचारांनीं गांजलेल्या आर्त अनाथांनाहि तेथें घेऊन चल. तेथें दुःखितांची सेवा कर; दलितांची पूजा कर, अश्रूंचा आदरसत्कार कर, निश्वासांची मर्यादा राख, चल, तेथें दयेचा पदर पकड. प्रेमळ करुणेला उराशीं धर. तेथेंच कष्ट-क्रंदनाचें संगीत ऐक, अन् तेथेंच विरल वेदनेची वेणू वाजव. हे माझ्या अचेत मना ! माफीच्या मस्तीनें मस्त होऊन झिंगत झिंगत चल. चल, त्या क्रूर सदेहाची मान मुरगाळून टाक. राक्षसिणी क्रूरतेला पायाखालीं तुडवून टाक. सत्यानाशी जुलुमाला, चल, जाळून टाक. आपली अन् दुसऱ्या पतितांचीं पापें शांतिजलानें धुवून टाक. सहनशीलतेला सजव, त्यागाचे मनमुराद लाड कर, आणि त्या आवडत्या विश्वासाचें चल तेथें पोटभर अभिनंदन कर ! जिकडे तुझ्या शेष जीवनाचे ते अमूल्य क्षण तुला आज अधीरतेच्या नीरव संकेतानें बोलावित आहे. तेथेंच चल तूं आतां ! काय चलणार ना तिकडे ?

— २०२ —

आतां तर जीव गुदमरूं लागला आहे. असें वाटतें कीं तळमळीची आतां अगदीं हद्द झाली. अरे कुठे मुक्कामाचें स्थान तरी आहे काय ? तुमच्या मर्जीच्या रस्त्यानें अजून कुठवर चालावें लागेल ? जबरदस्तीनें आपलें घायाळ अस्तित्व तुमच्या प्रसन्नतेच्या बलिवेदीवर चढविलें तर खरें. हे माझ्या निर्दय मालकांनों माझें अजून काय करावयाचें मनांत आहे तुमच्या ? कृपा करा; आतां तरी जरा उडूं द्या माझ्या फडफडणाऱ्या पीडित प्राणाना त्या उन्मुक्त आकाशांत जें माझ्या अलक्ष्य प्रेमाच्या परमाणूंनीं अभिव्याप्त होत आहे.

— २०३ —

बस करा आतां अडवूं नका ! नाहीं राहूं इच्छित तर काय म्हणून व्यर्थ त्याच्यावर दडपण घालतां ? त्या बिचाऱ्याला कांचन कारागृहांत कोंडून घालून तुम्हांला कोणतें स्वर्गीय सुख प्राप्त होईल ? काय वाटेल तें करा, स्वातंत्र्याचा भुकेला तो गरीब पथिक तुमच्या माया-मंदिरांत प्रतिष्ठित होऊन आतां अधिक राहूं इच्छित नाहीं. सोडून द्या आतां आपला हट्ट !

— २०४ —

जाऊं द्या आतां या सावधगिरीच्या कौशल्याला ! याला तर आतां विसरूनच जा. तुम्ही तर, हे मित्रांनों, जिच्यामध्यें करुणेनें आपल्या वीणेचीं गाणीं लिहिलीं आहेत, नि जिच्यांत प्रेमानें आपल्या मदिरेचे मंत्र अंकित करून ठेवले आहेत अशी ती बेशुद्धीची पोथी वाचीत बसा. जोंव तुम्ही 'असत्'च्या बाबतींत बेशुद्ध होणार नाहीं तोंवर 'सत्'ची शुद्धि येणार नाहीं. प्रेमाचा प्याला झोंका अन् त्याच्या नशेंतच उद्धट अहंकाराचा चेदामेंदा करून टाका. अहंकाराला विसरून जा अन् आत्मतत्त्वाची ओळख करून घ्या. अहंभावनेला जर जवळ कराल तर ईश्वराच्या पाया-जवळ कधींच जाऊं शकणार नाहीं. म्हणूनच तर म्हणतात कीं, त्या प्रियतमाचें दर्शन हवें असेल तर सदा करुणेची वीणा वाजवीत जा अन् प्रेममदिरेचें पान करीत जा.

— २०५ —

या; पतितबंधु प्रभूचें दार उघडें आहे. आम्हां लोकांना अभयदान मिळेलच मिळेल. अपराध्यांनों, कलंकितांनों, पतितांनों, अन् पाप्यांनों ! या, बेधडक निघून या ! चला आपण आजच आपली एक नवीन अन् अपूर्व टोळी बनवूं या; याच क्षणीं पश्चात्तापाच्या महान् मंदिरांत बसून प्रभुप्रेमाची आराधना सुरू करूं या. याहून अधिक मंगल अवसर पुनः कुठून मिळणार ?

— २०६ —

नाथ ! आमच्या या गर्विष्ठ मनाला जर तूं आपल्या मंदस्मिताच्या रज्जूनें बांधशील तरच कुठें त्याच्यावर तुझ्या मानिनी प्रसन्नतेचे मोहनमंत्र अंकित होऊं शकतील. आमच्या विषयविहारिणी वाणीला जर तूं आपल्या अद्वैत रसांत भिजविशील तरच ती प्रेम-पीडेनें मस्त होऊन तुझ्या मधुर नांवाचा अखंड जप करील. आणि आमच्या कठोरतम क्रूर कर्मांना करु-णेच्या भडक रंगांत बुडविशील तेव्हांच तीं तुझ्या परमप्रीतीला आलिंगन देऊं शकतील. प्रियतमा ! केव्हां दाखविणार तूं आपल्या प्रेमप्रकाशाचा तो

प्रेमळ मार्ग, ज्या मार्गानें चाललें असतां आम्ही तुझ्या चरणांचें आपल्या अंतरात्म्याच्या ओठांनीं चुंबन घेऊं शकूं ?

— २०७ —

प्रभूनें आज माझी हांक ऐकली. अन् ती पण अंतःकरणापासून ! आज तर माझ्या सुखाला सीमा नाहीं. आनंदाला अंत नाहीं. मी स्वप्नांत तर नाहीं ना ? हे पहा, माझ्या कलुषित हृदयावर त्या प्रभूची ही महा-महा-करुणधारा वाहात आहे. त्या दयाळू प्रियतमाच्या महा–महादयेमध्येंच मी आज आपल्या विस्तृत जीवनाची सार्थकता पहात आहे. मालकाची मर्जी माझा मिथ्याभिमान नष्ट करून आतां तो माझा अंगीकार करील; तो मला आतां अभयदान देईल ! धन्योऽस्मि !

# भावना

# प्रीति



ती एक हिरवीगार लता आहे ! अश्रूंचें सिंचन करकरून मी तिला वाढविलें आहे. आज ती तुझ्यावर मोहित होऊन प्रफुल्लित नि पुलकित होत आहे. तूं एक सुंदर तरुण हमाल आहेस ना ? जर तसें असेल तर आपल्या त्या प्राणप्रियेला प्रगाढालिंगन कां बरें देत नाहींस ?

ती एक आकांक्षी चातकी आहे. समस्त समुद्रांना क्षुद्र मानून ती वेडी तुझी प्रतीक्षा करीत व्याकुलतेनें उभी आहे. तूं श्यामघन आहेस ना ? जर तसें असेल तर आपल्या रूपाचा एक स्वातिबिंदु तिला कां बरें पाजवीत नाहींस ?

ती एक तळमळणारी मासळी आहे. क्षीर आणि मधु यांच्या कुंडांतहि जेव्हां ती कांहीं केल्या रमूं शकली नाहीं तेव्हां मी तिला आज तुझ्या पायाशीं घेऊन आलों आहें. तूं एक स्वच्छ सरोवर आहेस ना ? जर तसें असेल, तर तिला आपल्या थरथरणाऱ्या लाटांशीं कां बरें क्रीडा करूं देत नाहींस ?

ती एक सरला चकोरी आहे. तिचे नेत्र तुझ्याशिवाय अन्य कोणाकडेही वळत नाहींत. तूं पूर्णचन्द्र आहेस नां ? तर मग त्या विरहिणी रमणीच्या तृषित नेत्रांमध्यें आपल्या रूपरसाचें दोन थेंब का बरें टाकीत नाहींस ?

ती एक सरला सरिता आहे. पर्वतांचीं हृदयें विदीर्ण करून ती येथपर्यंत धांवत पळत, धांपा टाकीत आली आहे. तूं महासागर आहेस ना? तर मग त्या आपल्या प्रेमातुरा कान्तेला आपल्या बाहुपाशांत बद्ध कां बरें करीत नाहींस?

ती एक चंचल चपला आहे. अनन्त आकाशांत विहरत असतां ती तुझ्या समीप येऊन सात्विक भावनेनें कम्पित होत आहे. तूं कृष्ण-वारिद आहेस ना? तर मग त्या प्रणयिनीला आपल्याबरोबर विमुक्त विहार कां बरें करूं देत नाहींस?

ती एक विरही जीवाची प्रीति आहे. निरन्तर प्रियदर्शनोत्कंठेनें तिला जाह्नवीपेक्षांहि अधिक पावन बनविलें आहे. आज ती तुझ्यासमोर मीलन-पुष्पांजली घेऊन उभी आहे. तूं तिचा प्रियतम आहेस ना? जर तसें असेल तर तिच्या साधनेचा तूं कां बरें स्वीकार करीत नाहींस?

## आदेश २

तुझा आदेश प्राप्त केल्याशिवाय मी करूं तरी काय शकणार? सर्व समर्थ! मला जर कर्माच्या रणक्षेत्रांत उतरवावयाचेंच असेल तर आधीं आपला आदेश दे. तुझें आदेश– कवच धारण करूनच मी मायेचा दुर्भेद्य व्यूह छिन्नभिन्न करूं शकेन.

जिच्या आवेशानें ज्योतिर्हीन नेत्रांत प्रलयंकर रौद्र, तेज, क्षीण आणि अवनत बाहूंमध्यें हिमाद्रिमर्दनबल व पराक्रम, निस्साहस हृदयांत क्रांतिकारी उत्साह व उत्तेजन, आणि निर्बल वाणींमध्यें लोक-प्रकम्पन ओजाचा अकस्मात् उदय होतो त्याच दिव्य शक्तीला तुझा आदेश असें म्हणतात ना?

गीतागायक! भीषण कुरुक्षेत्रावर तुझा आदेश प्राप्त केल्याशिवाय भीष्म, द्रोण आणि कर्ण यांच्याशीं युद्ध करण्यास असमर्थ असलेला अर्जुन युद्धास कसा बरें उद्युत होऊं शकला असता? आदेश तर दिला नाहीं आणि त्या बिचाऱ्याला मात्र बनवायला लागलें. धन्य! प्रपन्न पार्थाचा प्रयास म्हणजे नुसता निमित्तमात्र होता. वस्तुतः तुझ्या आदेशानेंच त्याच्या गांडीवावर प्रचड तांडव केलें होतें.

तुझा आदेश प्राप्त करूनच जटिल जामदग्न्यानें आपला परशु गुरुद्रोही सहस्रबाहूंच्या रक्तानें रंजित केला होता. त्या कुशपाणि ब्राह्मण कुमाराच्या भुजांमध्यें तुझ्या आदेशाचा आवेश झाला नसता तर तो आपलें यज्ञकुंड आततायी क्षत्रियांच्या रुधिरानें कसें बरें पूरित करूं शकला असता ?

कोणतेंहि बृहत् कार्य अथवा लोकविप्लव तुझ्या आदेशाशिवाय पूर्णत्वाला प्राप्त होऊं शकत नाहीं. तोच शक्तीचा व भक्तीचा संचालक आहे; आणि भुक्तीचा व मुक्तीचाहि प्रेरक आहे. जगदाधार ? हें निश्चित आहे कीं, वासनाक्षय आणि साधनासिद्धि यांचा अनुभव तुझ्या एकमात्र आदेशावर अवलंबून आहे.

माझी अशी समजूत आहे कीं, तुझा आदेश प्राप्त केल्याशिवाय मी कांहींहि करूं शकणार नाहीं. मला कर्मांच्या रणक्षेत्रांत उतरावयाचेंच असेल तर, सर्व समर्थ ! प्रथम आपला आदेश दे. तुझें आदेश-कवच धारण करूनच मी मायेचा दुर्भेद्य व्यूह छिन्नविच्छिन्न करूं शकेन.

फुलांची परडी घेऊन ती माळीण नेहमीं मध्यरात्रीं त्या उद्यानांत जात असते. फुलें गोळा करण्याची ही कां वेळ म्हणावयाची? माला गुंफण्याचा हा कां समय म्हणावयाचा?

माळीण कधीं कोणाशीं कांहीं बोलत नाहीं. आपल्याच नादांत सदा गुंग असते. कधीं मूक वेदनेप्रमाणें चुपचाप निघून जाते तर कधीं थरथरणाऱ्या लहरीप्रमाणें आलाप घेत घेत अदृश्य होते. तिला कांहीं विचारण्याचें धाडस कोणाच्यानेंहि होत नाहीं. त्यावेळीं जो कोणी त्या प्रेमप्रतिमेला पाहतो तो आपलें मस्तक भक्तीनें तिच्या चरणांवर ठेवतो. त्या अनुरक्ति देवीच्या मार्गावर श्रद्धाभक्तीचीं पुष्पं कोण बरें उधळणार नाहीं?

ती ज्या उद्यानांत जाते तेथें फुलें किंवा पानें असलेलें एकहि झाड नाहीं; तेथें एखादी पुष्पवाटिकाहि नाहीं, एखादी फुललेली लताहि नाहीं. होय, चिंच, वड, पिंपळ व ताड यांचे मोठमोठे वृक्ष मात्र तेथें आहेत. त्या अरण्यांत दिवसा देखील शिरण्याचें धैर्य कोणाला होत नाहीं. फारच निबिड स्थान आहे तें. तरीहि सदा मध्यरात्रीं त्या ठिकाणीं ती माळीण काय करायला जाते, कोण जाणें!

ज्या रात्रीं ती आपली फुलांची परडी घेऊन गुपचूप निघून जात असलेली दृष्टीस पडते त्यावेळीं आम्ही तिला अदृष्टाची अस्पष्ट छाया, उल्हासाची अधीर स्फूर्ति अथवा प्रेमाची रहस्यमयी प्रेरणा या नांवांनीं हृदयांकित करतों आणि जेव्हां ती एखादा राग आलापत या गल्लींतून जाते तेव्हां आम्ही तिला विरहाविव्हला श्यामा अथवा प्रियोत्कंठिता चातका यांच्या रूपांत पाहतों. अधूनमधून ती आम्हांला करुणतरंगिणीच्या व उत्साहधारेच्या रूपांतहि वहात असलेली दिसली आहे.

तिला सर्वांनीं पाहिलें आहे, ऐकलें आहे; पण ओळखलें मात्र कोणीहि नाहीं. असें वाटतें कीं दैवानें तिला दर्शनीयच बनविलें आहे, ज्ञेय नाहीं. तें पुष्प-पत्र-हीन निभृत उद्यान अथवा ती फुलांची परडीच त्या माळणीचें अन्तर्मर्म जाणते. आमच्या दृष्टीनें तर ती आजहि एक विचित्र कोडेंच आहे.

ती शून्यवादाची एक कल्पना आहे. तिनें निराकारेंतून साकारता धारण केली आहे. शून्याला अलिप्त आलिंगन देत ती अनन्ताच्या समोर विलज्ज भावनेनें उभी आहे.

ती नीरवतेची एक प्रतिमा आहे. अर्थानुगामी शब्द त्या मूक प्रतिमेमध्यें प्रतिष्ठित झाला आहे. मौनाला अकाम आलिंगन देत ती शब्दब्रह्माकडे निर्निमेष दृष्टीनें पहात आहे.

ती शान्तीची एक भावना आहे, परिश्रान्त कर्मानें जणूं गंभीरतेच्या निलयामध्यें येऊन आश्रय घेतला आहे. तुरीयेला अनादि आलिंगन देत ती भीषण भावना भगवान् महाकालाच्या अज्ञेय संकेतावर अखिल ब्रह्मांडांत विहार करण्यास आली आहे.

साधकांनो ! तस्यां जागर्ति संयमीचें प्रत्यक्षीकरण तुम्हांला त्याच नीरव निशीथामध्यें होईल.

## करुणा



ती एक पुनीत आणि सरस सरिता आहे. परिश्रान्त पथिकांनो ! तिच्यांत अवगाहन करून मगच तुम्ही पुढें जा.

ती कांहीं एखादी सामान्य नदी नाहीं. अनन्ताच्या वज्रोपम वक्षस्थलांतून निघून ती आजहि भावनेच्या अगम्य अंचलावर मत्तमातंगगतीनें वहात आहे. त्रितापत्रिकूट विचूर्ण करीत, निर्दय प्रस्तरखंडांशीं टक्करा घेत आणि निराशेच्या वाळवंटाला भिजवीत शेवटीं ती भावनाप्रधान जीवांच्या हृदयसागराला प्रेमालिंगन देते.

नाविकांनो ! सोडून द्या आपापल्या नावा त्या विशाल करुणातरंगिणीच्या प्रशान्त अंकावर. खूप मजेंत गाणें गात गात जा ! वल्हवावेंहि लागणार नाहीं. फक्त शिडें उभारा म्हणजे झालें. वारें तर नेहमींच अनुकूल वहात असतें. तुमच्या मोडक्यातोडक्या नावांवर ओझें मात्र अपरिमित आहे, यांत मुळींच शंका नाहीं. पण भिण्याचें कारण नाहीं. त्या नदीच्या मार्गानेंच तुम्ही त्या स्थानीं जाऊन पोहोंचूं शकाल, जेथून परतून येथें पुनरागमन होत नसतें. म्हणूनच नावाड्यांनो ! मी सांगत आहें कीं तुम्ही लवकरच आपल्या नावा त्या विशाल करुणातरंगिणीच्या प्रशान्त अंकावर खुशाल सोडून द्या !

# मधुसंचय



आज मी आतांपासूनच आपलें हृदयपात्र घेऊन मधुसंचय करण्यासाठीं निघालों आहे. पाहूं, पात्राच्या नशिबानें किती मधु मिळतो तें.

सर्व प्रथम उषेच्या सौरभित समीराच्या मंद मंद लहरींशीं केलि करणाऱ्या कुसुमकलिकांचा मधु या पात्रांत संचित करीन.

नंतर मकरन्दमत्त मधुपमंडलाला भेटून हंसऱ्या गुलाबाच्या नजरेकडून थोडासा मधु मागून घेऊन या पात्रांत भरून ठेवीन.

एखाद्या सद्यःजागृत शिशूच्या अर्धोन्मीलित नेत्रांतून त्याच्या कलित कपोलांवर भुरभुरणाऱ्या कुरळ्या कुन्तलांकडून आणि अधरपल्लवांवर नाचणाऱ्या मन्द हास्यामधूनहि मी आपल्या या पात्रांत थोडासा मधु ओतून घेईन.

एखाद्या विप्रलब्धा तन्वीच्या विरल वीणेवर विषादाचें हास्य हंसणाऱ्या स्वरलहरींमध्यें व्याप्त असलेला मधुहि मी सोडणार नाहीं.

तसेंच दोन वियुक्त प्रेमजीवांच्या आकस्मिक मीलनाच्या मंजुळ मंजिरीमधूनहि मी आपल्या पात्रांत थोडासा मधु टाकीन.

कर्मांच्या निरन्तर प्रवाहांत अबाध गतीनें वाहणाऱ्या एखाद्या अनासक्त कर्मयोगाच्या जीवनतरीमध्यें संचित केलेला असा जरी थोडासा मधु मिळाला तरी तेथेंहि मी आपलें हृत्पात्र घेऊन हजर होईन.

शेवटीं एखाद्या स्थितप्रज्ञ महापुरुषाच्या ध्यानसरोवरांत विकसलेल्या परानन्द पद्मांतून यथेष्ट मधु घेऊन मी आपली ही मधुकरी-यात्रा पूर्ण करीन.

## अश्रु निर्झर

७

होय, याच झऱ्यांमध्यें मी आपला पापपंक धुवून टाकला आहे आणि यांच्यांतील सुधासीकरांनीं मी कित्येकदां आपल्या हृदयाची तहानहि भागविली आहे. म्हणूनच मी यांना तीर्थ-निर्झर मानतों.

कोण जाणे, माझें हें अन्तराकाश, कधींकाळीं सुनील आणि स्वच्छ होतें कीं नाहीं तें ! मी तर याला सदा मेघाच्छन्न स्थितींतच पाहिलें आहे. काळे काळे मेघसमुदाय या ठिकाणीं केव्हांपासून जमा होऊन घनीभूत होत आले आहेत, याचें कांहीं स्मरणच नाहीं. अस्पष्ट धुमिल स्मृति, कुठल्याहि प्रकारचा क्रम न ठेवतां, या नभोमंडळाशीं, कोण जाणें, केव्हांपासून लपंडाव खेळत आल्या आहेत.

त्याच अज्ञात काळापासून झिमझिम बरसातीचा आरंभ झाला. तेव्हांपासून बारीक जलकणांचा वर्षाव होऊं लागला आणि तो आजहि माझ्या क्षतविक्षत अन्तरिक्षांत करुण कल्लोळ करीत मंद मंद हंसत आहेत.

तेथूनच कोठून तरी हे दोन्ही झरे निघाले आहेत. त्यांचें शिंपल्याच्या आकाराचें उद्‌गमस्थान पाहून लोक यांना मोत्यांच्या लडीच समजतात !

आणि कांहीं कल्पनाप्रिय रसिक यांना नलिनीदलगत दंवबिन्दु मानतात! पहा तर खरें, माझ्या या निभृत निर्झरांचा कसा उपहास केला जात आहे तें!

पण मला या सर्व गोष्टींचें काय होय? माझ्या दृष्टीनें तर हे उष्ण निर्झर माझ्या पंकिल कामनाकालिकांना धुवून टाकण्याचें एकमात्र साधन आहेत. आणि म्हणूनच मला आपल्या व्यथित अश्रूंच्या निरंतर निर्झरांना तीर्थ-निर्झर म्हणण्यांत अपार आनंदाचा अनुभव होतो.

## हृदयाच्या आंत

१८

बाहेर उभा राहून असा कां बरें कुडकुडतो आहेस ? थंडीमध्यें उगीच कशाला गारठतो आहेस ? आज हिमानें चढाई केली आहे काय ? किती दाट धुकें पसरलें आहे ! उत्तरेकडील वारे तीराप्रमाणें बोचत आहेत. असें वाटतें कीं थोड्याच वेळांत या पहाडी नाल्याचें पाणी गोठून त्याचें बर्फ होऊन जाईल. तरीच याच्या या खड्याळ लाटा भयानें कांठाकडे धांवत आहेत. किती निःस्तब्धता पसरली आहे ! प्रकाशाची तर नांवनिशाणीहि नाहीं. रात्रभर या थंडींत बाहेर उभ्याउभ्या काय करणार, लाडक्या पथिका. ये, माझ्या हृदयाच्या आंत ये. येथें खूप उष्णता आहे. बर्फहि वितळून जाऊन त्याचें गरम पाणी होतें. अहोरात्र निःश्वासांचे गरम वारे वहात असतात. तुझ्या स्मृतीनें येथें एक धगधगीत ज्वाला पेटवून ठेवली आहे. तूं मागल्या खेपेस आपला जो प्रेममणि ठेवून गेला होतास त्याचाच प्रकाश येथें अष्टौप्रहर असतो. थंडीच्या या भयंकर काळरात्रींच्या वेळीं, लाडक्या, तुला येथें अवश्य सुख मिळेल. तेव्हां बाहेर उभ्या उभ्या थंडींत कांकडूं नकोस. ये, हृदयाच्या आंत ये !

बाहेर उभ्या उभ्या होरपळत राहण्यापासून काय फायदा ? खरोखर

आज दग्ध दिशा अग्नि ओकीत आहेत. धरती तापून तव्याप्रमाणें लाल झाली आहे. त्या क्षीणकाय नदीचें पाणी कसें उकळत आहे ! आंतील मासळ्या उकडल्या जात आहेत. हे उन्हाळी वारे,—वारे कसले म्हणायचे हे—एखाद्या दुष्ट सर्पिणीच्या विषयुक्त फूत्कार-ज्वाळाच आहेत या येथें, दूरपर्यंत छायासुद्धां नाहीं. अशा या दुपारीं तुला कोठें जाण्याची अवदसा आठवली आहे? ये, माझ्या हृदयाच्या आंत ये. येथें दोन घटका विश्राम घेऊन नंतर मग जिथें जावयाचें असेल तिकडे जा. प्रिय पथिका ! तुझ्या-साठीं मी येथें एक शान्ति-निकुंज निर्माण करून ठेवला आहे. खूप गर्द छाया आहे. शीतल आणि सुरभित समीराशीं निकुंजांतील प्रीतिलता तेथें सदैव दहःकेलि करीत असतात. आनंदानें कमलासनावर बैस. अश्रूंनीं या परिश्रान्त चरणांना न्हावूं घालून तुझ्या संतप्त शरीरावर स्नेहाची उटी लावीन. त्या निकुंजांत, हे माझ्या लाडक्या ! तुला सर्व प्रकारचा शीतोपचार मिळेल. तेव्हां उन्हांत उभा राहून आपलें कोमल अंग होरपळून घेऊं नकोस, ये, हृदयाच्या आंत ये.

बाहेर उभ्या उभ्या असा कुठवर भिजत राहणार? कसा मुसळधार पाऊस कोसळत आहे. नदीनाले एक होऊन गेले आहेत. सारें आकाश काळ्याकुट्ट ढगांनीं व्यापून गेलें आहे. मेघांच्या निरंतर गर्जनेनें दशदिशा थरथर कांपत आहेत. हें तडित्-तांडव तर अधिकच भयाचा संचार करीत आहे. श्रावण-भाद्रपदाच्या रात्रींपेक्षांहि आजची रात्र अधिक भयंकर आहे. अशावेळीं तूं कुठें चालला होतास? बरं झालं, पुढें गेला नाहींस तें ! पण येथें उभ्या उभ्या आतां कशाला भिजतो आहेस ! ये. माझ्या हृदयाच्या आंत ये. येथें मी तुझ्यासाठीं एक सुरम्य प्रेम-कुटीर बनविलें आहे. त्या स्नेहनिवासांत तुला खूप सुख मिळेल याबद्दल खात्री बाळग. तें स्थान आतांपर्यंत तुझ्यासाठींच सुरक्षित राहिलेलें आहे. तसें पाहिलें तर तुला केव्हांना केव्हां तेथें वास हा केलाच पाहिजे. आज अगदीं अनायासेंच आलास. तेव्हां आतां बाहेर नको उभा राहूं. हे लाडक्या पथिका, ये हृद-याच्या आंत ये !

तुझेंच काव्य कल्पना आणि सत्य यांमध्यें सामरस्य प्रस्थापित करूं शकलें आहे. अनादिकवे, तुझ्या काव्यावर विश्वभारतीनें अनेक भाष्यें रचिलीं, परंतु त्याचें रहस्य अद्यापि अज्ञातच राहिलें आहे.

कालाच्या पानांवर मूलाप्रकृतीच्या लेखणीनें तूं काव्यलेखन करण्यास प्रारंभ केलास. तुझ्या रचनेनें गद्य आणि पद्य दोघांनाहि निरवद्यपणें आलिंगन दिलें आहे. तिच्यामध्यें शब्दालंकार हे अनिर्वचनीयतेबरोबर आणि अर्थालंकार हे भावनेबरोबर विमुक्त विहार करीत आहेत. खरोखर अशा प्रकारचें पदलालित्य आणि रसबाहुल्य अन्यत्र पाहण्यांत आलेलें नाहीं.

तुझ्या अश्रुतपूर्व काव्यामध्यें ललित कलांचा केलि-कल्लोल पाहूनच विज्ञान सत्यामध्यें तन्मय झालें आहे. त्याच्या माधुर्याचा आस्वाद घेऊनच कर्मानें मुक्तीचा प्रथम परिचय प्राप्त करून घेतला आहे. रसनिधे! तुझ्या काव्यरसांत अवगाहन करूनच आत्म्यानें जीवनाला शिवत्व प्रदान केलें आहे.

तुझी काव्यप्रातिभा वस्तुतः अपूर्व आणि अतर्क्य आहे. कामनेला साधनेचें आणि उपासनेला वासनेचें रूप द्यावें तर तिनेंच! तिच्यांतूनच सुधेचे

झरे पाझरत असल्याचें मीं पाहिलें आहे आणि तिच्यांतूनच गरल-बिन्दुहि ठिबकत असल्याचें मी ऐकलें आहे. अमावास्येला पौर्णिमेंत आणि पौर्णिमेला अमावास्येंत परिणत करणें हा तर तुझ्या प्रतिभेच्या हातचा मळ आहे.

कविकवे, तुझ्या काव्याचें अध्ययन अनन्तकाळापासून समस्त सृष्टि करीत आली आहे. कुणाचें अध्ययन प्रत्यक्षपणें झालें आहे तर कुणाचें अप्रत्यक्षपणें मींहि कधींमधीं त्याच्या दोनचार ओळी वाचल्या आहेत. अरसिक असल्यामुळें मला त्याच्या पाठामध्यें ध्वनि आणि अलंकार यांचा आस्वाद घेतां आला नाहीं, कीं ओज व प्रसाद यांचेंहि दर्शन झालें नाहीं. मला त्या दोनचार ओळींमध्यें फक्त तुझ्या एका प्रेमाचेंच अस्पष्ट दर्शन झालें आहे. त्याच पंक्तिकलिकांच्या मालेला मी आपला हृदयहार बनविला आहे. तुझ्या विश्वकाव्यांत मी फक्त प्रेमालाच कला असें म्हटलें आहे. माझ्या दृष्टीनें तुझें प्रेम हाच काव्यकलेचा एक सर्वोत्कृष्ट आदर्श होय.

नाविका, चल, माझी नाव पैलतीराला घेऊन चल. अवेळ झाली म्हणून काय झालें? अजून मध्यरात्रही उलटली नसेल. होय, प्रवाहाचा वेग निःसंदेह भयावह आहे. नाव मध्येंच उलटून बुडून जाईल म्हणून कां तूं घाबरतो आहेस? ऊठ, वल्हें घे, नाव उलटणार नाहीं. नाविका, भिऊं नको!

अरे असा काय बसल्या बसल्या पेंगतो आहेस? तुझ्यासाठीं बघ, मी केव्हांपासून कुडकुडतों आहे! ऐकतच नाहींस कीं! काय म्हणतोस? याच तीरावर रात्रभर राहूं? नाहींरे बाबा, येथें तर मी मुळींच नाहीं राहूं शकायचा! येथील हें विलासभवन आतां माझ्याच्यानें बघवत नाहीं. हें तर जणूं खायलाच उठलंय! ही विहारवाटिकाहि जळून खाक झालीय. तेव्हां आतां माझ्याच्यानें येथें क्षणभरहि उभें राहवत नाहीं. पूर्वस्मृतीची काळी छाया मागें लागली आहे. अरे देवा! किती भयंकर वेदना या! काय छळ मांडला आहेस. तुझ्या पाया पडतों. निर्दया, सोड ही नाव!

काय म्हणालास? तो तीर अज्ञात आहे? असूं दे अज्ञात. कुछ फिकिर नहीं! हा ज्ञात तीर तरी मला काय सुख देतो आहे? आतां मात्र तूं माझी ही नाव त्या अज्ञात अपरिचित तीराकडे घेऊन चलच.

तेथें पोहोंचण्याची कशी तीव्र उत्कंठा लागून राहिली आहे. धरून चालतो कीं त्या तीरावरील आनन्द अखंड व नित्य आहे; पण त्यावर माझा काय अधिकार? पैलतीरावरील बांसरीवाल्याची मधुर बांसरी कधीं ऐकायला मिळेल काय? तेथील मधुपेय या तृषित नेत्रांना मी कधीं पाजवूं शकेन काय?

आतां माझ्या सगळ्या साधनांची परिणति तुझ्याच हातांत आहे. जोंपर्यंत तूं हें वल्हें हातीं धरणार नाहींस तोंपर्यंत त्या पैलतीरासाठीं मी असाच तळमळत राहीन. चल, निदान एकदां तरी मेहेरबानी करून त्या मुरलीचा स्वर या व्याकुळ कानांमध्यें भरून टाक. तें पेय एकदां तरी या तहानलेल्या नेत्रांना पाजव. लाडक्या नाविका, आतां माझी नौका तूं त्या अज्ञात तीराकडेच वल्हवीत घेऊन चल. बाबा रे, तुझ्या पाया पडतों! कृपा करून माझी ही जीर्णशीर्ण नौका लवकर सोड!

## पतंग ११

तुझ्यासाठीं मीं एक प्रीतीचा पतंग बनविला आहे. बोल उडवशील ? बरं, घे ! ध्यानाचा दोरा लावून उडव हं. वाटेल तितका उंच चढवूं शकतोस. दोरा कमी नाहीं.

वाटेल तसा झटका दे, पतंग फाटायचा नाहीं. याला मी धारणेचा कागद आणि श्रद्धेच्या कांबी लावल्या आहेत. भावनेच्या गोंदीनें जोड चिकटविले आहेत. इतउप्परहि तुझ्या इवल्याशा हातांच्या झटक्यानें माझा प्रीतिपतंग फाटून जाईल कांय ?

दोराहि तुटणार नाहीं. तुझ्या प्रतीक्षेचे अगणित क्षण वळून मी तो तयार केला आहे. आणि अश्रूंमध्यें कालवून विरहाचा मांजाहि त्यावर चढविला आहे. इतकें करूनहि तुझ्या इवल्याशा हातांच्या झटक्यानें माझा हा ध्यानदोरा तुटून जाईल काय ?

लाडक्या वत्सा, खरोखरीच मीं हा पतंग तुझ्यासाठीं बनविला आहे. घे, उडव हा आतां !

अं. बो. ७

## अनुनय

१२

जरा थांब, इकडेहि बघून जा. केव्हांपासून रिकामा घडा घेऊन बसलों आहे ! सारा पुष्पकुंज करपून गेला आहे. सगळे ताटवे सुकून गेले आहेत. लता कोमेजून गेल्या आहेत. पानांफुलांचे तर कुठें नांवनिशाणहि शिल्लक उरलेलें नाहीं. आता त्या बिचाऱ्या माळ्यानें करावें तरी काय ? तूंच सांग बरें ! तुझ्या सुरक्षित सरोवरांतून फक्त हाच एक घडा मला भरून घ्यावयाचा आहे. अडवतोस कां ? सगळेजणच त्यांतील पाण्यानें आपापले पुष्पकुंज शिंपीत आहेत. मग एकट्या मलाच कां बरें हटकलें जात आहे ? काय म्हटलेंस ? आपल्या अश्रूंनींच कुंज कां शिंपीत नाहींस ? तेंहि करून बसलों आहे, सरकार ! अश्रुजलांनीं तर ते जास्तच वाळून गेले आहेत. उकळणाऱ्या पाण्यानें लता कधीं हिरव्या गार राहूं शकतील काय ? ही बाग आतां तुझ्याच सरोवराच्या पाण्यानें प्रफुल्लित होऊं शकेल. तेव्हां आतां हा रिकामा घट भरून घेऊं दे. मला अडवूं नकोस.

लाडक्या ! फुलें कोठून आणूं ? कां बरें लाजवितोस ? हाय, काय करूं ? आज माझें उद्यान फुललेलें असतें तर मी तुला भेट म्हणून एक मालतीहारहि दिला नसता काय ? तुझ्या चरणांवर पुष्पांजलीहि वाहिली नसती काय ?

तुझ्या मार्गावर नयनपात्यांच्या पायघड्याहि घातल्या नसत्या काय ? पण आतां काय करूं ? माझा अगदीं नाइलाज आहे. तूं जसा आलास तसाच निघून चाललास. तुझा कांहींच स्वागत-सत्कार मी करूं शकलों नाहीं. मनांतील मनोरे मनांतच राहिले. माझ्या उद्यानांत, हे जिवलगा ! तुझ्यासाठीं आज एकहिं फूल मिळालें नाहीं.

तुला आठवत नाहीं ? या बागेचा माळी एकेकाळीं तूंच होतास. तूंच या वाटिका शिंपल्या होत्यास, आणि तूंच या वेलींना प्रफुल्लित केलें होतेस. तें प्रेम आज कुठें गेलें ? तेंच हें रंगेलें व रसीलें उद्यान आहे. याला तूं कधींकाळीं आपल्या मधुर हास्यानें मुकुलित आणि सुरभित केलें होतेस. या त्याच गोंडस वेली आहेत. यांना तूं कधींकाळीं आपल्या प्रेमदृष्टीनें हरित आणि पुष्कलित केलें होतेंस. या त्याच सुन्दर वाटिका आहेत. ज्यांना तूं एकदां आपल्या स्नेह-सुधा-धारेनें सिंचित आणि रस-प्लावित केलें होतेंस. आठवतें ना तें तुला ? मग आज तर तूं इकडे पहातहि नाहींस. आपल्या सरोवरांतून एक घडाभर पाणीहि घेऊं देत नाहींस. प्रियतमा, तुला झालंय तरी काय ?

पळून कां जातो आहेस ! जरा थांब ना ! एक गोष्ट आणखी विचारावयाची आहे. हें उद्यान उजाड करून टाकण्याचा तुझा विचार आहे काय ? जाळूनपोळून याची राखरांगोळी करून टाकणार आहेस काय ? कशासाठीं ? इतका राग काय म्हणून ? तुला करतां यावयाचें नाहीं तें. मी प्राणपणानें याची राखण करीन ! बघतों, तूं आपल्या सरोवरांतून मला पाणी कसें भरूं देत नाहींस तें ! मी त्याच पाण्यानें हें उद्यान शिंपणार. शिंपल्याशिवाय मुळींच राहणार नाहीं. पुढच्या खेपेस मात्र मी आपल्या नेत्रपलकांच्या पायघड्या घातल्याशिवाय तुला येथें येऊंहि देणार नाहीं. आणि तुझ्या कंठांत मालतीहार घातल्याशिवाय तुला येथून जाऊंहि देणार नाहीं.

## अगुप्त गोपन

## १३

छान ! कळी कां कुठें लपविण्यानें लपविली जाते ? या चतुर पर्णांनीं तिला आपल्या हृदयाशीं कवटाळून लपविण्याचा खूप प्रयत्न केला. तिचें ललित, लाजरें मुख आपल्या पदराखालीं झांकून घेतलें. आपल्या सखीचें गौप्य त्यांनीं चुकूनहि कोणाला सांगितलें नाहीं. परन्तु प्रेमातुरा कलिका लपविण्यानें लपूं शकली नाहीं. गुप्तरीतीनें परिमलवाहिनी दूती धाडून तिनें आपला रमण जो मधुकर त्याला शेवटीं जवळ बोलावून घेतलेंच.

मदिराहि कां कोठें लपविल्यानें लपत असते ? चतुर मद्यप्यानें तिला आपल्या हृदयसदनांत सुरक्षित स्थान ठेवून लपाविण्याची खूप कोशिस केली. तिच्या अरुणाधरांचें तीक्ष्ण चुंबनहि त्यानें सर्वांचा डोळा चुकवून निःशब्दपणें घेतलें. चुकूनहि त्यानें आपल्या प्रणयिनीचें चन्द्रानन कोणाला दाखविलें नाहीं. परन्तु कुलटा मदिरेचें अस्तित्व लपविण्यानें लपूं शकलें नाहीं. मद्यप्याच्या खुमारीदार, झिंगणाऱ्या डोळ्यांनीं शेवटीं त्या प्रमदेचें गुप्त रहस्य फोडलेंच.

कस्तुरी ही कधीं लपविल्यानें लपत असते कां ? कलाकुशला प्रकृतीनें मोठ्या शिताफीनें तिला मृगनाभीमध्यें सम्पुटित करून दडवूं पाहिलें. तिची

माहिती बिचाऱ्या मृगालाहि नव्हती. प्रकृतीनें चुकूनहि कधीं आपल्या या गोपनरहस्याचें उद्घाटन केलें नाहीं. परन्तु स्वातंत्र्य–प्रिय कस्तूरिका लपून राहूं शकली नाहीं. गुप्त रीतीनें सुगन्धाच्या द्वारें सन्देश धाडून पितृघातिनीनें शेवटीं विलासी शिकाऱ्यांना जवळ बोलावलेंच.

करुणाहि कधीं लपविल्यानें लपली आहे का ? निष्ठुर कृतघ्नतेनें तिला आपल्या कारावासांत डांबून टाकलें. अश्रु-जल न देतां पिशाचिनीनें तिला तळमळत ठेवलें. चुकूनहि कृतघ्नतेनें आपल्या या नीचतेची कधीं कोणाला जाणीव होऊं दिली नाहीं. परन्तु पुण्यप्राणा करुणा लपविल्यानें लपूं शकली नाहीं. वेळ येतांच त्या निष्कृप कारागारांतून नेत्रांच्या गवाक्षांच्या द्वारें ती बाहेर पडलीच.

याचप्रमाणें, लाडक्या ! तुझी प्रीतिहि कधीं लपविल्यानें लपली आहे काय ? प्रगल्भा लोकलज्जेनें तिला मनोमंदिरांत रमवून लपवून ठेवलें. कुलीनतेनें अत्यंत खबरदारी घेऊन तिला कधींहि हृदयद्वारापर्यंत येऊं दिलें नाहीं. परन्तु निरंकुश प्रीति लपविल्यानें लपूं शकली नाहीं. आज तिनें लोकलज्जेच्या विरोधाला न जुमानतां मनोमन्दिराच्या बाहेर पडून तुझ्या प्रेमपूरित नेत्रांना धृष्टतापूर्ण आलिंगन दिलेंच.

## आहे एखादें गिऱ्हाईक ? १४

काय रे बुवा, प्रेमाच्या बाजारांत माझ्या लाडक्याची थोडीशी मादकता विकत घेण्यास माझ्याबरोबर कुणाला यावयाचें आहे काय ? जो तयार असेल त्यानें चलावें. खूप छान सौदा आहे. असा मोका पुन्हां कधींहि येणार नाहीं.

वाटल्यास घ्या, वाटल्यास घेऊं नका—पण तेथपर्यंत जरा चला तरी—कांहीं फार दूर नाहीं तें स्थान. कोण जाणे, कुठले कुठले प्रेमी ग्राहक त्या बाजारांत गोळा होतील. तुम्ही सगळेजण तर इथेंच उभ्या उभ्या विचार करीत आहांत. या विचारांतच सारा दिवस वाया घालवायचा आहे कां तुम्हांला ? रहा बापडे, माझें काय चालणार ? मी मात्र आतां तुमच्यासाठीं थांबूं शकणार नाहीं.

आहे असा एखादा खरेदीदार जो माझ्या मोहनाची थोडीशी मादकता विकत घ्यावयास तयार आहे ? ती त्याच्या दृष्टीची मादकता आहे. जो कोणी ती आपल्या डोळ्यांच्या प्याल्यामध्यें ओतून घेईल तो प्रेमाच्या लहरींसंगें बेहोष होऊन नाचूं लागेल. ती मादकहि खूप आहे. मरून

जाण्यासाठीं असें मधुर आणि जीवनदायी वीष पुन्हां कोठून मिळेल ? कितीहि महाग असो ती मादकता. ती विकत घेतल्याशिवाय सुटकाच नाहीं आतां.

काय, कोणी घेईल माझ्या प्रियतमाची थोडीशी मादकता ? ती त्याच्या हास्याची मादकता आहे. जो कोणी ती खरेदी करून आपल्या हट्टी, श्यामल डोळ्यांतील पुतळ्यांना पाजवील तो इष्काच्या हिन्दोळ्यावर मस्त होऊन झोके घेऊं लागेल. ती खूप बोचकहि आहे. घायाळ व्हायला असलें सुकोमल आणि सुखदायी अस्त्र फिरून कुठलें मिळायला ? वाटेल तितकी महाग असो, पण ती मादकता विकत घेतल्याशिवाय आतां रहावयाचें नाहीं.

घेईल कोणी विकत माझ्या मोहनची थोडीशी मादकता ? ती त्याच्या मीलनाची मादकता आहे. जो कोणी ती विकत घेऊन आपल्या हृदयघटांत भरून ठेवील तो प्रेमोन्मादाच्या सरोवरांत रंगेल. क्रीडा करूं लागेल. ती खूप व्यथादायिनीहि आहे, तळमळत या कुशीवरून त्या कुशीवर होत राहण्यासाठीं असा अद्भुत व गोड रोग पुन्हां कुठला मिळायला ? कितीहि महाग असो, ती मादकता विकत घेतल्याशिवाय आतां चालायचेंच नाहीं.

तुम्ही असले कसले लोक आहां ? कोण जाणे ! तो सौदा तुम्हांला फार महाग अथवा नुकसानीचा वाटतो आहे काय ? अरेरे ! विरहाच्या अश्रूंच्या कांहीं थोड्याशा माळाच किंमत म्हणून द्याव्या लागतील—हो ! काय या कवडी किंमतीच्या शिराचा मोह आहे ? याला तर येथेंच धडावेगळें करून पायतळीं तुडवून टाकावें लागेल. त्या बाजारांत शिरें नसलेलींच गिऱ्हाइकें जात असतात. बघा, चला, जलदी करा, नाहींतर बाजार उठून जाईल, अन् मग निराशेनें हात चोळीत बसावें लागेल.

नको, प्रभो ! मला सुरेन्द्राचें उन्मत्त मन देऊं नको. मी आजन्म असमर्थ असणारा त्याच्या अपूर्ण कामनेची पूर्तता कसा करूं शकेन ? मला त्या अतिथिसेवी बलीचें मन हवें. माझ्या दृष्टीनें देवांगनांच्या कुसुमकन्दुकांच्या कामोद्दीपक प्रताडनापेक्षां अकिंचन अतिथीचा पादप्रहारच अधिक आनन्ददायी आहे.

नाथ मला अवधेश दशरथाच्या राजप्रासादांतील कनकपात्र नको देऊं. मला आपली त्या गुहनिषदाच्या झोंपडींतील एक करवंटीच हवीय. कनकपात्रांतील दूध आणि दही यांच्यापेक्षां मला त्या करवंटींतील वनवासी देवांचें चरणोदकच अधिक स्वादयुक्त वाटेल.

नको, प्रभो ! मला धार्तराष्ट्राची मनोवृत्ति नको आहे. मी आपल्या विदूराची चित्तवृत्ति प्राप्त करण्याची अभिलाषा बाळगतों आहे. मी तुझें स्वागत राजाधिराजाच्या स्वरूपांत कसें करूं शकेन ? म्हणून मी तुला पार्थसख्याच्या रूपांतच पाहूं इच्छितों.

स्वामिन् ! मला राजदुलारी रुक्मिणीची राजसी प्रीति नको आहे. मला आपली एखाद्या वेड्या गोपकुमारीची भोळी भावना दे. मी तुला द्वारकाधीशाच्या रूपांत कसा ओळखूं शकेन. माझ्या मनोमन्दिरांत तर लाडक्या, तूं बांसरीवाल्याच्या रूपांतच विहार करूं शकतोस !

# प्रार्थना

— १ —

होय, तीच आग, हे माझ्या प्राणांच्या स्वामी, तीच आग ! माझ्या अव्यक्त अन्तस्तलांत आपल्या अमंद अनुरागाची एक धगधगीत शेगडी ठेवून दे ना ! जाळून टाक, नाथा, त्यांत माझ्या साऱ्या भिजलेल्या वासना ! भस्म करून टाक, प्रभो त्यांत माझी असीम अहन्ता ! तावून काढ त्यांत माझीं सर्व कर्मे-अकर्मे !

माझें हृदय आतां निखाऱ्याप्रमाणें पेटूं दे. आजपासून तेथें भक्तीच्या ज्वाळा उफाळूं देत. राख होऊन जाऊं दे, हे नाथा माझ्या मंदिरामधील मोहमतेची, त्या विचित्र अनुराग-अग्नीमध्यें !

आपल्या परमप्रेमाचा दीपक उजळ बरें, ज्योतिर्मय ? तोच दीपप्रकाश भरून टाक, हे लीलामय, माझ्या अंधाऱ्या मानसकुटींत; आणि त्या ज्योतीला घट्ट मिठी मारूं दे, एकदां, माझ्या या प्राणपतंगाला, प्राणेश !

आजच सायंकाळीं माझी ही अधीरतापूर्ण इच्छा पूर्ण कर माझ्या जीवितेश्वरा !

— २ —

माझ्या दृष्टीनें जिथें तूं आहेस तिथेंच काशी आहे, तिथेंच द्वारका आहे, तिथेंच मक्का आहे आणि तिथेंच जेरुसलेम आहे. मला अशाच तरण-तारण तीर्थांच्या ठिकाणीं घेऊन चल, हे माझ्या नाथा !

जिथें कुठें तुझ्या प्रेमरसाची विमल-धारा वाहात असेल तिथें गंगा आहे, तिथेंच यमुना आहे आणि तिथेंच 'आबे जमजम' (मुसलमानांचें पवित्र तीर्थकुंड) आहे. मला अशाच सरस सरितांच्या लाटांवर धीरेधीरे खेळवीत रहा, माझ्या हृदयरमणा !

जिथें कुठें तुझी गोंडस मूर्ति पहावयास मिळत असेल, माझ्या दृष्टीनें तिथेंच मन्दिर आहे, तिथेंच मशीद आहे आणि तिथेंच चर्च आहे. माझें आसन अशाच एखाद्या उपासनास्थलावर पसरून दे, माझ्या स्वामी !

— ३ —

तूं राम आहेस, तर मग अल्ला नाहींस काय ? तूं अहुर मज्द आहेस आणि येहोवा नाहींस काय ? तूं अर्हत् आहेस आणि बुद्ध नाहींस काय ? प्रभो, तूं काय नाहींस ? हीं सर्व नांवें तुझींच तर आहेत. तुझींच गोड गोड ध्यानें तर आहेत !

काशी तुझी आहे आणि मक्का दुसऱ्या कुणाची कां आहे ? बुद्धगया तुझी आहे आणि जेरुसलेम कुणा दुसऱ्याचें कां आहे ? लाडक्या, तूं नाहींस कोठें ? हीं सर्व तुझींच तर घरें आहेत; तुझीं खेळण्याचीं निरनिराळीं अंगणें आहेत !

संस्कृत तुझी आहे आणि झिन्द कुणा दुसऱ्याची कां आहे ? अरबी तुझी आहे आणि लॅटिन कुणा परक्याची कां आहे ? नाथ, या सर्व तुझ्याच भोळ्या भाषा आहेत, तुझेंच लाडके रसपूर्ण बोबडे बोल आहेत ना ?

— ४ —

न्याय मागायला आलों आहे, नाथा; न्याय ! लोक मला तुझा अपराधी म्हणतात. मला काय माहीत कीं, मी तुझा अपराधी आहें कीं नाहीं तें ?

माझ्यावर एक फार मोठा गुन्हा लादला जात आहे. तो हा कीं मीं तुझ्या गोंडस मूर्तीची एक तसबीर काढून कोठें तरी लपवून ठेवली आहे—हें माहित असूनहि कीं तूं निराकार आहेस; अमूर्त आहेस ! तुझें चित्र काढणें त्यांच्या दृष्टीनें बेक़ायदेशीर आहे !

जर तुझ्या ‘ खास न्यायमंदिरांत ’ माझा हा उद्धटपणा अपराध समजला जात असेल तर मीं हा अपराध अवश्य केला आहे. मी मोठ्या आनन्दानें त्याचा स्वीकार करतो; आणि त्यासाठीं कठोरांत कठोर शिक्षा भोगण्यास मी तयार आहे. पण एक प्रार्थना आहे न्यायाधीश महाराज ! ज्या कारागृहांत मला बंद केलें जाईल तेथील भिंतीवर मीं काढलेली ती गोड तसबीर टांगण्याची परवानगी मला अवश्य दिली जावी. माझी ही विनम्र प्रार्थना अवश्य मान्य करण्यांत यावी, हे प्रभो !

— ५ —

ठाऊक नाहीं मला, कृतज्ञता कशी प्रदर्शित करावयाची असते तें ! मला फक्त एवढेंच म्हणावयाचें समजतें कीं, जेव्हां जेव्हां तुजपाशीं जें मागितलें तेव्हा तेव्हां तूं तें दिलेस, आणि खूप दिलेस. आतां, अखेर शेवटीं, आज तुजजवळून मी तुलाच मागून घेतों आहे, तुझ्या दानी हातांनीं हें आणखी एक दान मिळावें, नाथा !

मी स्वार्थी आहें, मोबदल्याची भावना माझ्या हृदयांतून अजूनहि गेली नाहीं. आणि ती जायचीहि नाहीं ! तूं मला जसा आपला केलास तसा तूं अजून माझा कोठें झाला आहेस ? म्हणून तर मी तुजकडून ‘ तुला ’ मागून घेत आहे. समोर या तर खरे सरकार ! तुझ्यावर ताबा मिळविण्यास फार वेळ लागणार नाहीं !

ध्यानांत असूं दे, माझी ही कांहीं अनुचित मागणी नाहीं. तुजजवळून तुला मागून घेणें ही काय अनधिकारी उदंडता आहे. आपल्या स्वतःच्या संपत्तीवर अधिकार सांगणें हा कां अपराध आहे, न्यायाधीश, महाराज ?

कांहींहि असो, आतां तूं आपल्या स्वतःला माझ्या स्वाधीन करून टाक; माझा होऊन जा !

— ६ —

किती छान होईल तें ! – कीं मी मात्र हार्दिक प्रेमानें आपल्या निर्धन कुटीमध्यें सर्वांचें स्वागत करावें आणि सर्वांनीं माझ्या गर्वोन्नत मस्तकाला आपल्या पायांच्या ठोकरांनीं दुर्दलित करीत रहावें ! मी मात्र सर्वांवर सुख-सुमनांचा वर्षाव करावा आणि सर्वांनीं मला कष्टकंटकांनीं छेदत रहावें ! केव्हां सफल करशील, नाथ, माझी ही मधुमयी लालसा ?

आणि हेंहि किती छान होईल कीं मी मात्र सर्वांची नेहमीं प्रेमानें आठवण करीत रहावें आणि सर्वांनीं मला मनांतून हांकलून देऊन कायमचें विसरून जावें ! मी सर्वांना प्रेमपूर्ण नेत्रपलकांवर बसवून ठेवावें आणि सर्वजणांनीं मजकडे तिरस्कारपूर्ण नजरेनें पहात असावें ! केव्हां पूर्ण करणार, प्रभो, माझी ही अधीर अभिलाषा ?

— ७ —

अरे ओत ना थोडीशी आपली प्रेममदिरा माझ्या रिकाम्या जीवनाच्या रिकाम्या प्याल्यांत, माझ्या लाडक्या साकी[†] : जराशी पाजव ती आपली प्रीति-पेया, माझ्या प्राणप्रिय, सद्गुरू ! आणि पडून राहूं दे मला कोठेंतरी तुझ्या मस्त वेदनापूर्ण आठवणीमध्यें !

असें कांहींतरी कर कीं, तुझी ही लीलामयी मदिरा पिऊन मी आपल्या मदोन्मत्त नेत्रांच्या रंगांत या साऱ्या धर्मांना आणि पंथांना रंगवून टाकावें; धर्म आणि जग यांच्या वस्त्रांना दुसराच एखादा रंग देऊन टाकावा; मीहि मस्त व्हावें आणि इतरांनाहि मस्त करून सोडावें.

ही शुद्धि माझ्या काय कामाची ? मला तर तुझी तीच गोड बेशुद्धि हवीय ! जोंपर्यंत ही शुद्धि आहे तोंपर्यंत मी तुझ्या कोणत्याहि आज्ञेचें पालन करूं शकणार नाहीं. थोडीशी प्रेममदिरा पाजवून बेहोष करून टाक, माझ्या प्राणेशा, आणि मग पहा कीं मी तुझा आदर्श आज्ञाधारक सेवक आहे कीं नाहीं, एक अनासक्त कर्मयोगी आहे कीं नाहीं तें !

तेव्हां ओत ना जराशी मदिरा माझ्या या रिकाम्या जीवनप्याल्यांत माझ्या रंगेल साकी !

---

[†] मद्य पाजविणारा.

— ८ —

लाडक्या, तूंच राम आहेस अन् तूंच रहीम. प्रत्येक शरीररूपी घटामध्यें तुझ्याच भक्तीचे तरंग उठत आहेत. कोणता घट रिकामा आहे तुझ्या प्रेमरसाविना ? छान ! चांगलाच रमत आहेस रोमरोमांमध्यें, माझ्या लाडक्या रामा !

कणाकणामध्यें तुझीच तर कृपा वसलेली आहे. कसा मस्तानी चालीनें वहात आहे तुझ्या दयेच्या हा अखंड झरा ! लाडक्या रहीमा, छान पाजवलंस या थकल्याभागलेल्या प्रवाशाला आपल्या दयेचें हें थंडगार सरबत !

माझ्या रामा, असाच रमत रहा आमच्या रोमरोमांमध्यें. माझ्या रहीमा असाच पाजवीत रहा आपल्या कृपेचा अमीरस आम्हांला !

— ९ —

त्या लोकांना मी आपला पत्ता आणखी काय सांगूं ? लाडक्या, तूंच माझा पत्ता आहेस. ज्याला मला ओळखावयाचें असेल त्यानें मला तुझ्या नांवानें ओळखावें. पण खरी अडचण ही आहे कीं तूं स्वतःच बेपत्ता आहेस.

तुला वगळून माझा पत्ता कोणी विचारूं नये. तुझ्याव्यतिरिक्त ‘ मी ’ आतां स्वतःला विसरूनच गेलों तर बरें ! जर ‘ मी ’ आणि ‘ माझें ’ तुझें झालों नाहीं तर मग माझ्या ठावठिकाणाचा कोणाला काय फायदा ? कांहीं नाहीं तरी निदान माझ्या नांवावर जगांत नास्तिकतेचा प्रचुर प्रचार तरी न व्हावा, प्रभो !

— १० —

येथें बोलणें कांहीं औरच आहे तर करणेंहि कांहीं औरच. जितकें अंतर माझ्या करणींत आणि कथनांत आहे त्याहून कितीतरी जास्त अंतर माझ्या वचनांत आणि मनांत आहे. प्रभो, माझें मन, वचन आणि कर्म यामध्यें कधीं एकरूपता होऊं शकेल काय ?

किती दंभ भरला आहे माझ्या मलिन मनांत ! आपल्या वरवरच्या देखाव्यानें जगाला कसा फसवीत आहें मी, वाहवा !

वाणीच्या विदग्धतेनें आणि कर्मकुशलतेनें मी आपल्या कपटजालांत आज-पर्यंत शेंकडों सरलहृदय सज्जनांना अडकवून टाकलें आहे. धन्योऽस्मि! कृतकृत्योऽस्मि!!

पण प्रभो,आतां भय वाटतें, आतां येथें एक क्षणहि उभें राहावत नाहीं. सत्याच्या चक्रानें माझ्या दंभदानवाच्या गर्वोन्नत मस्तकाचे तुकडे तुकडे करून टाक ना, चक्रपाणे!

अरे माझी ही पिशाचिनी कर्मकुटिलता मला आज खावयास धांवत आहे. नाथ, माझ्या या भयानक छद्मच्छायेपासून मला वांचव. माझें हें कपट-जाल आज मलाच गुरफटून टाकीत आहे. रक्षण कर, प्रभो, रक्षण कर! शरण दे, दीनबंधो, शरण दे!

— ११ —

प्रभो, मला एवढीच श्रवणशक्ति दे कीं जिच्यायोगें मी सतावल्या गेलेल्या, तुडवल्या गेलेल्या दीनदुर्बलांचे हृदयाला हलवून सोडणारे उसासे आणि अनाथ-दुःखी लोकांचें करुण-क्रंदनच ऐकूं शकेन; आमोदप्रमोदाचा कलरव, उत्सवाचा कोलाहल आणि गायनवादनाचा मनोहारी स्वर-ताल ऐकूं न येईल तर बरें! दयानिधे! मला बहिरा बनव पण निर्दय नको बनवूं!

नाथ, मला एवढीच दर्शनशक्ति दे कीं, जिच्या योगें मी थरथर कापणाऱ्या उपाशीतापाशी दलित-पीडित लोकांना पाहून चार अश्रु ढाळूं शकेन! चंचला लक्ष्मीची विलासलीला आणि प्रमत्तसमाजाची केलिक्रीडा मला न दिसेल तर बरें! दयानिधे, मला आंधळा बनव, पण निर्दय नको बनवूं!

— १२ —

जन्मभर असाच लपंडाव खेळत राहणार काय, जीवनधन? केव्हां-पासून शोधतों आहे तुला! आतां तरी येऊन भेट, माझ्या हृदयचंद्रा! एकदांच कां होईना, पण आपलें गोड स्वरूप दाखव ना, माझ्या लाडक्या प्रेमनिधे!

जीवनघटांतील कांहीं जल उचंबळून सांडलें आणि कांहीं झिरपून गेलें. आतां यांत फक्त दोनचारच थेंब उरले आहेत. अजूनहि ये, दोनचारच थेंब कां असेनात, तेच तुझ्या चरणांवर घालीन!

दीपकहि आतां विझूं पहात आहे. नाथ, यांत आतां तेल उरलंयच कुठें ? आतां तर ही वातच जळत आहे. ती तरी आतां कुठवर चालणार ? अजूनहि आपलें गोड दर्शन दे ना प्राणेश्वरा ! यानें तुझी आरती कसची करणार म्हणा, पण या मालवणाऱ्या ज्योतीच्या प्रकाशांत तुझें एक गोडसें दर्शन घेईन झालं !

एवढी आस तरी आतां पूर्ण करच, कृपा करून, करुणानिधे !

— १३ —

छान, तुला मी कुठें कुठें धुंडीत फिरूं ? मंदिरांत शोधूं कीं मठांत ? मशिदींत शोधूं कीं चर्चमध्यें ? जिथें तिथें तूंच तर आहेस; कुठें नाहींस बरें तूं लाडक्या ?

असशील इतरांसाठीं सर्व ठिकाणीं व्यापक असशील तूं. पण मी तुझी सर्वव्यापकता कशी कबूल करीन ? मला तर तूं अजून कधींच भेटला नाहींस. तूं प्रेमानें प्रगट होतोस असें मीं ऐकलें आहे. पण तें प्रेम कांहीं माझ्या हातीं नाहीं. मी आणि प्रेम ! प्रेमच जर मिळालें असतें, लाडक्या, तर मग तुला शोधण्याची तरी काय जरूर होती ?

जीवनधन, कां छळतोस विनाकारण ? प्रगट कां नाहीं होत प्रेमरूपानें या तळमळणाऱ्या डोळ्यांच्या समोर, माझ्या लाडक्या प्राणेश्वरा ?

— १४ —

आम्हांलाहि थोडीशी दया दे ना दयानिधे ? हृदयपात्र घेऊन आज आम्ही तुझ्या दारीं दयेची भीक मागण्यास आलों आहोंत. आमची अमर्याद निर्दयता तूं घे आणि तिच्या ऐवजी थोडीशी दया दे ना आम्हांला, नाथ ?

— १५ —

अरे, कांहीं पार आमच्या निर्दयतेला ! ते सर्व एकेका दाण्यासाठीं तडफडत आहेत, कण्हत कण्हत उपाशी मरत आहेत, आणि आम्ही रसनेचे दास, शेंकडों प्रकारचीं मधुर व्यंजनें फस्त करूनहि तृप्त होत नाहीं ! ते पहा,

आमचेच बांधव, एका चिन्धीची लंगोटी लावून नागडे उघडे थंडीनें थरथरा कांपत आहेत आणि आम्ही दिवसांतून दहा दहा वेळा रंगी-बेरंगी कपडे बदलत आहोंत ! ते, आमच्याच आईच्या मांडीवर खेळणारे जीव, मोडक्या तोडक्या झोंपड्यांमध्यें किंवा मोकळ्या मैदानांतच पडल्या पडल्या सडत आहेत, आणि आम्ही सुरम्य भवनामध्यें मखमली गाद्यांवर लोळत विलासक्रीडा करण्यांत गुंग आहोंत ? तेथें ते पददलित, ते सर्वस्वापहरण केले गेलेले किसान आणि मजूर ओक्साबोक्सी रडत आहेत आणि आम्ही येथें वीणेच्या व बांसरीच्या स्वरांमध्यें रागरागिणींचे आलाप काढीत आहोंत. तेथें ते दीनदुर्बळ अत्याचाराच्या चक्कींत पिसले जात आहेत आणि आम्ही या मंदिरांत व मशिदींत बकध्यान लावून ईश्वरोपासना करीत आहोंत ! हें महान् अमानुष अन्तर पाहून आमच्या निर्लज्ज डोळ्यांतून कधीं दोन अश्रूहि निघत नाहींत. धिक्कार असो आमच्या या हृदयहीन निर्दय जीवनाला !

नाथ ? आतां आम्हांला अर्थ नको किंवा कामहि नको; धर्महि नको किंवा मोक्षहि नको. केवळ दयेचे इच्छुक आहोंत, दयेचे भिक्षुक आहोंत आम्ही. तर मग देऊन टाक ना थोडीशी दया, दयानिधे ?

— १६ —

हें छान रहस्य उकललें, दयामूर्ते !

रंगी-बेरंगी कसे सुन्दर प्याले ठेवले आहेत हे ! त्यांत कांहीं प्याले जुने आहेत, कांहीं नवीन, कांहीं मोठे तर कांहीं छोटे; कांहीं सोन्याचे तर कांहीं मातीचे ! पण आहे मात्र सर्वांमध्यें एकच अमीरस ! तूं या सर्व प्याल्यांतून एकच प्रेमसुधा भरून ठेवली आहेस. धन्य !

विनाकारणच लढून मरतात हे मूर्ख मत्त धर्मवाले ! प्याल्यांच्या वरवरच्या रंगरूपावरच या धर्मरसिकांचे डोळे लागलेले असतात. यांच्या आंतील उचंबळणारा अनुराग-मधु यांनीं अजून पाहिलाच आहे कुठें ? या धिरट्या घालणाऱ्या लोभी मधुपांनीं अजून कुठल्याच प्याल्याला ओठ लावलेला नाहीं. एक वेळहि जर या भेदवाद्यांना या प्रेमरसाची चटक लागली तर यांनाहि सगळे नवेजुने प्याले एकाच सरस मधूनें भरलेले दिसूं लागतील.

किती छान होईल ! त्या दिवशीं प्रत्येक तृषित पथिकाच्या मुखांत प्रत्येक सुंदर प्याला कसा गोड गोड आनन्दरस ओतूं लागेल.

आम्हां सर्वांच्या समोर उघडें करून दाखव ना आपलें रस रहस्य, रहस्यमय परमेश्वरा !

— १७ —

या दारुण दारिद्र्य-युगांत मीं तुला गीत गाऊन रिझवावें ही कांहीं माझ्या हातची गोष्ट नाहीं. दरिद्रीनारायणाच्या तुच्छ उपासकाला गायनवादनाच्या भावनाभवनांत बोलावूं नकोस, हे दीनबन्धो !

होय, आज रागरागिणींच्या मादक आलापांमध्यें तें स्वर्गीय संगीत कोठें आहे, जें दलित-दुःखी लोकांच्या विलापांत आणि पीडितांच्या करुण क्रन्दनांत आहे ? तेव्हां मला या मधुमय आलापांपासून ओढून घेऊन त्या कर्णकटु करुणक्रन्दनाच्याच समीप घेऊन चल, करुणामय !

तुझ्या साधनमंदिरांत तुझा उपासक आज वीणा आणि बांसरी कुठें वाजवूं शकतो ? हा हृदयहीन गरीब साधक तुझ्यासमोर आतां आणखी अधिक निर्दय नि निर्लज्ज बनणार नाहीं; स्वामी ! गायनवादनाच्या मोह-पाशांत गुंतवून मला तूं हें काय बनवीत आहेस ? नाथ !

या दारुण दारिद्र्ययुगाचा, घामाच्या धारा वाहविणारा हा मजूर उपासक तुला छिनी व हातोड्याच्या स्वरानें रिझविण्यास आलेला आहे, वीणेच्या झंकारानें किंवा बांसरीच्या ताननें नव्हे !

— १८ —

प्राणेश, तूंहि माफ कर आणि माझ्या लाडक्या परिचितांकडूनहि मला माफ करव. तूं तर कसेंहि करून क्षमादान देशीलच करुणानिधे ! पण ते सगळेजण मला कसे क्षमा करतील ?

नाथ, मी घोर अपराधी आहें; माझ्या कृष्ण जीवनाचा प्याला अपराधां-च्याच मोहिनी मदिरेनें भरलेला आहे. तुझ्या प्रेमरसाचा तर त्यांत आज-पर्यंत एक थेंबहि टाकलेला नाहीं. क्षमा कर, तुझ्या पवित्र चरणांवर आज मी आपला हाच प्याला ओतीत आहें.

पण इतर सर्वांची मी कशी बरें माफी मागूं ? मीं अगणित अपराध केले आहेत, प्रभो ! मिथ्यावादितेशीं मित्रता जोडून सत्य आणि विश्वास यांच्याशीं मीं जन्मभर प्रवंचनाच केली आहे. खरें म्हणशील तर मी आज कोणालाहि आपलें तोंड दाखविण्याच्या योग्यतेचा राहिलेलों नाहीं. म्हणून तर मीं पुनः पुनः प्रार्थना करीत आहें कीं तूंच माझ्या लाडक्या परिचितांकडून कसेंहि करून मला माफी देवव. नाथ, जोंपर्यंत मला क्षमादान मिळणार नाहीं तोंपर्यंत आपल्या या घाणेरड्या जीवनप्याल्यांत तुझा प्रेमरस मी कसा बरें ओतूं शकेन ? म्हणून आज तूं मज भिक्षुकाला क्षमेची भीक घाल आणि इतरांना घालावयास लाव !

— १९ —

खरोखर, आज माझ्या आनन्दाला कांहीं सीमा नाहीं. नाथ, तूं हें छान अनुसंधान अनायासें करवून दिलेंस. वेळेवर या महान् सत्याचा तपास तर लागला ! धन्य आहे आज माझें भाग्य, विभो !

— २० —

हा किती छान आहे, किती चांगला आहे ! तोहि किती छान आहे, चांगला आहे ! हे तर सर्वचजण चांगले आहेत. होय, प्रभो. मजहून सगळे चांगले आहेत. मीच वाईट आहें, अन् सर्वांत वाईट आहें. योग्यच आहे हें कीं माझी नित्य निंदा होत असते. इतर कांहीं नाहीं तरी यामुळें माझ्या मनांतील थोडीशी घाण तर निघून जाते. सद्गुरुसमान माझे हे आवडते निंदक युगानुयुगें जगोत !

इतकें तर मी स्वतःच कबूल करतों कीं माझा अहंकारमद हिमाद्रिशृंगाहूनहि उत्तुंग आहे; माझा क्रोध प्रचंड दावानलापेक्षांहि अधिक अंगदाहक आहे; माझा मोह महोदधीपेक्षांहि अधिक अगाध व अपार आहे; माझा काम हालाहलाहूनहि अधिक उन्मादक व मारक आहे. कोण जाणे केव्हांपासून द्वेषाच्या अग्निलतेला आलिंगन देऊन मी बेहोष पडलों आहे. पापी लोकांमध्यें मी महान् आहें, एक आहे, अद्वितीय आहे. माझे संक्रामक पापकीटाणु समस्त ब्रह्मांडामध्यें व्याप्त होत आहेत.

माझ्या आत्मदुर्बलतांना तर अंतच नाहीं, नाथ ! न्याय तर खरोखरी असाच आहे कीं, लोकांनीं मला घृणेच्या दृष्टीनें पहावें. माझी खरी निंदात्मक आलोचना अशाप्रकारें मला कधीं मधीं तुझी आठवण तरी करून देत राहील. हृदयाच्या आरशांत मीं सदा आपल्या दोषांचेंच प्रतिबिंब पहात रहावें, नाथ ! तीच प्रार्थना आहे. अन्तकाळापर्यंत माझा हाच विश्वास दृढ राहूं दे कीं मजशिवाय बाकी सर्वजण चांगले आहेत, मीच सर्वांत वाईट आहें.

— २१ —

प्रभो, मी तेव्हांपासून तुझ्या दरबारांत हजर होण्याचीच तर ही सर्व तयारी करीत आहें. आत्तां कुठें आठवण झालीय कीं एक एक थेंब करतां करतां माझ्या या कच्च्या घड्यांतून किती पाणी झिरपून गेलंय तें ! तुझें तें संकेतरहस्य अजूनपर्यंत मला समजलेंच कुठें होतें ? आतां, आज, संध्याकाळच्या या निसटूं पाहणाऱ्या क्षणांच्या वेळीं जीवनभराचें देणेंघेणें ठीक करण्यास बसलों आहे !

सर्वज्ञा, तुला गुप्त असें काय आहे ? नाथ अपराधाची क्षमा असो द्यावी. तूं दिलेला तो नकाशा, कोण जाणे, माझ्या हातून कुठें हरवला—ज्याच्याकडे पाहून पाहून मला आपल्या जीवनाची, तुझ्या राहण्यायोग्य, एक इमारत उभी करावयाची होती. अरेरे ! काय बनवावयाचें होतें अन् काय बनवलें !

आतां मजकडून उद्यां आपल्या दयादरबारांत कांहीं जाब नको मागूं, माझ्या उत्पत्तिकर्त्या ! आतां मात्र तुझ्या चरणांवर पश्चात्तापाचीच भेट चढवून आपल्या प्रमादपूर्ण पापांचें प्रायश्चित्त करीन, नाथ ! तुझ्या दरबारांत उपस्थित होण्याची माझी कांहींशी अशीच तयारी होत आहे.

— २२ —

आतां तरी—पतितपावना ! तूंच माझा अंगीकार केलास तर करूं शकशील खरेदी करूं इच्छिशील— फुकटच— तर मला तूंच खरेदी करूं शकशील. लाडक्या, असें भोळें गिऱ्हाईक येथें फक्त तूंच आहेस. होय, मला दुसरा कोण अंगीकृत करणार ? मीहि कोणाच्या कामाचा नाहीं, किंवा इतरहि कोणी माझ्या कामाचें नाहीं. मी स्वतःला सुख देऊं शकत नाहीं अन इत-

रांनाहि सुखवूं शकत नाहीं; स्वतःहि हंसूंखेळूं शकत नाहीं व इतरांनाहि हंसवूं खेळवूं शकत नाहीं. हृदयहीन अरसिक तर आहेच, पण मस्तिष्कहीन महान् मूर्खहि आहें मी ! खरें म्हणशील तर माझें अर्थविहीन 'अस्तित्व'च या घरातलावर अनवश्यक आहे. एकप्रकारें मी अजागलस्तनच आहें.

माझा असा विश्वास आहे कीं ज्याला कोणी चाहत नसेल त्याला तूंच चाहतोस, ज्याला कोणी शरण देत नाहीं त्याला तूंच आपल्या चरणांपाशीं अकुतोभय शरण देतोस; ज्यांचें कोठेंहि कोणी नसेल त्यांचें तूंच जीवनसर्वस्व होतोस. म्हणून नाथ, आतां तूंच माझा अंगीकार कर !

— २३ —

करोत, त्यांना कोण अडवतंय ? जितका कांहीं अत्याचार करावयाचा असेल, खुशाल करोत, पण प्रभो ! त्यांनीं तो तुझ्या नांवावर करूं नये, बस्स एवढंच हवंय मला !

तुला तर जणूं कांहीं दिसतच नाहीं. हे सर्व मिथ्याचार तुझ्याच नांवावर तर होत आहेत. परमात्मन् तुझ्या नांवानें एकजण आत्महत्त्या करतोय, तर दुसरा गोहत्त्या करतोय. तुझें नांव घेऊन एकजण दीनदुर्बळांना छळीत आहे, तर दुसरा स्पृश्यास्पृश्यतेचा पाखंडधर्म पसरवीत आहे. लाडक्या उत्पत्ति-कर्त्या ? तुझ्याच नांवानें आज दगडामातीच्या मंदिरांचें आणि मशिदींचें रक्षण करण्याच्या मिषानें नित्य नररक्ताच्या नद्या वाहविल्या जात आहेत ! म्हणून आतां या जातिधर्मांपासून सुटका करवून मला तेथें घेऊन चल, माझ्या जीवनधना, जेथें निदान तुझ्या पवित्र नांवानें तरी अत्याचार होत नसतील, जेथें कोणतेंहि मत नसेल, कीं धर्म नसेल, मंदिर नसेल कीं मठ नसेल, मशीद नसेल कीं चर्च नसेल, स्पृश्य नसेल कीं अस्पृश्य नसेल, उच्च नसेल कीं नीच नसेल. अशी एक तुझी प्रेमपुरीच आहे. तेव्हां, आतां मला तेथेंच घेऊन चल, माझ्या जीवननौकेच्या लाडक्या कर्णधारा, कीं ज्यामुळें रक्ताचे अश्रू आतां आणखी ढाळावे लागणार नाहींत !

— २४ —

मी जसा जो कांहीं आहे तसाच राहूं दे मला जीवनधन ! विनाकारण कांहीं तरी बनावें लागूं नये, बस्स, एवढीच विनंति आहे. अशीच एखाद्या दिवशीं जीवनसंध्या येवो !

या सर्वांना कसें प्रसन्न करूं ? कसें रिझवूं ? कोठपर्यंत यांच्यासाठीं नित्य नित्य नवनवीन सोंगें घेत राहूं ? नाथ, आतां असें कांहीं काम न करावें लागो, कीं ज्यावर माझा आत्मविश्वास नसेल. आत्मप्रवंचनेच्या या महान् पापापासून मला वांचव.

एक म्हणतो, ' तूंहि आमच्याबरोबर हंस ! ' दुसरा म्हणतो. ' तूंहि आमच्याबरोबर खेळ ! ' कसा हंसूं ? कसा खेळूं ? त्या कोट्यावधि रडणाऱ्यांचें करुणक्रन्दन कसें विसरून जाऊं या मधुर स्वरालापांमध्यें ? तूं तर मला येथें धाडलें आहेस अश्रूंचा एक खजिना देऊन आणि हे म्हणतात कीं ' आमच्या बरोबर जीवनपथावर प्रफुल्लतेचीं पुष्पें उधळीत चल ! ' कुणाची आज्ञा मानूं ? तुझी कीं यांची ? या सुखी लोकांबरोबर हंसूनखेळून, गाणेबजावणें करून त्या हिशेबठिशेबाच्या दिवशीं तुला काय जाब देऊं, माझ्या हृदयाच्या मालका ?

मला माझ्या याच क्लेशपूर्ण मौजेच्या मस्तींत पडून राहूं दे. आतांपर्यंत रडणाऱ्यांच्याच सांगातीं राहात आलों आहें, तेव्हां आतां येथेंच राहूं दे ! हंसणाऱ्यांच्या सुखांत नको सामील करूं, करुणानिधे !

— २५ —

चांगलें तर आहे माझें हें रहस्यानें परिपूर्ण असें पीडित जीवन; हें असेंच राहूं दे, लीलामय !

माझ्या मदपूर्ण मानसामध्यें अगदीं अशाच प्रकारें तुझ्या अद्भुत इशाऱ्यांवर वेदनेच्या कांहीं लाटा उठत राहोत आणि विलीन होत राहोत. मला असाच या अव्यक्त तरंगांच्या हलक्याशा हिंदोळ्यावर मोठ्या मजेंत झोंके घेऊं दे, माझ्या स्वामी !

आज असा हा फेरफार कां बरें करवीत आहेस ? हें रहस्यांतील रहस्य कसलें ? असली कसली ही विचित्र आज्ञा देत आहेस माझ्या मालका ?

या महान् परिवर्तनाच्या द्वारें आज माझ्या परिमित हृदयामध्यें कोणत्या अनन्त अज्ञेय अभिनयाचा अन्तर्पट उघडीत आहेस, मायाधीशा ? नको देऊं अशी आज्ञा, नाथ ! अरे बापरे ! किती निगूढ आशंका आहे या परिवर्तनकारी सुखसंकेतामध्यें !

लीलामय ! माझें रहस्यानें भरलेलें हें पीडित जीवन आतां असेंच राहूं दे !

— २६ —

अखेर तूं रिझणार तरी कसा ? तुझ्या प्रीत्यर्थ मी वेदाचें पारायण करूं कीं धम्मपदाचें ! अवेस्ताचा पाठ करूं कीं बायबलाचा कीं कुराणाचा ?

काय, तुझीहि एखादी खास भाषा आहे, भगवन् ? ज्या कोणत्या देशाचा तूं निवासी असशील, तुझी भाषाहि तेथलीच असेल. म्हणतो आहेस तर घे, धरून चालतों कीं तूं विश्वव्यापी नाहींस म्हणून तर मग तूं आहेस तरी कोणत्या देशाचा रहिवाशी नाथ ? तेथील आपली भाषा तरी सांग ना, रे प्रभो ! तुला रिझवावयाचें आहे ना; तुझ्या त्या खास भाषेंत प्रार्थना कर करून तुला मी रिझवीन !

छान, आत्तां आलें ध्यानांत ! पण हें तर, नाथ, अशक्य आहे अगदीं ! तुझ्या या प्रेमभाषेंत अभ्यस्त होणें हें माझ्या शक्तीबाहेरचें आहे. कुठें शिकूं, कुठें पढूं ही भाषा ? या दोन अक्षरी (प्रेम) भाषेचें रहस्य-साहित्य तूंच शिकव मला, गुरुदेव, तरच मी शिकूं शकेन, नाहींतर नाहीं ! शिकव ना रे, प्रभो, आपल्या लाडक्या प्रेमपोथीचीं कांहीं पानें !

— २७ —

प्रभो, तीं तरी तुझींच लाडकीं बाळें आहेत ना ? ते इकडेतिकडे भटकणारे रस्ता चुकलेले वाटसरू आहेत. त्यांना आज आपली कांति दाखव; त्या हृदयान्धांना वाट दाखव; त्यांच्यावरहि दया कर, दयासागरा !

ते आज निर्लज्ज अहंकारितेका छातीशीं कवटाळून बेहोश पडले आहेत. त्यांच्या अशान्त अहंमन्यतेनें त्यांना जुलमी बनविलें आहे. त्यांचें हृदय दयेविना कसें रिकामें पडलें आहे. म्हणून हे माझ्या दात्या, त्या हृदयहीनांना तूं आज थोडेसें दयादान देऊन टाक ना !

दीनदुर्बळांच्या चक्काचूर झालेल्या फांसळ्या आपल्या पायांखालीं तुडवीत अल्लड जवानीच्या मस्तीमध्यें ते कसे तोऱ्यांत चालत येत आहेत. आंधळ्या-पांगळ्या, उपाशी-तापाशी, दरिद्री जीवांच्या रडण्याला ते कसे

बेपर्वाईनें दांत काढून हंसत आहेत. त्या तळमळणाऱ्या आणि विव्हळणाऱ्या कंगालांच्या छातींवर नाचत नाचत ते मजेंत डुलत आहेत आणि मधुर रागरागिण्यांचे आलाप काढीत आहेत. निर्दय तर ते अवश्य आहेत आणि न कळत जुलूम करतां करतां ते नास्तिकहि बनले आहेत म्हणून. तर तुला, हे परमपित्या, त्यांच्यावर दया करावी लागेल; त्यांचे डोळे उघडावे लागतील; त्यांना वाट दाखवावी लागेल; प्रभो, दया कर, आपल्या त्या उद्धट पुत्रांवर दया कर !

— २८ —

आतां हाच एक मोडकातोडका भग्नावशेष उरलेला आहे. हेंच मन्दिर आहे, हाच मठ आहे. यांतच बसून मी तुझी आठवण काढीत असतों. या ठिकाणीं एकेकाळीं माझ्या उंच उंच अभिलाषांचें एक सुंदर भवन उभें होतें. त्याच विशाल मन्दिराचा हा भग्नावशेष आहे. नाथ ! याला मीं आतां तुझें उपासनास्थळ बनविलें आहे. ये, बैस, या फाटक्यातुटक्या घोंगडीवर विराजमान हो !

मोठमोठीं भव्य भवनें तुला पसंत पडत नाहींत ना ? तूं दीनांचा उपास्य, दुर्बलाचा आराध्य, आणि दरिद्र्यांचा पूज्य आहेस ना ? या मोडकळीस आलेल्या जागेंत, भगवन्, मी तुला कसें रिझवूं, कांहीं समजत नाहीं. वीणाहि नाहीं नि मृदंगहि नाहीं, स्वरहि नाहीं नि तालहि नाहीं, धूपहि नाहीं नि आरतीहि नाहीं. करुणालय, जर कांहीं असेल तर केवळ हें कर्णकटु करुण-क्रंदन आहे; कांहीं वेदनापूर्ण उसासे आहेत, आणि थोडेसे हे अधीर अश्रू आहेत. होय, कुस्करलेल्या आकांक्षांचा एक कोमेजलेला हारहि येथेंच कोठें तरी पडलेला आहे. तो आतां तूंच शोधून काढ, प्रभो ! बस्स हीच काय ती सगळी तुझ्या पूजेची सामग्री आहे.

काय भगवन् ! करशील ना स्वीकार या भग्नावशेषवासी जीवाच्या या तुच्छ सेवेचा नि अर्चेचा !

— २९ —

मला ते विचारीत असतात, "कायरे बुवा, तुझी जीवनधारा आटून गेल्यानंतर तुझें 'स्मारक' काय होईल ?" माझें स्मारक जणूं कांहीं मी

कोणीतरी लोकप्रख्यात पुरुषच आहे ! प्रभो, मी त्याना काय बरें उत्तर देत जाऊं ?

माझ्या या लाडक्या कुटीच्या फुलांपानांवर आकित झालेलीं अगणित अर्घे आणि अयशेंच माझें चिरस्मारक बनतील. कां, हेंच ठीक आहे ना ?

प्रियतमा, तूं तर अजून भेटलाच नाहींस. किती छान होईल – जर मी तुझ्या मीलनाच्या व्याकुलतेंतच प्राणत्याग करीन तर ! आणि ती विरहव्याकुलताच त्या सर्वांच्या संतोषासाठीं, माझें स्मारक बनून जावी.

माझ्या या प्रार्थनेचा स्वीकार कर, माझ्या प्राणेशा !

— ३० —

आतां आणखी काय मागूं ? प्रभो, तूं माझ्या जीवनाच्या प्याल्यांत आज असा रस ओतला आहेस कीं तो पिऊन मी अनंत मधुमय आकाशांत उडत आहें.

खूप दिलेस, लाडक्या खूप दिलेस ! मला आज माझें सर्वस्व मिळालें. तुझें गोडसें बक्षिस मी मोठ्या श्रद्धेनें हृदयमंजूषेमध्यें ठेवून दिलें आहे. आतां आजीवन तें तेथेंच राहील.

माझ्या डोळ्यांतील बाहुल्यांवर तर त्याचेंच छायाचित्र आहे. तें चित्र पाहूनच लोक तुझ्या कृपेचें अनुमान करूं शकतील.

आतां फक्त एवढीच कामना आहे कीं तूं दिलेला हा मधुरस पीतपीतच एखाद्या दिवशीं मी अमरमृत्यूला छातीशीं कवटाळावें.

— ३१ —

आतां मात्र, बघ हं, येथेंच बसलों; आणि उठेनहि तेव्हांच कीं जेव्हां तूं स्वतः येथून उठवशील. याच ठिकाणीं आतां विश्वनाथाची काशी आहे, आणि येथेंच आल्लाचा काबा आहे; येथेंच संध्यावंदन करतों आणि येथेंच नमाज पढतों प्रियतमा. येथेंच बसल्याबसल्या मी तुझ्या मधुर दर्शनाचा प्रेमरस पीत असतो. ज्या यंत्राचा भाग तूं मला बनविलें आहेस तेथेंच राहून मी तुझ्या मर्जीप्रमाणें चालत आहें. करणारा तूं आहेस आणि करविणाराहि तूंच आहेस.

मला कसलेंहि दुःख नाहीं कीं तक्रार नाहीं. प्रसन्न आहे, रामा, सर्व प्रकारें मी तुझ्या इच्छेंतच प्रसन्न आहे !

वाटेल त्या रूपांत दे, पण आपलें गोंडस दर्शन देऊन जा. सेवा करण्यास सेवक तयार आहे. तुझ्या प्रेमाचें स्वरूप दृष्टीआड न व्हावें, फक्त एवढीच प्रार्थना आहे माझी !

— ३२ —

आतां आणखी काय ऐकवूं ? जें कांहीं ऐकवावयाचें होतें तें सर्व ऐकविलें. सन्तोष आहे कीं तूं माझ्या नीरस प्रार्थना ऐकल्यास आणि त्यांच्याकडे लक्षहि दिलेंस.

तुझ्या करुणामयी कृपेची छाया माझ्या पापपरितप्त आत्म्यावर पडत आहे हें मला दिसतें.

तुझें वात्सल्यप्रेम माझ्या हृदयहीनतेला आपल्या चरणाशीं स्थान देण्या-साठीं बोलावीत आहे हें मला दिसतें.

तुझा संकेत-कर्णधार माझ्या जीर्ण जीवन-तरणीला तुजकडे घेऊन जात आहे हें मला दिसतें.

नाथ, रथाला आपल्या देशाच्या दिशेनें खूप फिरविलें, नाहींतर हे अल्लक घोडे, कोण जाणे याला आज कुठल्या कुठें घेऊन गेले असते.

चांगलीच विरघळत आहे माझी मोहमयी ममता तुझ्या प्रेमरसाच्या प्याल्यांत. खूप मिसळून जात आहे. धन्य !

आतां रात्रंदिवस तुझ्याच आठवणीच्या पक्क्या रंगांत रंगून जाईन. या बाबतींत आज तूं माझी खात्री केली आहेस.

प्रभो, जोंपर्यंत माझे प्राणपक्षी या पिंजऱ्यांत पाळलेले आहेत तोंपर्यंत हे तुझ्याच गोड नांवाचा जप करीत राहतील, याचीहि मला खात्री पटली आहे. आतां, तूं जें कांहीं मला दिलें आहेस त्याचें रक्षणहि तूंच कर !

---

## देशमुख आणि कंपनीचीं प्रकाशनें

### वि. स. खांडेकर

१ फुलें आणि दगड (आ. दुसरी) ३
२ घरट्याबाहेर ( ,, ) ३
३ पहिली लाट ( ,, ) ३
४ स्त्री आणि पुरुष ( ,, ) २
५ सूर्यकमळें ( ,, ) २॥
६ कालचीं स्वप्नें ३
७ आजचीं स्वप्नें ३
८ कलिका २।
९ मृगजळांतील कळ्या २॥
१० सुवर्णकण २।
११ मंजिऱ्या २।
१२ सायंकाल (आ. दुसरी) २॥
१३ अविनाश १।॥
१४ मंदाकिनी १।॥
१५ कल्पकता ३
१६ आगरकर व्यक्ति-विचार ३॥
१७ सहा भाषणें २
१८ फुलें आणि कांटे २।
१९ मराठीचा नाट्यसंसार ३॥
२० हिरवा चांफा (आ. तिसरी) ५
२१ दोन ध्रुव ( ,, ,, ) ५
२२ पहिलें प्रेम (आ. दुसरी) ३
२३ क्रौंचवध ( ,, ,, ) ५
२४ पांढरे ढग ( ,, ,, ) ४।
२५ जळलेला मोहर ३

### ग. त्र्यं. माडखोलकर

१ अवशेष २
२ व्यक्तिरेखा २।
३ माझी नभोवाणी २
४ नवे संसार (जप्त) ४
५ चंदनवाडी ६॥
६ नागकन्या ३
७ दोन तपें २

### ना. धों. ताम्हनकर

१ तात्या भा. १ ला (आ. दुसरी) ४
२ तात्या भा. २ रा. ३
३ निवाडे भा. १ ला २॥
४ निवाडे भा. २ रा ४
५ चकमकी १॥
६ बच्चा नवरा १॥
७ अनेक आशीर्वाद ३॥
८ दाजी भा. १ ला (आ. ति) ३॥
९ वहिणभाऊ ॰।॥॰

### चिं. वि. जोशी

१ आणखी चिमणराव (आ. दु.) ४
२ वायफळांचा मळा ५
३ नवें भारूड २
४ स्टेशनमास्तर २
५ नटश्रेष्ठ ॰।॥॰

### साने गुरुजी

१ पुनर्जन्म (आ. दुसरी) ३
२ आस्तिक ( ,, ,, ) ३
३ संध्या ५
४ निळा पक्षी (आ. दुसरी) २॥
५ गोड निबंध (भाग १ ला) ३
६ गोड निबंध (भाग २ रा) ३
७ गोड निबंध (भाग ३ रा) ३
८ सोन्या मारुति ? (आ. दुसरी) २

### वा. म. जोशी

१ स्मृति-लहरी २
२ विचार-लहरी २
३ विचार-विहार ४।

### दत्तु बांदेकर

१ सख्याहरी (आ. दुसरी) २
२ नवी आघाडी १॥
३ तूं आणि मी २।
४ नजरबंदी २।

### प्र. के. अत्रे

१ साखरपुडा १॥=
२ ललित वाङ्मय ३।=
३ दूर्वा आणि फुलें २

## दत्त रघुनाथ कवठेकर
१ अपुरा डाव ३
२ रेशमाच्या गांठी ३
३ आभाळाची सांवली ८
## ना. म. पटवर्धन
१ हितपत्रें ३
२ वा. म.जोशी—चरित्र ४।
## अनंत काणेकर
१ धुक्यांतून लाल ताऱ्याकडे (आ. दुसरी) ३
२ पिकर्ली पॉन (आ. दुसरी) १॥
३ उघड्या खिडक्या १।
## काकासाहेब कालेलकर
१ ब्रह्मदेशचा प्रवास १॥
२ भाक्ति-कुसुमें ३
## य. दि. पेण्ढरकर
१ प्रापंचिक पत्रें ३
२ घायाळ २
## ना. ह. आपटे
१ फसगत १॥
२ साजणी ५
## पु. य. देशपांडे
१ नवें जग २॥
## भाई वेके
१ रॉय चरित्र १॥
## परिचय लेखक : वि. स. खांडेकर
१ काव्यज्योति १
## आनंदीबाई जयवंत
१ पारंब्या २
## लक्ष्मणराव सरदेसाई
१ ढांसळलेले बुरुज २
## प्रो. वि. ह. कुलकर्णी
१ व्यक्तिचित्रें २॥
## शकुंतला परांजपे
१ भिल्लिणीचीं बोरें ३
## कृष्णाबाई मोटे
१ मीनाक्षीचें जीवन २।
## र. गो. सरदेसाई
१ चलतीं नाणीं २
## संपादक आचार्य भागवत
१ वर्धा शिक्षण योजना ४।
## रा. श्री. जोग
१ सौन्दर्यशोध आणि आनंदबोध ८
## वि. वि. बोकील
१ बेबीची वहीण ३
## सत्याग्रही
१ ग्रह आणि तारें ४॥
## वि. म. भुस्कुटे
१ स्टॅलिन ३॥
## कमलाबाई टिळक
१ आकाशगंगा २॥
## रामतनय : १ साखरगोटी ५
## ह. रा. महाजनी
१ आपलें आर्थिक नियोजन ५
## पं. क्षमा राव : १ दणगी २॥
## गोपीनाथ तळवलकर
१ मंगलधाम ३
## मॅक्झिम गॉर्की
१ आई ७
## हॅरॉल्ड लास्की
१ राज्यशास्त्रप्रवेश २
## बाबूराव गोखले
१ बारा फोफावला २
## श्री. ना. चाफेकर
१ समाज--जीवन ५
## रा. त्रि. फडतरे
१ मृगया ४॥
## एम्. एल्. दांतवाला
१ आपली राहणी १॥।
## बापू गोखले
निवड ३
## कृ. गो. किनरे
१ प्रकृति दर्शन ५

REFBK-0006689

देशमुख आणि कंपनी,
१९१ शनवार,
पुणें २.

किंमत २॥ रुपये.

पुढील प्रकाशन
**वटपत्रें** (कादंबरी)
वि. स. खांडेकर